

महाराष्ट्राचे जिल्हे

महाराष्ट्राचे जिल्हे

नांदेड

किंमत २५ नये पैसे

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि खात्याचें प्रकाशन

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिचय

नांदेड जिल्हा

नांदेड जिल्हा

प्रास्ताविक

पृथ्वीला बहुरत्ना वसुंधरा असें म्हटलेलें आहे. पृथ्वीवर अनेक मूल्यवान रत्नें आहेत. पण सर्वांत मोठे रत्न म्हणजे माणूस. त्याचें कर्तृत्व म्हणजेच त्या रत्नाचे विविध पैलू. त्या पैलूच्या प्रकाशांतच पृथ्वीच्या पाठीवर आपल्याला अनेक रत्नें पहावयास मिळतात. परंतु त्यासाठीं जवाहिऱ्याची दृष्टि मात्र आवश्यक असते. पारतंत्र्याच्या काळांत आणि स्वातंत्र्यानंतर कांहीं वर्षें निजामाच्या कारकीर्दींत नांदेड जिल्ह्याकडे इतक्या बारकाईनें संशोधकाच्या चष्म्यांतून कोणी पाहिलें नसेल. पण आज मात्र स्वातंत्र्योत्तर कालांत नांदेड जिल्ह्याबद्दलचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास अवलोकन केला म्हणजे मराठीचें माहेर जो मराठवाडा त्यांस भूषणावह झालेला नांदेड जिल्हा निराळेपणानें उठून दिसतो.

नरश्रेष्ठांची कर्मभूमि

नांदेड जिल्ह्यास फार प्राचीन परंपरा आहे. पुराणांतर्गत प्रसंग त्यानें पाहिले आहेत अशा कथा आहेत. थकल्या भागल्या वनवासी पांडवांचे पाय त्याला लागले होते असें म्हणतात. नंद राजांची शान, त्यांच्या राज्यांत झालेल्या उलथापालथी नांदेडनें बघितल्या आहेत. शालिवाहनाच्या काळांत भारतवर्षांतली एक मोठी बाजारपेठ होण्याचा मान त्यानें मिळविला आहे. अगदी अलिकडच्या काळाबद्दल बोलावयाचें झाल्यास बहामनी राज्याचीं उडालेलीं शकलें, निजामशाहीची अरेरावी, मराठेशाहीचा उदयास्त नांदेड जिल्ह्याने उघड्या डोळ्यांनीं पाहिलेला आहे. शिखांचे दहावे गुरू श्री गुरुगोविंदसिंगांनाहि लुब्ध करुन येथें वास्तव्य करावयाला लावलें आहे व त्यांनीं देह ठेवल्यानंतर त्यांची स्मृति गुरुद्वारांच्या रूपानें आपल्या अंगाखांद्यावर बाळगली आहे. थोर विचारवंत ज्येष्ठ कवि आणि नरश्रेष्ठांची ही कर्मभूमि आहे.

पूर्वेतिहास

नांदेड शहर आणि आसपासचे तालुके मिळून नांदेड जिल्हा बनलेला आहे. तालुक्यासंबंधीची माहिती क्रमानुसार येईलच. परंतु तत्पूर्वी नांदेड हें नांव जिल्ह्याला कां मिळालें यासंबंधीची माहिती मोठी मनोरंजक आहे. हें शहर गोदावरी नदीच्या तीरावर वसले असल्याकारणाने नांदेड शहरास पवित्र क्षेत्राचें आणि तीर्थस्थळाचें महत्व प्राप्त झालें आहे. तसेंच गोदावरी नदीवरील हें मध्यवर्ती क्षेत्र असल्याकारणाने त्यास गोदावरीचे नाभीस्थान मानलें जातें. नांदेड शहर फार पुरातन काळीं वसलेलें असावें. पुराणां-

तरी या शहराचा अथवा भूभागाचा "नंदी तट" असा उल्लेख आलेला आहे. या संबंधातील पुराणांतील एक गमतीदार कथा अशीः—

एकदां शंकर आपली पत्नी सती हिच्या विरहामुळें अतिशय उद्विग्न झाले व त्यांना कांहीं सुचेनासे झाले. एकाद्या शांत, पवित्र, रम्य ठिकाणीं जाऊन कांहीं काळ घालवावा असें त्यांच्या मनानें घेतलें. अशा प्रकारचें रम्यस्थान शोधून काढण्याची जबाबदारी त्यांनीं आपलें वाहन नंदी यावर सोंपविली.

नंदी फिरत फिरत गोदातीरावर आला आणि येथील निसर्ग शोभा पाहून तो स्वतःच रमून गेला. इतकेंच नव्हे तर स्वतःची जबाबदारी विसरून जाऊन तो स्वतः तपश्चर्येस बसला. श्रीशंकरांनीं अंतर्ज्ञानानें परिस्थिती ओळखली व नंदीच्या तपश्चर्येचा भंग करून त्याला परत आणण्यासाठी उर्वशीला गोदातटीं पाठवून दिलें.

उर्वशीच्या पायांतील नुपुरांनी नंदीच्या तपस्येचा भंग झाला व त्याने उर्वशीला शाप दिला कीं, "तूं इतकी वाहवलीस तर आतां वाहातच राहा." आणि तेव्हांपासून नंदीच्या शापामुळें उर्वशी जलरूप होऊन वाहूं लागली. हें स्थळ "उर्वशीं कुंड किंवा उर्वशी संगम–टेकडी" म्हणून आजहि ओळखलें जातें. नंदीनें गोदावरीच्या ज्या तटावर वास्तव्य केलें त्या भागाला नंदीतट असें नांव मिळालें आणि याच नंदीतटाचें अपभ्रंश स्वरूप नांदेड झालें असावें.

नांदेडला एक नृसिंह मंदिरहि आहे. त्याबद्दलचीहि एक आख्यायिका आहे ती अशीः–नंदीतटाचे माहात्म्य वाढेल असे वाटूं लागल्यावरून वाराणशीनें विष्णूचा धांवा केला; तेव्हां विष्णूने महादेवाची समजूत घातली कीं; "नृसिंह रूपेण स्थैतत्र सदैवहि" तुम्ही आपले वाराणशीस परत जावें. महादेव वाराणशीला परत गेले व विष्णूनें नृसिंहरूपानें येथील नृसिंह मंदिरांत वास्तव्य केलें. श्रीमत् भागवतामध्यें नांदेड या नांवासंबंधीं एक निराळीच उत्पत्ति आढळते. ती अशी :–१) कवि; २) ऋषि, ३) अंतरिक्ष, ४) प्रबुद्ध, ५) पिप्पलायन, ६) आविर्होत्र, ७) द्रमिल, ८) चमस् आणि ९) करभाजन, हे नऊ ऋषि येथील गोदातीरावर तपश्चर्या करण्यासाठीं राहिले. या ऋषिवरांना नंद म्हणत व हे नंद (ऋषि) ज्या तटावर राहिले तो तट गोदावरीच्या नाभी प्रदेशाचा भाग म्हणजेच नंदीतट ऊर्फ नांदेड.

नृसिंह मंदिर

इतिहासावर दृष्टिक्षेप केल्यास नांदेड या नांवाबद्दल थोडी निराळीं कारणपरंपरा दिलेली आढळून येते. चंद्रगुप्ताच्या पूर्वीं नंद घराण्याची राजवट मगध देशांत होती. या नंद घराण्यांत एकंदर नऊ राजे होऊन गेले व ते नऊ नंद म्हणून सर्वांना परिचित आहेत. या नंद साम्राज्याची मर्यादा—तट बोधनपर्यंत भिडलेली होती. नंदाच्या राज्याची शेवटची मर्यादा-तट म्हणजे नांदेड जिल्ह्याचा परिसर यावरून याला नंदतट ऊर्फ नांदेड असें नांव पडलें असावें असें कांहीं तज्ज्ञांचें मत आहे.

महानुभाव पंथीयांच्या सातशे वर्षांपूर्वीं लिहिलेल्या "लिळाचरित्र" नामक ग्रंथांत नांदेडचे व नृसिंह मूर्तीचें वर्णन आहे. या जिल्ह्यांत महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांचीं अनेक स्थानें आहेत, परंतु अलिकडेच उपलब्ध झालेल्या एका पुराव्यावरून इ. स. च्या चौथ्या शतकाच्या सुमारास नांदेडला पूर्वी नंदीतट असें नांव होतें हें अगदीं स्पष्ट झालें आहे. विदर्भांतील वत्स्य-गुल्म ऊर्फ वाशीम या गांवीं इ. स. चारशें मधील एक जुना ताम्रपट सांपडलेला आहे. त्यामध्यें खालीलप्रमाणें मजकूर कोरलेला आहे. "नंद तट विषये[1] उत्तर तीरे वत्स्य-गुल्मः[2]"

लिळा नंदीतट

१. प्रदेश. २. वाशीम.

म्हणजे नदीतट प्रदेशाच्या उत्तर टोकाला वाशीम आहे. अशा तऱ्हेचा हा प्राचीन उल्लेख आहे. वाकाटकांच्या काळीं नदीतट विषय या नांवाने नांदेडचा हा परिसर ओळखला जात असे. इ.स. पूर्वी पहिल्या शतकांत " पेरिप्लस " नांवाचा एक इतिहासकार होऊन गेला. त्याने उल्लेखिलेलें प्राचीन शहर जें तगर त्याच शहराच्या जागेवर सध्यांचे नांदेड वसलें असावें असा इतिहासकारांचा तर्क आहे.

नऊ नंदाच्या ऋषींच्या नऊ टेकड्यावर वसलेलें नांदेड धार्मिक क्षेत्राप्रमाणेंच प्राचीन काळापासून एक संस्कृतिक पीठ म्हणून प्रसिद्ध आहे. संस्कृत विद्येचें पीठ व पंडितांचें स्थान म्हणून या क्षेत्राचा लौकिक फार मोठा आहे. येथील संत परंपरा आणि पंडित परंपरा ही फार मोठी आहे. विष्णुपंत शेष, रघुनाथ शेष हे शेष घराण्यांतील विद्वान पंडित तसेच वामन पंडित हे विद्वान पंडित कवि नांदेड येथीलच. ह्या सांस्कृतिक परंपरेबरोबरच नांदेडला लाभलेला इतिहासाचा वारसाहि कांहीं थोडाथोडका नाहीं. इ. स. च्या पहिल्या शतकांत आन्ध्रभृत्य अथवा सातवाहन राज्य गोदावरीच्या तीरावर नांदेडपासून पैठणपर्यंत पसरले असावें. चौथ्या शतकांत खंदार (कंधार) हे सोगदेव राजाच्या राजधानीचें ठिकाण होतें व नांदेड येथें चालुक्य घराण्यांतील नंददेव राज्य करीत होता. गोदावरीच्या कांठीं जुन्या स्मृतींचे अवशेष बाळगून उभा असलेला नांदेडचा प्राचीन किल्ला नंदगिरी हा याच काळांत बांधण्यांत आला असावा.

वामन पंडित व नंददेव

खंदार येथें राष्ट्रकुट राजा कृष्णदेव उर्फ खंदारदेव ह्याचा नवव्या शतकांतला एक शिलालेख उपलब्ध झाला आहे. त्यावरून या भागांत राष्ट्रकूट राजे राज्य करीत असावेत असें म्हणावयास हरकत नाहीं. तसेंच अर्धापूर येथें सांपडलेल्या एका शिलालेखावरून राष्ट्रकूट राजांचा एक जुना वंश येथें राज्य करीत होता, या बद्दलची माहिती उपलब्ध झाली आहे. नांदेड जवळील 'देगलूरहोट्टल' या गांवीं सोमेश्वर चालुक्य याची राजधानी होती.

नांदेडमध्यें गोदावरीच्या तीरावर अनेक प्राचीन मंदिरें होतीं पण मुसलमानी अमदानींत तीं पाडण्यांत आलीं. नृसिंह, महादेव, गणपति या दैवतांच्या मूर्ति मात्र अद्याप चांगल्या स्थितींत आढळतात.

प्रथमतः काकतीय व त्या नंतर देवगिरीचे यादव यांच्याकडे या भागाचे अधिराज्य होते. मुसलमानांनीं केलेल्या पहिल्याच स्वारींत हा भाग त्यांच्या ताब्यांत गेला व मंदिरांचा नाश झाला. इ. स. ७१० हिजरीमध्यें हा भाग मलिक–काफूरच्या ताब्यांत गेला. खिलजी व तुघलक यांच्या अमदानींत येथील हिंदुराजवट संपुष्टात आली आणि इ. स. ७२८ हिजरीमध्यें नांदेड येथें मुसलमानी अंमल कायम झाला.

त्यानंतर बहामनी राज्य उदयाला आलें. बहामनी काळांत दक्षिणेचे चार सुभे पाडण्यांत आले. त्यावेळीं नांदेड हा भाग तेलंगणांत मोडला जात असे. बहामनी राज्याचा प्रसिद्ध वजीर महमुद गावान यानें चार सुभ्याचे आठ सुभे केले. त्यावेळीं नांदेड जिल्हा माहूर सुभा बालाघाटमध्यें समाविष्ट करण्यांत आला. खुद्द नांदेड व कंधार येथें महमूद गावानने बरेच दिवस वास्तव्य केलें. नांदेडमधील सध्यां वजीराबाद म्हणून ओळखण्यांत येत असलेला मोहल्ला खुद्द महमूद गावान यानेच वसविला.

बहामनी राज्य

बहामनी राज्याचीं जेव्हां शकलें उडाली तेव्हांपासून या भागावर बरीदशाही, कुतुबशाही, निजामशाही व आदिलशाही यांची आलटून पालटून सत्ता स्थापन झाली.

निजामशाही

अहमदनगरच्या निजामशाहीखालीं देखील नांदेड जिल्हा बराच काळ नांदला. मोगल व निजामी सरदार मलकंबर यानें सत्ता स्थापनेसाठीं नांदेड जिल्ह्याच्या परिसरांतच बऱ्याच लढाया केल्या, याविषयींची माहिती " तकमील–इ–अकबर नामा " या ग्रंथांत आढळतें. औरंगजेब सुभेदार म्हणून आला होता त्यावेळीं नांदेड जिल्हा तेलंगणाची राजधानी होती, असा उल्लेख शहाजहान नाम्यांत सांपडतो. पुढील काळांत औरंगजेबाने बीदर हें सुभ्याचे ठिकाण करून त्याला " सुभे अहमुदबाद " असें नांव दिलें. या बीदर सुभ्याची सहा सरकार व ७६ महालांत विभागणी केली. नांदेड हे त्यांपैकीं एक "सरकार" (जिल्हा) होते.

मुसलमानाच्या राजवटींतील अवशेष नांदेड जिल्ह्यांत अजूनहि दर्गे, मशीदी, घुमट यांच्या स्वरूपांत आढळतात. मीरामखां अवलिया व शहा फतेऊल राणुरी यांचे १०५१ हिजरीमध्यें बांधलेले दर्गे अजूनहि नांदेडमध्यें आहेत. मलिकंबरने बांधलेल्या मशीदी आणि सराया मुसलमानी अंमलाची साक्ष देतात.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा बहादूरशहा इ. स. १७०८ मध्यें दक्षिणेंत आला व त्याच्याबरोबरच शिखांचे दहावें धर्मगुरू गुरुगोविंदसिंग हे गोदाकांठीं नांदेड येथें आले. त्यावेळीं

गुरुगोविंदसिंग

नांदेड येथें माधवदास या नांवाचा साधु पुरुष राहात असे. गुरुगोविंदसिंगांनीं त्यांना उपदेश देऊन त्यास बंदाबहादूर असें नांव ठेवलें व मुसलमानाविरुद्ध लढण्यास त्यांना पंजाबांत पाठविलें. श्री गुरुगोविंदसिंगांना हें स्थान फारच आवडलें व त्यांनीं आपलें उर्वरित आयुष्य याच ठिकाणीं घालविलें. शिखांची गुरू करण्याची परंपरा त्यांनीं येथेंच खंडित केली व ग्रंथसाहेब हेच आपले गुरू असें सर्व शीख बांधवास सांगितलें. त्यांनीं ज्या ठिकाणीं देह ठेवला त्या ठिकाणीं त्यांची समाधी आहे व तेथें एक गुरुद्वार बांधण्यांत आलें. या मंदिरास "श्री हुजूर अपचलनगर सच खंड गुरुद्वार मंदिर" असें म्हणतात.

मोगलांच्या उतरत्या काळांत मराठे व पेशवे यांची या भागांत बराच काळपर्यंत सत्ता होती. निजाम व पेशवे यांच्यामध्यें उदगीर, खर्डा व राक्षस भुवन या ठिकाणीं ज्या महत्वाच्या लढाया

पेशवे व निजाम

झाल्या त्यावेळीं मराठवाडा भागांत कमी अधिक प्रमाणांत मराठ्यांची सत्ता होती. पेशव्यांच्या दप्तरी, कागदोपत्रीं "प्रांत गंगथडी" या नांवानें नांदेड जिल्ह्याचा उल्लेख आढळतो. चौथाई, सरदेशमुखी, घास–दाणा सरदेशमुखी इत्यादींच्या वसुलीसाठीं पेशव्यांनीं निर्माण केलेल्या यंत्रणा त्यांचे सरदार या भागांत राबवीत असत.

इ. स. १७४८ पर्यंत म्हणजे पूर्ण १०० वर्षें या भागावर निजामशाहीची अनियंत्रित राजवट चालली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हैद्राबादवर पोलिस कारवाई करण्यांत आली. आणि निजामाचें हैद्राबाद संस्थान भारतांत विलीन करण्यांत आलें. पुढें भाषावार प्रांतरचनेमध्यें मराठवाडा हा महाराष्ट्र राज्याचा घटक झाला. आजहि महाराष्ट्रांतील मराठवाड्याचा एक प्रमुख जिल्हा म्हणून नांदेड प्रसिद्ध आहे.

स्वाभाविक व राजकीय विभाग

महाराष्ट्र राज्यांतील मराठवाडा भागांत एकूण पांच जिल्हे आहेत. त्यापैकीं नांदेड हा जिल्हा फार महत्वाचा समजला जातो. महाराष्ट्राच्या पूर्व सीमेला मध्य भागापासून वरच्या बाजूकडे हा जिल्हा दक्षिणोत्तर पसरलेला आहे. महाराष्ट्राची भागीरथी म्हणून ओळखली जाणारी गोदावरी याच जिल्ह्यांतून आपला मार्ग आक्रमित जाते. गोदावरीच्या डाव्या किनाऱ्यावर वसलेलें नांदेड शहर हें नांदेड जिल्ह्यांतील महत्वाचें शहर असून जिल्हा पातळीवरील महत्वाच्या कचेऱ्या येथेंच आहेत.

नांदेड जिल्ह्याच्या उत्तरेच्या बाजूला यवतमाळ जिल्हा असून या दोन जिल्ह्यांमधील हद्द पेनगंगा नदीनें ठरविलेली आहे. नांदेड जिल्ह्याच्या पश्चिमेला परभणी जिल्हा असून नैऋत्येला उस्मानाबाद जिल्हा आहे. तसेंच पूर्व सीमा आंध्र प्रदेशांतील आदिलाबाद आणि निझामाबाद या जिल्ह्यांनीं मर्यादित केल्या आहेत.

स्वाभाविक विभागांतील बदल

राज्यपुनर्रचनेपूर्वीं नांदेड जिल्हा हा सहा तालुक्यांचा मिळून बनलेला होता. त्यांत १ नांदेड, २ कंधार, ३ हदगांव, ४ देगलूर, ५ बिलोली आणि ६ मुधोळ या तालुक्यांचा अंतर्भाव होता. शिवाय १ मुखेड आणि २ भोकर या महालांचाहि त्यांत अंतर्भाव होत असे. पण राज्य पुनर्रचनेनंतर मात्र बिचकुंदा आणि जुकल ही कंधारमधील सर्कल्स आणि १ कुबेर, २ भिन्सा व ३ मुधोळ ही मुधोळ तालुक्यांतील सर्कल्स आंध्र प्रदेशांत अंतर्भूत करण्यांत आलीं, आणि इसलांपूरसह किनवट तालुका तसेंच आंध्रप्रदेशांतील आदिलाबादचा राजुरा तालुका हे प्रदेश नांदेड जिल्ह्यांत समाविष्ट करण्यांत आले. राजुरा तालुक्याने जिल्ह्यातील मुख्य शहरांच्या दृष्टीनें आपलें वैशिष्टय ठेवलें होतें.

आज या जिल्ह्यांत सहा तालुके आणि दोन महाल मिळून सुमारें ३,९८९.०६ चौ. मैलांचा भाग समाविष्ट आहे. हा भाग समुद्रसपाटीपासून १८३० फूट उंचीवर आहे. आणि हा भाग उत्तर अक्षांश १८°–१५ आणि १९°–५५, पूर्व अक्षांश ७७°–७ आणि ७८°–१५ यांत वसलेला आहे.

डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर ऑफ लॅन्ड रेकॉर्ड्स् नांदेड यांच्या माहितीप्रमाणें प्रत्येक तालुक्याची व्याप्ती खालीलप्रमाणें आहे :—

तालुक्याचें नांव	व्याप्त भाग एकर गुंठे	व्याप्त भाग चौ. मैल
१) नांदेड	२,४६,९८८–१२	३८५.९१
२) बिलोली	३,६५,००८– ५	५७१.८७
३) देगलूर	१,६६,८३८– ६	२६०.६८
४) मुखेड	२,३०,८१५– २	३६०.६५
५) कंधार	४,००,६९५–१६	६२६.०९
६) हदगांव	३,७७,०९०– २	५८९.२०
७) भोकर	२,६७,३३१–१०	४१७.७०
८) किनवट	४,९७,२५७–१५	७७६.९६
एकूण बेरीज	२५,५३,०१३–२८	३,९८९.०६

नांदेड जिल्ह्यांत एकूण सहा तालुके व दोन महाल असून त्यांचें मुख्य ठाणे नांदेड हेंच आहे. हा जिल्हा १) नांदेड आणि २) देगलूर या दोन विभागांत विभागण्यांत आला आहे. हा सर्व भाग डेप्युटी कलेक्टरच्या व्यवस्थेखालीं आहे. त्याचप्रमाणें तालुका हा तहसीलदार आणि महाल हा नायब तहसीलदार यांच्या अधिकारांत असतो. तालुक्याचे पुन्हा दोन भाग पाडून त्यांची व्यवस्था महसूल अधिकारी (रेव्हेन्यु इन्स्पेक्टर) यांच्याकडे देण्यांत आली आहे. ग्राम व्यवस्थेची जबाबदारी पाटील (सर्वाधिकारी म्हणून) आणि पटवारी (वसुलदार म्हणून) यांवर असते.

शासकीय व्यवस्था


नांदेड जिल्ह्यांतील वसुलीचे भाग, विभाग, गांवे त्याचप्रमाणे मागासलेलीं गांवे खाली दाखविली आहेत :

विभागाचें नांव (मुख्य ठाण्यासह)	तालुक्याचें नांव	वसुलीच्या विभागाचें नांव	वसुलीच्या गांवांची संख्या	एकूण वसुलीच्या गांवांची संख्या	मागासलेलीं गांवें	मोठीं गांवें
१	२	३	४	५	६	७
नांदेड (मु.ठा.नांदेड)	नांदेड	नांदेड	५०	२००	१३	२
		नीमगांव	५०			
		अर्धापूर	५०			
		मुदखेड	५०			
	हदगांव	हदगांव	५०	१९२	७	१
		मन्था	५०			
		ताम्सा	४२			
		हिमायत नगर	५०			
	भोकर	भोकर	४४	१२३	५	१
		पेठ–उमरी	४५			
		किनी	४५			


विभागाचें नांव (मुख्य ठाण्यासह)	तालुक्याचें नांव	वसुलीच्या विभागाचें नांव	वसुलीच्या गांवांची संख्या	एकूण वसुलीच्या गांवांची संख्या	मागासलेलीं गांवें	मोठीं गांवें
१	२	३	४	५	६	७
	किनवट	किनवट	४०	२०६	१७	१
		माहूर	४७			
		पटोडा	४४			
		चिकली	४०			
		इस्लापूर	३५			
विभागीय बेरीज : ४ तालुके		१६ वसुलीचे भाग		७३१	४१	५
१	२	३	४	५	६	७
देगलूर (मु. ठा. देगलूर)	देगलूर	देगलूर	५१	१०६	८	१
		मिरखेल	५५			
	बिलोली	बिलोली	५०	२३७	१३	३
		आदमपूर	५०			
		मन्‍नूरम	४४			
		कुंडूर	४३			
		धर्माबाद	५०			
	कंधार	कंधार	५०	२०१	७	१
		लोहा	५०			
		सोनखेड	५१			
		ओस्माननगर	५०			
	मुखेड	मुखेड	४२	१२४	१	१
		जाहूर	४२			
		मुकरमाबाद	४०			
विभागीय बेरीज : ४ तालुके		१४ वसुलीचे भाग		६६८	२९	६
एकूण जिल्हा : ८ तालुके		३० वसुलीचे भाग		१,३९९	७०	११

भौगोलिक स्थिती

एकूण जमिनीपैकीं सुमारे १३ टक्के भाग हा डोंगराळ आहे. तसेंच सुमारे ८·७ टक्के भाग खडकाळ आणि ७८·३ टक्के भाग सपाटीचा आहे. सातपुड्याचा सुमारें ६२६·८ चौ. मैलाचा भाग आग्नेय–वायव्य दिशेमध्यें या जिल्ह्यांत व्यापलेला आहे. या सर्व भागांतील बहुतेक भाग घनदाट जंगलाने भरलेला आहे. यापासून बराचसा फायदा या जिल्ह्याला मिळत आला आहे. याशिवाय नैऋत्य आणि मध्य यांतील कांहीं भागांत तुरळक डोंगराळ भाग पसरलेला आहे. त्यांतल्यात्यांत किनवट, भोकर व कंधार हा भाग जास्त खडकाळ आढळतो. तसेच किनवट व भोकर या भागांत जंगलांतून मिळणारे उत्पन्न


उंच भूभाग
सखल भाग
नदी

स्वाभाविक विभाग


हदगांव
किनवट
नांदेड
भोकर
गोदावरी नदी
कंधार
मन्याड नदी
बिलोली
मुखेड
लेंडी नदी
देगलूर

बरेच आहे. उत्तरेकडील बराचसा भाग उजाड आहे. येथें क्वचितच पाणी पहावयाला सांपडते. उरलेला बाकीचा बहुतेक भाग सपाटीचा आहे.

मुख्य नदी गोदावरी व तिच्या उपनद्या मांजरा व मन्याड या जणूं दक्षिण भागाला वरदहस्तच आहेत. पेनगंगा नदी जिल्ह्याच्या पश्चिम व उत्तर भागांतून वाहते. त्याचप्रमाणें या जिल्ह्यांत पाणी पुरवठ्याच्या दृष्टीने उपयोगी अशा बऱ्याच नद्या व नाले आहेत. कांहीं योजनांपैकीं कंधारमधील मन्यार योजना ही प्रमुख योजना असून ती प्रगतिपथावर आहे. सरस्वती नदी ही वाखेडच्या डोंगरांतून येऊन उत्तरदाक्षिण वाहत जाऊन जिल्ह्याच्या पूर्व भागाकडे धांव घेते. आणि शेवटीं मालकवठा या गांवाजवळ गोदावरीला मिळते. आसना आणि सीता ह्या नद्यासुद्धां उत्तरेकडून येऊन गोदावरीला मिळतात. मांजरा नदीसुद्धां दक्षिणोत्तर वाहात असून ती उथळ पण मोठी आहे. पावसाळ्यांत नद्यांच्या पुरामुळें नद्या आपली संपत्ती किनाऱ्यावर पसरून देतात तर कधीं कधीं जमिनीची स्थिती अनुकंपनीय असते. मन्याड नदी ही मुखेड व देगलूर या भागांत पश्चिम पूर्व वाहाते व सरतेशेवटीं बिलोली तालुक्यांत मांजरा नदीशीं तिचा संगम होतो. त्याचप्रमाणें लेन्डी नदी पश्चिमपूर्व दिशेनें देगलूर तालुक्यांत संचार करते व शेवटीं मांजरा नदीला मिळते.

नद्या

नद्यांची लांबी (नांदेड जिल्ह्यांत)

अनु.	नदीचें नांव	लांबी (मै.)
१	२	३
१.	पेनगंगा	१७८.००
२.	गोदावरी	८७.६२
३.	मन्याड	७६.२५
४.	लेन्डी	३६.७५
५.	मान्ज्रा	३१.२५
६.	कैड्ड	१३.२५
७.	आसना	१२.५०
८.	सरस्वती	१२.००
९.	सीता	८.००

जिल्ह्याच्या बाह्यांगावरून नांदेड जिल्ह्याचे विशेषतः दोन भाग पडतात. एक म्हणजे खडकाळ भाग व दुसरा सपाट भाग. गोदावरी, पेनगंगा आणि मन्याड ह्या नद्यांनी जिल्ह्याचा पुष्कळसा भाग संपन्न केला आहे. मन्याड नदी उंचावरून उडी घेते तर गोदावरी ही संथपणें खालीं येते. तुलनात्मक दृष्टीने पाहतां मन्याड नदी ही जास्त संथ वाटते. एकंदरीत पाहतां येथील जमीन बहुतांशीं सुपीक आढळते. तशीच ती काळी असून कांहीं भागांत ठिसूळ आहे. मन्याड व गोदावरी यांच्या कांठची जमीन जास्त सुपीक आहे. अशाप्रकारे जमिनीचें वैचित्र्य सर्वत्र आढळतें. शेतकी दृष्ट्या कापसासाठीं लागणारी काळी जमीन व ' छिल्का ' या पद्धतीची जमीन जिल्ह्यांत विशेषेकरून आहे व त्यामुळें येथें पिकांची विविधता जमिनीच्या प्रकारावर अवलंबून असते.


जमीन

हवामान

उष्णतामानाच्या बाबतींत ह्या जिल्ह्याचा उच्चांक मानला जातो. येथें उन्हाळ्यांत जास्त उष्ण आणि हिवाळ्यांत जास्त थंड असें वातावरण असतें. परंतु हवामान कोरडे असल्याने

राजकीय विभाग

● *जिल्ह्याचें मुख्य ठिकाण*
• *तालुक्याचें मुख्य ठिकाण*
...... *तालुका सरहद्द*



हवामान आरोग्यास चांगले आहे. आंध्र प्रदेशालगत असलेला किनवटचा भाग हा तुलनात्मकदृष्ट्या जास्त उष्ण असून तेथें सर्वसाधारणपणें उष्णतामान ११२ फॅ. असतें. पावसाळ्याच्या सुरवातीला या भागाला मलेरियाचा फारच त्रास होतो. हदगांव, किनवट व कंधार यासारखे जंगलमय भागसुद्धां संधिवात व पानथरी या रोगाने पछाडलेले आढळतात. तथापि नांदेड जिल्ह्यांतील कॉलरा, देवी, हगवण, डायरिया यामुळें होणाऱ्या मृत्यूचें प्रमाण घटत चाललें आहे. कॉलरा व देवी यामुळें १९५९ सालीं अनुक्रमें झालेली मृत्युसंख्या १० व ६३ आहे तर १९६० सालीं तीच अनुक्रमें २ व ८ इतकी घटली आहे. इतर रोगांनी होणाऱ्या मृत्युसंख्येंतसुद्धां कमी प्रमाण आढळून येतें. येथील हवामान गुरांना फारच पोषक आहे हें मात्र निःसंशय.

उष्णतामान

नांदेड शहरांतील उष्णतामान

१९५१ ते १९६० मधील खुद्द नांदेड मधील झालेल्या उष्णतामानांतील चढउतारांची संपूर्ण स्पष्ट कल्पना खालीं दिलेल्या तक्त्यावरून येते.

वर्ष	सरासरी कमाल तपमान	सर्वांत जास्त तपमान	काल	सरासरी किमान तपमान	सर्वांत कमी तपमान	काल
१	२	३	४	५	६	७
१९५१	३४.१	४५.०	मे	१८.४	४.४	डिसेंबर
१९५२	३४.१	४५.०	मे	१८.४	४.५	डिसेंबर
१९५३	३३.५	४६.१	जून	१९.३	३.९	जानेवारी
१९५४	३४.२	४६.१	मे	१९.५	४.७	जानेवारी
१९५५	३२.८	४४.९	मे	१८.८	५.३	जानेवारी
१९५६	३३.१	४५.२	मे	१९.५	५.६	डिसेंबर
१९५७	३४.२	४४.२	मे	१९.२	६.४	जानेवारी
१९५८	३४.०	४५.८	मे	१९.८	५.४	जानेवारी
१९५९	३३.६	४४.७	मे	१९.६	८.३	डिसेंबर
१९६०	३४.३	४४.४	मे	२१.४	१२.५	डिसेंबर

गेल्या दशकांत सर्वसाधारण कमाल तपमान ३३·८° से. (९२·८ फॅ.) व सर्वसाधारण किमान तपमान १९·४° सें (६६·९ फॅ.) हें डिसेम्बर–जानेवारींत आढळतें. मागील दशकांत कमाल तपमानाचा आंकडा ११५° फॅ. पर्यंत गेला होता. ही गोष्ट १९५३ ची आहे व किमान तपमानाचा आंकडा ३९° फॅ. पर्यंत १९५३ च्या जानेवारींत गेला होता; व म्हणून १९५३ हें साल कमाल व किमान तपमानाच्या उच्चांकाचे साल म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें १९६० साल हें तपमानाच्या दृष्टीनें चांगलें वर्ष म्हणून समजलें गेलें. त्यावेळीं कमाल तपमान १११·९° फॅ. व किमान तपमान ५४·५° फॅ. होतें.

नांदेड हें हवामानाच्या दृष्टीनें मोठें विषम आहे आणि त्यामुळें नौकरी धंद्यानिमित्त येणाऱ्या लोकांना हें फारच जाणवतें. मागील दशकांत नांदेड जिल्ह्यांतील कमाल व किमान तपमान दर्शक व त्यांतील फरक दर्शविणारा तक्ता पुढच्या पानावर दिला आहे. त्यावरून वरील हवामाना-संबंधीची पूर्ण कल्पना येईल.

	जाने.	फेब्रु.	मार्च	एप्रिल	मे	जून	जुलै	ऑगस्ट	सप्टें.	ऑक्टो.	नोव्हें.	डिसें.
सर्वसाधारण कमाल तपमान	३०.०	३३.६	३७.५	३९.९	४२.२	३७.७	३१.७	३०.४	३१.३	३१.१	३०.३	२९.४
सर्वसाधारण किमान तपमान	११.३	१४.०	१८.२	२४.४	२६.५	२४.७	२३.१	२२.६	२२.३	१९.८	१२.६	११.०
त्यांतील फरक	१८.७	१९.०	१९.३	१५.५	१५.७	१३.००	१८.६	१७.८	१९.०	११.३	१७.७	१८.४

मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्याच्या सुमारास येथील उष्णतामान सर्वोच्च बिंदु गाठते. गेल्या दहा वर्षातील सरासरीवरून असे दिसून येते कीं, हें उष्णतामान साधारणपणे सर्वोच्च बिंदु गाठतें तेव्हां ४६.७° सें. म्हणजेच ११५° फॅ. इतके असतें.

तसेंच उष्णतामान डिसेंबर मध्यें किमान पातळीवर येतें.

वरील सर्व विवेचनावरून आपल्याला एक गोष्ट लक्षांत येईल कीं, नांदेडचें हवामान विषम आहे. बाहेरून नौकरीच्या निमित्ताने येणाऱ्या माणसाला तर उन्हाळ्यांत जीव अगदी नकोसा होतो आणि थंडीत तो अगदी गारठून जातो.

नांदेड जिल्ह्यांतील मे महिना म्हणजे अंगाची अगदी कहाली करून सोडणारा; तर डिसेंबरचा मध्य म्हणजे गारठून टाकणारा.एप्रिल महिन्यांतील उन्हाळा जून महिन्याच्या उन्हाळ्याच्या मानानें जास्त वाटतो. कारण जून महिन्यांत आकाशांत ढग तरंगायला लागतात. आणि त्यामुळें उन्हाची तीव्रता निदान कमी भासते.

" नेमेचि येतो मग पावसाळा..." उन्हाळ्यांत बेजारलेला जीव पावसाच्या पहिल्या सरीच्या मंद मधुर मृदगंधामुळें जरा सुखावू लागतो. पण हळूं हळूं पावसाचें प्रमाण वाढूं लागतें.

या जिल्ह्याची पावसाबाबतची परिस्थिती राज्याच्या इतर जिल्ह्यांपेक्षां कांहीं खास निराळी आहे असें मुळींच नाहीं. या जिल्ह्याला मिळणाऱ्या पावसांपैकीं ७५ टक्के पाऊस इशान्य मान्सून वाऱ्यापासून मिळतो (जून ते सप्टेंबर) आणि १६ टक्के पाऊस मान्सून निघून गेल्यावर मिळतो. हा पाऊस सांधारणं आक्टोबर ते डिसेंबरच्या दरम्यान पडतो.

या जिल्ह्यांच्या जमिनीचा पोत, पिकाचा प्रकार (कापूस) आणि पावसाच्या बाबतींत देवाची दया या तीहींचा येथें इतका सुंदर व भाग्यदायक मिलाफ झाला आहे कीं, पावसाचा येणारा प्रत्येक थेंब उन्हाळ्याचा ताप तर हटतोच पण पुढील वर्षासाठीं समृद्धीचे कणही घेऊन येतो.

अरबी समुद्राच्या मान्सून वाऱ्यांच्या आगमनाबरोबर शेताशेतांतून शेतकरी खरीप पिकासाठीं कंबर कसून राबायला लागतात. त्या आधीं आलेले मान्सूनपूर्व वारे एकंदर पावसांपैकीं ७ टक्के पाऊस आणतात. वखवखलेली जमीन थंड होते. हिरवळीची शाल तिच्या अंगावर सळसळायला लागते आणि पेरे सुरूं होतात. मग मान्सून येतो. ८० टक्के जमीन या मान्सून वाऱ्यामुळें भिजते. शेतांतून पिके डुलायला लागतात. माचा-माचा वरून गोफणी भिरभिरायला लागतात व दाट पिकांतून ललकाऱ्यांचा हलकल्लोळ उडतो.

आणि म्हणून इथल्या लोकांना मान्सून वारे म्हणजे देवदूत वाटले तर त्यांत नवल नाहीं.

नांदेड जिल्हा आणि "गर्जणारे चाळीस"

शाळकरी मुलांना या "गर्जणाऱ्या चाळिसां"चा पावसाचा हा एक प्रकार म्हणून चांगलाच परिचय आहे. याला इंग्रजींत "विंटर मान्सून" म्हणतात. या विंटर मान्सूनमुळें या एकंदर पावसापैकीं २० टक्के पाऊस मिळतो. हा साधारणपणें जानेवारी, फेब्रुवारी महिन्यांत पडतो. रब्बीच्या पिकाला या पावसाची फारच मोलाची मदत मिळते. गेल्या दहा वर्षांतील पावसाची तपशीलवार आंकडेवारी पाहिली तर आपल्याला असें म्हणतां येईल कीं, सर्व तालुके मिळून नांदेड जिल्ह्यांत साधारणपणें १०३४ मि. मिटर पाऊस पडतो. एकंदर पावसाचे दिवस साधारणपणे ६२ ते ६४ इतके होतात. देगलूर तालुक्यांत सर्वांत जास्त पाऊस पडतो आणि मुखेड तालुक्यांत सर्वांत कमी पाऊस पडतो.

एकंदर पावसापैकीं ४५ टक्के पाऊस ऑगस्टमध्यें पडतो. आणि याच सुमारास नांदेडचा जीव पुराच्या धास्तीनें खालीवर व्हायला लागतो. एकदा ऑगस्ट महिना मागे पडला कीं, गोदावरी आपलें चंडिकेचें स्वरूप हळूं हळूं बदलायला लागते.

१९६१मध्यें गोदावरीला महापूर आला होता. गोदामाईच्या मनांत काय होतें कुणास ठाऊक! पण एवढें मात्र खरें कीं आपल्या लाटांचे अनंत हात पसरून तिनें सारे नांदेड शहर चांचपून बघितलें...!

शैक्षणिक सोयी

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतानें लोकशाही राज्यपद्धतीचा अंगिकार केला आहे. निर्मळ, निरोगी व सुदृढ लोकशाहीकरितां जनतेस आपल्या हक्कांची व कर्तव्यांची जाणीव असणें आवश्यक असतें, आणि त्यासाठीं सर्वजण शिक्षित असणें आवश्यक आहे. शिक्षणाच्या सोयी उपलब्ध झाल्याशिवाय लोकशाहीसाठीं जनता तयार होणें कठीण असतें.

मराठवाडा निजामाच्या राजवटींत शैक्षणिक बाबतींत मागासलेला राहिला. परंतु त्यानंतर मात्र इतर बाबींप्रमाणेंच शिक्षणाकडेहि लक्ष देण्यांत आलें व बरीच सुधारणा घडवून आणण्यांत आली.

प्राथमिक शाळा

गेल्या दहा वर्षांत नांदेड जिल्ह्यामधील प्राथमिक शाळांची संख्या २४४ टक्क्यांनीं वाढलेली आहे. इ. स. १९५०–५१ मध्यें प्राथमिक शाळांची संख्या ४०३ होती तर १९६०–६१ मध्यें त्यांची वाढ ८९३ पर्यंत झालेली आहे. कंधार तालुक्याचा शाळांच्या बाबतींत सन १९५१ सालीं पहिला क्रमांक लागत होता. जिल्ह्यांतील एकूण शाळांपैकीं २१.३ टक्के शाळा या एकाच तालुक्यामध्यें होत्या. सनं १९६१ मध्यें सुद्धां या तालुक्यानें आपला प्रथम क्रमांक सोडला नाहीं. १९६०–६१ मध्यें एकूण संख्येच्या १८.५ टक्के शाळा या तालुक्यांमध्यें वसलेल्या आहेत. जरी शाळांची संख्या एकूण वाढलेली असली तरी सर्वसाधारणपणें ३.४ चौरस मैलामागें १ शाळा असें प्रमाण या तालुक्यांत पडतें. सर्व जिल्ह्याचा विचार करतां ४.९ चौरस मैलामागें १ प्राथमिक शाळा असें प्रमाण पडतें. पुढें दिलेल्या तक्त्यामध्यें नांदेड जिल्ह्यांतील तालुक्यांत शिक्षण संस्थांच्या बाबतींत आजपर्यंत झालेल्या सुधारणांची आंकडेवारी दिली आहे.

पुढील तक्त्यावरून असें दिसून येईल कीं, किनवट तालुक्यांत प्राथमिक शाळांचें प्रमाण दर ६·६ चौ. मैलास एक शाळा असें पडतें.

विद्यार्थी व शिक्षण

१९५०–५१ मध्यें जिल्ह्यांत प्राथमिक शाळा ४७३ होत्या व विद्यार्थ्यांची संख्या २१.९१५ होती. विद्यार्थी विद्यार्थिनी यांचें प्रमाण ९१४:९ असें होतें. शिक्षकांची संख्या ८८८ होती. म्हणजेच दर शाळामागें २२ शिक्षक व २५ विद्यार्थ्यांमध्यें १ शिक्षक असें प्रमाण पडतें. या स्थितीमध्यें १९६०–६१ मध्यें बरीच सुधारणा झाली असून शाळांची संख्या २४४ टक्क्यांनी वाढलेली आहे. तसेंच विद्यार्थी व शिक्षक यांची संख्याहि अनुक्रमे २७७ व १९४ नी वाढली आहे. विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचें प्रमाण आतां ७५:२५ असें पडतें. ही खात्रीनें समाधानाची गोष्ट असून नजिकच्या काळांत हें प्रमाण आणखी वाढेल, अशी आशा करण्यास मुळींच हरकत नाहीं. शाळा व शाळां-

नांदेड जिल्ह्यांतील शैक्षणिक संस्था (तालुक्यानुसार)

शाळांचे प्रकार	वर्ष	तपशील	नांदेड	बिलोली	देगलूर	मुखेड	कंधार	हदगांव	भोकर	किनवट	एकूण (जिल्ह्यांतील)
प्राथमिक शाळा	१९५०–५१	संस्थांची संख्या	६७	६५	३८	३०	८७	५८	२८	३०	४०३
		जिल्ह्याशीं एकूण प्रमाण	१६.६	१६.१	९.४	७.५	२१.६	१४.४	६.९	७.५	१००.००
	१९६०–६१	संस्थांची संख्या	१४३	१५६	७१	१०१	१८२	१२२	९०	११८	९८३
		जिल्ह्याशी एकूण प्रमाण	१४.५	१५.९	७.२	१०.३	१८.५	१२.४	९.२	१२.००	१००.००
		एका संस्थेचें चौरस मैलाशीं पडणारें प्रमाण	२.७	३.७	३.७	३.६	३.४	४.८	४.६	६.६	४.१
दुय्यम शाळा	१९५०–५१	संस्थांची सख्या	४	...	१	१	१	...	...	१	८
	१९६०–६१	संस्थांची संख्या	१५	१०	८	९	१७	५	२	१	६७
		एका संस्थेचे चौरस मैलाशीं पडणारें प्रमाण	२५.७	५७.२	३२.६	४०.१	३६.८	११७.८	२०९.०	७७७.०	५९.००
विशेष प्रकारच्या शाळा	१९५०–५१	संस्थांची संख्या									
	१९६०–६१	संस्थांची संख्या	६	१	...	१	...	...	...	...	८
महाविद्यालयें	१९५०–५१	संस्थांची संख्या	१	...	...	...	...	...	...	...	१
	१९६०–६१	संस्थांची संख्या	२	...	...	...	१	...	...	...	३

मधून शिक्षण घेणारे विद्यार्थी यांची संख्या बरीच वाढलेली असली तरी शिक्षकांची संख्या मात्र त्या प्रमाणांत वाढलेली नाहीं. वस्तुतः सध्यां १० शाळामागें १८ शिक्षक असें प्रमाण दिसतें आणि सर्वसाधारणपणें ३५ विद्यार्थ्यांमागें १ शिक्षक, म्हणजेच एका शिक्षकास ३५ विद्यार्थ्यांना शिकविण्याचें कार्य करावें लागते. यावरून असा निष्कर्ष निघतो कीं, १० वर्षांपूर्वीपेक्षां आज विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यामुळें प्राथमिक शिक्षकांवर विद्यादानाचा भार अधिक पडतो.

दुय्यम शाळा

जिल्ह्यामध्यें दुय्यम शाळांच्या बाबतींतहि ठळकपणें डोळ्यांत भरेल इतपत सुधारणा झालेली आहे असें दिसून येईल. १९५०–५१ मध्यें जिल्ह्यांत दुय्यम शाळा केवळ ८ च होत्या तर १९६०–६१ मध्यें ही संख्या ६८ पर्यंत वाढलेली आहे. त्याचप्रमाणें गेल्या दहा वर्षांत विद्यार्थ्यांची संख्याहि ४११ टक्क्यांनीं वाढली आहे. ५०–५१ सालीं विद्यार्थी–विद्यार्थिनी यांचे प्रमाण ८६:१४ असें होतें; ६०–६१ सालांत हें प्रमाण अत्यंत थोड्या प्रमाणांत खालीं आलें आहे असें आढळतें. दुय्यमशाळांमध्यें ६०–६१ मध्यें हें प्रमाण १३ मुलीमागें ८७ मुलें असें आढळून आलें आहे. तसेंच सन १९६०–६१ मध्यें दुय्यम शाळेंतील एका शिक्षकास २२ विद्यार्थ्यांना विद्यादान करण्याचें कार्य करावें लागत असे.

इतर शाळा

सन १९५०–५१ मध्यें अशा तऱ्हेची एकहि शाळा जिल्ह्यांत नव्हती तर सन १९६०–६१ मध्यें अशा ८ शाळा स्थापन होऊन त्यामध्यें ६६५ विद्यार्थी शिक्षण घेत होते व ३७ शिक्षक अशा शाळामधून विद्यादानाचें कार्य करीत होते. अपेक्षेप्रमाणेंच विद्यार्थिनींचें प्रमाण इतर शाळा व कालेजिसच्या मानानें थोडेसें सुधारलेलें आहे. विद्यार्थीचें अशा विशेष प्रकारच्या शाळांमधून शिकणाऱ्या विद्यार्थिनींशीं ७२:२८ असें प्रमाण आढळतें. वेगवेगळ्या प्रकारच्या अशा या शाळा आहेत. या आठ शाळापैकी सहा शाळा तर खुद्द नांदेड शहरांतच आहेत, व उरलेल्या दोन शाळा बिलोली व मुखेड तालुक्यांत आहेत. या विशेष प्रकारच्या शाळा पुढीलप्रमाणें होत:–

१) अभिनव चित्रशाळा, नांदेड

२) गायन वादन विद्यालय, नांदेड

३) संस्कृत पाठशाळा, नांदेड

४) बालक मंदिर, नांदेड

५) सरकारी मूलोद्योग प्रशिक्षण महाविद्यालय, जुने नांदेड

६) सरकारी मूलोद्योग प्रशिक्षण महाविद्यालय, नवे नांदेड

७) संस्कृत पाठशाळा, कहाळा ता. बिलोली

८) संस्कृत पाठशाळा, मुखेड

(मूलोद्योग प्रशिक्षण महाविद्यालयें हीं शिक्षणाधिकारी यांचे अधिकाराखालीं येतात.)

महाविद्यालयें

सन १९५१ मध्यें जिल्ह्यामध्यें नांदेडला फक्त एक महाविद्यालय होतें. आतां येथें ३ महाविद्यालयें असून खुद्द नांदेडला २ व कंधारला १ महाविद्यालय आहे. हीं तिन्हीं महाविद्यालयें मिळून एकूण ७३८ विद्यार्थांना महाविद्यालयीन शिक्षण देण्याचें कार्य करीत असून त्यामध्यें एकूण ८५ शिक्षक हें कार्य करीत आहेत. महाविद्यालयामध्यें विद्यार्थीनींचें विद्यार्थ्यांशीं असलेलें प्रमाण हें शाळांच्या मानानें फारच कमी आहे. शंभर विद्यार्थ्यांमध्यें सात मुली असें ठोकळ मानाने प्रमाण दिसून येतें.


पीपल्स कॉलेज, नांदेड:—नांदेड गांवापासून सुमारे अर्ध्या मैलावर हें महाविद्यालय आहे. जवळ जवळ गेल्या १० वर्षांपासून हे अस्तित्वांत आहे. कला, विज्ञान व व्यापार या विभागांच्या शिक्षणाची सोय येथें करण्यांत आलेली आहे. अतिशय विस्तृत जागेमध्यें उभारलेल्या भव्य इमारतीमध्यें महाविद्यालय आहे.

सरकारी आयुर्वेदिक महाविद्यालय, नांदेड—नांदेड येथील या आयुर्वेदिक महाविद्यालयांत आयुर्वेदिक शाखेचें शिक्षण दिलें जातें. संपूर्ण मराठवाड्यांतून विद्यार्थी येथें शिक्षणासाठीं येतात.

शिवाजी मोफत महाविद्यालय, कंधार—हे खरोखरच नांवाप्रमाणें मोफत (निःशुल्क) विद्यालय आहे. जेथें कोठल्याहि तऱ्हेचें शुल्क आकारण्यांत येत नाहीं. ज्यांना उच्च शिक्षण घेण्याची इच्छा आहे परंतु कांहीं कारणानें ज्यांना तें शक्य होत नाहीं अशांना महाविद्यालयीन उच्च शिक्षण देण्याचे अतिशय उदात्त व अनुकरणीय असें कार्य हें महाविद्यालय करीत असून या महाविद्यालयाची कीर्ति दिवसेंदिवस वाढत आहे.

विद्यार्थ्यांच्या संख्येचा तक्ता

शाळा	वर्ष	संस्था	विद्यार्थी			शिक्षक
			मुलें	मुली	एकूण	
प्राथमिक	१९५०-५१	४०३	१९८९८ (९१)	२०१७ (९)	२१९१५ (१००)	८८८
	१९६०-६१	९८३	४५४२६ (७५)	१५२६९ (२५)	६०६९५ (१००)	१७२३
	१० वर्षांतील शेकडा वाढ	२४४%	२२८%	७५७%	२७७%	१९४%
दुय्यम	१९५०-५१	८	३५०४ (८६)	४८८ (१४)	३५९२ (१००)	१७५
	१९६०-६१	६७	१२९१८ (८७)	१८५९ (१३)	१४७७७ (१००)	६६३
	१० वर्षांतील शेंकडा वाढ	८२७%	३६९%	३८१%	४११%	३७९%
इतर	१९५०-५१	—	—	—	—	—
	१९६०-६१	८	४७९ (७२)	१८६ (२८)	६६५ (१००)	३७
महाविद्यालयें	१९५०-५१	१	...... उपलब्ध नाहीं			—
	१९६०-६१	३	६७५ (९३)	५३ (०७)	७२८ (१००)	८५


कापूस
गहूं
तांदूळ
ज्वारी
जंगले
पिकें
किनवट
हदगांव
नांदेड
भोकर
कंधार
बिलोली
मुखेड
देगलूर

कृषि व्यवसाय

नांदेड जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचें मूळ हें कृषिव्यवसायांतच आहे. याचें सर्वांत महत्वाचें कारण म्हणजे एकंदर लोकसंख्येच्या ७६ टक्के लोक शेती अथवा कृषिव्यवसायाकडे उपजीविकेचे साधन म्हणून पाहतात. अर्थातच नांदेड जिल्हा हा मराठवाड्यांतील एक सुपीक जिल्हा होय. कृषिव्यवसायामुळें मिळणारे उत्पन्न हेंच जिल्ह्याचें महत्वाचें उत्पन्न होय.

शेतीचे हंगाम

या जिल्ह्यामध्यें मुख्यतः खरीपाचे व रब्बीचे असे दोनच हंगाम आहेत. ज्या प्रदेशांत कोरड-वाहू जमिनी जास्त आहेत तेथें केवळ लहरी मान्सूनच्या पावसावरच अवलंबून राहावें लागतें. अशा प्रदेशामध्यें शेतकरी फक्त खरीपाची पिकेच काढतात. मात्र ज्या ज्या ठिकाणीं खोल व काळी जमीन आहे—सुपीकता आहे व पाऊस पडून गेल्यानंतर जमिनींत बराच काळ ओलावा राहतो त्या ठिकाणीं रब्बीचीं पिकें लावलीं जातात. बहुशः विहिरीच्या पाण्यावरच शेती केली जाते. कंधार, मुखेड व नांदेड तालुक्यामध्यें पाण्यासाठीं फार खोल खणावें लागत नाहीं. अर्थातच विहिरी खोदण्यासाठीं खर्च बराच कमी येतो. यामुळेंच ऊंस वगैरे पिकांसाठीं विहिरीच्या पाण्याचाच उपयोग केला जातो.

खरीप व रबी

साधारणपणें खरीप व रब्बी हे दोनच हंगाम नांदेड जिल्ह्यांत आहेत. मात्र कांहीं ठिकाणीं खरीपाची व रब्बीची दोन्ही पिके काढलीं जातात व त्या ठिकाणीं शेतकरी बाराहि महिने कृषि व्यवसायांतच असतात. ज्या प्रदेशांत केवळ खरीपाची पिकें काढलीं जातात त्या प्रदेशांत जून ते डिसेंबर पर्यंत मुख्यतः कृषि व्यवसाय चालतो. उरलेल्या काळामध्यें मात्र या शेतकऱ्यांना दुसरा व्यवसाय शोधावा लागतो. मुख्यतः हे शेतकरी कापड गिरण्यामध्यें रोजगार करतात असें दिसून येतें. मान्सूनपूर्वीच पेरणीसाठीं जमिनीची मशागत करून ठेवावी लागते. साधारणतः हें काम मे महिन्यांतच केलें जातें. जमिनीची मशागत झाल्यावर शेण इत्यादि सेंद्रीय खतें पसरलीं जातात. खतें परिणामकारक व्हावीत म्हणून मान्सूनच्या पहिल्या कांहीं सरी पडून गेल्यानंतर खतें पसरलीं जातात. मेच्या अखेरीस अथवा जूनच्या सुरुवातीस ही पद्धत अंमलांत आणतात.

जूनच्या अखेरीला मान्सूनच्या जोरदार सरी पडूं लागतांच पेरणी केली जाते. क्वचित प्रसंगी मान्सून उशीरा सुरूं झाल्यास पिकांची पेरणी उशीरा करावी लागते. सुमारे १०–१५ दिवसांनी पिकें ३–४ फूट उंच होईपर्यंत कोळपणी केली जाते. याबरोबरच रासायनिक खतें तयार

केलीं जातात. अनेक वेळां किडीमुळें पिकांचा नाश होतो. कीटक नाशक द्रव्यांचा उपयोग याचवेळीं केला जातो.

शेतकऱ्यांच्या जीवनांतील अत्यंत आनंदाचे दिवस सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस कापणीच्या वेळीं येतात. पिकांच्या कापणीचे दिवस अर्थात्‌च पिकांच्या स्वरूपानुसार बदलतात. उदा.— मूग व उडीद यांची कापणी सप्टेंबरचे सुरुवातीस केली जाते तर ज्वारीच्या पिकांची कापणी ऑक्टोबरमध्यें होते. भाताची कापणी नोव्हेंबरमध्यें केली जाते. त्यानंतर पीक विविध अवस्थांमधून प्रवास करतें अन् शेवटच्या अवस्थेंत तें बाजारपेठांमध्यें विक्रीसाठीं आणलें जातें.

साधारणतः मे व जून महिन्यांत रब्बी पिकांसाठीं नांगरणी कोळपणी केली जाते. जून, जुलै व ऑगस्ट या महिन्यामध्यें कमीत कमी ३ ते ४ वेळां कोळपणी केली जाते.

हिरवें खत

हिरव्या खताची योजना अस्तित्वांत आहे. ज्या ठिकाणीं पाणी पुरवठ्याची व्यवस्था आहे अगर जेथें सुपीक जमीन आढळते तेथें जमिनीच्या एका तुकड्यांत कडधान्याचें बीं पेरण्यांत येतें. अशा तऱ्हेची पेरणी साधारणपणें जून महिन्यामध्यें केली जाते. जेव्हां (सर्वसाधारणपणें ऑगस्ट महिन्यांत) अशा तऱ्हेचीं पिकें साधारणपणे तीन फुटांपर्यंत वाढतात तेव्हां शेताचा दुसरा म्हणजे मोकळा भाग नांगरून त्यामध्यें अशीं पिकें उपटून त्या जमिनींत गाडण्यांत येतात. अशा तऱ्हेने पुरलेल्या कडधान्याच्या झुडूपांचे पाऊस पडल्यावर उत्कृष्ट खत बनते. रब्बीच्या पिकांसाठीं ऑक्टोबर महिन्यांत पेरणी करण्यांत येते. अशा तऱ्हेच्या पिकांसाठीं खुरपणी किंवा मशागत केली जात नाहीं. तसेंच गवत, झुडुपे वगैरे हातानेंच उपटून टाकण्यांत येतात. रब्बी पिकांची कापणी साधारणपणें फेब्रुवारी अगर मार्च महिन्यांत केली जाते.

लागवडीखालीं असलेली जमीन

जास्तीत जास्त प्रमाणांत व योग्य प्रकारें जमीन लागवडीखालीं आणणें हें आर्थिक विकासाच्या दृष्टीनें फार महत्वाचें कार्य होय. या विषयावरील उपलब्ध आंकडेवारी मुख्यतः हेंच दर्शविते कीं, मानवी प्रयत्नांना निसर्गाने किती प्रमाणांवर साथ दिली ! मानवी प्रयत्न कितपत यशस्वी झाले ? व अर्थव्यवस्थेतील महत्वाची पायरी म्हणून याचा कितपत उपयोग होऊं शकतो. अत्यंत सुपीक अशा जमिनीची देणगी ज्या नांदेड जिल्ह्यास मिळाली आहे त्या प्रदेशांत शेती हा एक प्रमुख व्यवसाय चालतो यांत नवल तें काय ? बोलके आंकडेच यांची साक्ष पटवतात. एकंदर जमिनीच्या ६६ टक्के जमीन लागवडीखालीं आणली जाते. मात्र हेहि तितकेंच खरे कीं वर्षांतून दोन पिकें सुमारे १ टक्का जमिनींतच काढलीं जातात. पाटबंधारे व पाणीपुरवठा यांच्या कमतरतेमुळेंच निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून राहावें लागतें आणि दोन पिकें काढणें शक्य होत नाहीं.

पूर्वानुभवावर आधारीत अशा एका जुन्या परंपरेवर लोकांचा फार विश्वास आहे. लोकांचा समज असा कीं जमीन ही आपली माता होय. कांहीं काळ पर्यंत जमिनीचा कांहीं भाग पिकाखालीं आणला तर पुढील वर्षांत त्या भागांत विशेष चांगलें पीक येत नाहीं. अशा प्रकारें लागवडीखालीं जी जमीन आणली जात नाहीं ती सुमारें एक टक्का होय. सुमारे दोन टक्के जमीन या ना त्या कारणासाठीं लागवडीखालीं आणली जात नाहीं. शेतीशिवाय इतर उपयोगासाठीं जी जमीन वापरली जाते ती साधारणतः तीन टक्के होय.

आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे सुमारे सहा टक्के जमीन गुरांढोरासाठीं कुरणें तयार करण्याकरितां वापरलीं जाते.

तक्का क्रमांक २ (अ)

नांदेड जिल्ह्यांतील लागवडीखाली असलेल्या जमिनींची तुलनात्मक आंकडेवारी (१९५४–५५ ते १९५९–६०)

जमिनीचा प्रकार	१९५४–५५	१९५५–५६	१९५६–५७	१९५७–५८	१९५८–५९	१९५९–६०	टीप
एकूण भौगोलिक प्रदेश	२५,२७,१२३	२५,२३,२३८	२५,५९,९७३	२५,६०,८८९	२५,५३,०१२	२५,५३,०१२	
एकूण जंगले	१,८९,८०१	१,९७,७६३	१,९३,४७१	१,८६,१७७	१,९५,७४३	१,९५,७५३	कंसातील
	(७.५२)	(७.८३)	(७.५६)	(७.२६)	(७.६३)	(७.६६)	आंकडे हे
पडीक जमीन	७२,४२३	६२,१४०	४३,८०९	५७,४१८	५२,९७३	४३,८०९	एकंदर
	(२.८६)	(२.४६)	(१.७१)	(२.२४)	(२.०७)	(१.७१)	भौगोलिक
शेतीशिवाय उपयोगांत	८९,७०७	८०,३४८	८९,४५१	५८,४२५	८४,८९७	८९,४४३	जमिनीशी
येणारी जमीन	(३.५५)	(३.१८)	(३.४९)	(२.२८)	(३.३२)	(३.९०)	तुलनात्मक
शेतीस उपयोगी पण	३९,८३१	६६,१७९	६०,००१	५८,०२६	६१,६०१	५७,००१	आंकडे
उपयोगांत नसलेली	(१.५७)	(२.११)	(२.३४)	(२.२७)	(२.०२)	(२.१९)	दर्शवितात.
झाडे झुडपे	१०,१९८	९,३०६	१५,९२२	१३,१००	१४,९८०	१५,६२२	
	(०.४०)	(०.३६)	(०.६२)	(०.५७)	(०.५८)	(०.६१)	
चराऊ जमीन	१,८९,६१२	१,९६,५१५	१,६१,२९९	४,३२,२४४	१,३४,२५९	१,५४,३८९	
	(७.५०)	(७.६५)	(६.३२)	(५.३६)	(५.२५)	(६.०४)	
पडीत ठेवलेली जमीन	२,५२,००४	१,९९,३७२	२,०२,३२१	२,५५,३१४	२,२४,१३६	२,१२,१८१	
(कस वाढण्यासाठीं)	(९.९८)	(७.८९)	(७.२१)	(९.९६)	(८.७७)	(८.२३)	
पडीत ठेवलेली जमीन	—	—	२०,९५२	३५,३८३	२४,२५५	२१,६६९	
(इतर कारणासाठीं)			(०.८१)	(१.३७)	(०.९५)	(१.०८)	
एकूण लागवडीखालील प्रदेश	१६,८३,५०७	१७,४१,६१५	१७,७२,७४७	१७,५८,७०२	१७,७०,२१८	१७,५६,४५६	
	(६६.६२)	(६८.५२)	(६९.२४)	(६८.६९)	(६९.६१)	(६९.७८)	
एकूण पिकाखालील प्रदेश	१६,९७,१५७	१७,५२,६३५	१७,८४,५९३	१७,७६,४१८	१७,८६,२१४	१७,८५,६५८	

तक्ता क्रमांक २ (ब)

विविध पिकांखालीं असलेला प्रदेश (आंकडे हजार एकर मध्यें)

अनु.	पीक	१९५४–५५		.१९५५–५६		१९५६–५७		१९५७–५८		१९५८–५९		१९५९–६०	
		प्रदेश	टक्केवारी	प्रदेश	टक्केवारी	प्रदेश	टक्केवारी	प्रदेश	टक्केवारी	प्रदेश	टक्केवारी	प्रदेश	टक्केवारी
१	२	३(अ)	३(ब)	४(अ)	४(ब)	५(अ)	४(ब)	६(अ)	६(ब)	७(अ)	७(ब)	८(अ)	८(ब)
१.	द्विदल धान्यें												
	(१) तांदूळ	३४.०	२.०	३७.५	२.१	४२.७	२.४	४४.२	२.५	४८.७	२.७	४९.६	२.८
	(२) गहूं	५७.१	३.३	८२.८	४.८	६६.४	३.७	६७.१	३.८	६६.९	३.७	६५.७	३.७
	(३) ज्वारी (खरीप	—	—	—	—	५४८.९	३०.८	५५१.०	८१.०	५८९.७	३३.०	५७०.९	३२.०
	(४) ज्वारी (रब्बी)	—	—	—	—	११८.६	६.६	११९.१	६.७	१५८.०	८.८	१६७.३	९.३
	(५) ज्वारी (४+५)	६२१.२	३६.६	६३५.२	३६.२	६६७.५	३७.४	६७०.१	३७.७	७४७.७	४१.८	७३८.०	४१.३
(१)	एकूण द्विदल धान्यें	७२२.२	४२.५	७६४.९	४३.८	७६६.२	४४.०	७९०.०	४४.५	८६७.४	४८.५	८६६.३	४८.५
(२)	एकूण कडधान्यें	३०२.५	१७.९	३१२.९	१७.८	३१४.६	१७.६	३११.५	१७.५	२७१.०	१५.२	२६२.३	१४.७
(३)	इतर अन्न पिकें	५०.८	३.०	५१.४	२.९	६५.७	३.७	६४.७	३.७	६२.२	३.५	६४.३	३.६
(अ)	एकूण (१ २ ३)	१०७५.५	६३.४	११३०.२	६४.५	११६६.५	६५.३	११६६.२	६५.६	१२००.६	६७.१	११९२.९	६६.८
(४)	एकूण तेलबिया	११३.१	६.७	११४.६	६.५	१११.९	६.३	११५.२	६.५	९५.७	५.३	९६.७	५.४
(१)	कापूस	४८८.४	२८.७	४८६.६	२७.७	४८३.४	२७.१	४७२.८	२६.६	४७२.८	२६.४	४७७.९	२७.८
(२)	इतर पिकें	१९.२	१.१	२०.६	१.२	२१.६	१.२	२१.६	१.२	१५.८	०.९	१५.३	०.८
(५)	एकूण	५०७.६	२९.८	५०६.९	२८.९	५०५.०	२८.३	४९४.४	२७.८	४८७.९	२७.३	४९३.२	२७.६
(६)	इतर धान्यें	०.९	०.१	१.०	०.१	१.२	०.१	१.१	०.१	३.०	०.२	२.९	०.२
(ब)	एकूण इतर धान्यें (४ ५ ६)	६२१.६	३६.६	६२२.४	३५.५	६१८.१	३४.७	६१०.७	३४.४	५८५.६	३२.८	५९२.८	३३.२
(अ ब)	लागवडीखालील एकूण प्रदेश	१६९७.१	१००.०	१७५२.६	१००.०	१७८४.६	१००.०	१७७६.९	१००.०	१७८६.२	१००.०	१७८५.७	१००.०

वरील तक्त्यावरून पिकांची वर्गवारी लक्षांत येईल.

कोष्टक क्रमांक २ (अ) वरून असें दिसतें कीं, ७.५ टक्के जमीन जंगलांनीं व्यापलेली आहे. या आंकडेवारीवरून जंगलव्याप्त जमीन फार थोडी असावी असे वाटते. घनदाट जंगलामध्यें सांपडणाऱ्या विविध पशु पक्ष्यांच्या शिकारीचा आनंद येथील शिकारी लुटतात.

विविध पिकांखालील जमीन—जमिनीचा वापर कोणत्या प्रकारे केला जातो याचें विवेचन झाल्यावर विविध पिकांखालीं किती जमीन लागवडीस आणली जाते याचा विचार करूं. यावरून पिकांबाबत लोकांच्या संवयी व आडाखे काय असतात तें कळून येईल. ६६ टक्के जमीन लागवडीखालीं आणली जाते हें आपण पाहिलेंच.

खाद्य धान्यें

मागील कोष्टकावरून धावती नजर टाकली तरीहि एक महत्वाची गोष्ट लक्षांत येते ती ही कीं, ६५ टक्के भागांत खाद्य धान्यें लावलीं जातात तर उरलेल्या ३५ टक्के भागांत इतर पिकांची लागवड होते. एकंदर खाद्य धान्यामध्यें ज्वारीच्या पिकाला फार महत्वाचें स्थान आहे. खाद्य धान्यांसाठीं जी जमीन वापरली जाते त्यापैकीं सरासरीने ५८ टक्के जमीन ज्वारीसाठीं वापरली जाते. महत्वाची गोष्ट ही कीं, खरीप व रब्बी या दोन्ही प्रकारांत ज्वारीचे पीक काढलें जातें. साधारणतः खरीप ज्वारीस रब्बी ज्वारीचे प्रमाण ८० : २० पडते. ही दोन्ही मिळून ३८·५ टक्के जमीन व्यापतात. अर्थातच ज्वारीचें पीक हें सर्वांत महत्वाचें पीक होय.

धान्यें व डाळी

एकंदर आंकडेवारीवरून हें लक्षांत येईल कीं, नांदेड जिल्हा तांदूळ व गहूं यासाठीं प्रसिद्ध नाहीं. केवळ आंध्र प्रदेशाच्या निकटवर्ती असलेल्या नांदेड जिल्ह्यांतील कांहीं भागांतच तांदळाचें पीक येतें. एकंदर जमिनीपैकीं फक्त ६·२ टक्के जमीन तांदूळ व गहूं या पिकांच्या लागवडीखालीं आहे. सुमारें ४५ टक्के जमीन द्विदल धान्यासाठीं व १७.५ टक्के जमीन डाळीसाठीं व कडधान्यासाठीं लागवडीस आणली जाते. तांदूळ व गहूं या पिकांखालीं जितकी जमीन आहे तितकीच जमीन तेलबियांसाठीं वापरली जाते. भुईमुगाचें पीक हें लोकप्रिय पीक होय.

कापूस

येथील जमीन कापसाच्या पिकास अनुकूल असून कचा माल म्हणून याचा फार महत्वाचा उपयोग होतो हें वरील विवेचनांत आलेंच आहे. स्वाभाविकतः २७·२ टक्के जमीन या पिकासाठीं वापरली जाते. इतर पिकांपेक्षा ह्या पिकास बाजारपेठेचा फार फायदा मिळतो. त्यामुळें ज्वारीच्या खालोखाल हें पीक महत्वाचें आहे. नांदेड ही कापसाची व्यापारी बाजारपेठ म्हणून महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे. मोठमोठ्या कंपन्यांचे प्रतिनिधी व गुमास्ते कापसाच्या खरेदी विक्रीसाठीं नांदेडला येऊन राहतात. शिवाय नांदेड जिल्ह्यामध्येंहि अनेक कापडाच्या गिरण्या आहेत. कापसाच्या पिकाचें येथील महत्व लक्षांत घेऊनच सरकारनें "कापूस संशोधन केंद्राची" स्थापना येथें केली आहे. उत्तम प्रतीचा कापूस तयार करण्यासाठीं वैशिष्ट्यपूर्ण संशोधन चालू आहे. किनवट तालुका सोडून इतरत्र गांवरानी प्रकारचा कापूस होतो.

जमिनींतून चांगल्या प्रकारे उत्पादन काढण्यासाठीं शेतीची शास्त्रशुद्ध पद्धत अंमलांत आणावी लागते. शास्त्रशुद्ध नसेल तर अर्थातच पिकें चांगली येत नाहींत. हळूं हळूं शास्त्रशुद्ध शेतीच्या

पद्धतीचें शिक्षण शेतकऱ्यांना दिलें जाऊं लागलें आहे. सरकारने यासाठीं "रब्बी हंगाम मोहीम" आणि "खरीप हंगाम मोहीम" उद्घोषित केली. एकंदर दृष्टीकोन शास्त्रशुद्ध असल्यामुळें याचे खालील फायदे होतात. (१) उत्कृष्ट बी–बियाणांचा वापर, (२) बी पेरण्यापूर्वी त्यावर संस्कार केले जातात त्यामुळें उत्पादनांत वाढ तर होतेच पण पिकांवर रोग प्रतिबंधक उपाय प्रथमच केले जातात. (३) जपानी भात-शेतीची पद्धत वापरून एक महत्वाची पायरी आपण ओलांडली आहे. (४) कंपोस्ट व रासायनिक खतांचा वापर होऊं लागला आहे. (५) कीड व रोग यांची योग्य वेळीं दखल घेतली जाते.

शेतीच्या पद्धति

ही एक सहज लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे कीं, रब्बी व खरीप मोहिमांमुळेंच शेतीच्या पद्धतीमध्यें सुधारणा होत आहेत व होत राहतील. या मोहिमेमुळेंच ५० टक्के भात जपानी–भात शेतीच्या पद्धतीनें पिकविला जातो.

मात्र यांत्रिक पद्धतीनें शेती करण्याच्या पद्धतीबाबत अनास्थाच दिसून येते; याचें मुख्य कारण म्हणजे जमिनीचे लहान लहान तुकडे असल्यामुळें यांत्रिकीकरण फार महागाईचे होते. साधारणतः असें म्हणतां येईल कीं, २०० एकर किंवा त्यापेक्षां जास्त जमीन असेल तरच यांत्रिक पद्धतीनें शेती करणें किफायतशीर ठरतें. अर्थात् सामुदायिक शेतीच्या पद्धती आणल्या जाऊं लागल्या तर यांत्रिकीकरण फायदेशीर ठरूं शकेल. नांदेड जिल्ह्यांतील बिलोली तालुक्यांत "सागरोळी" नांवाचे एक गांव आहे तेथें सहकारी पद्धतीनें शेती केली जाते. ट्रॅक्टर्स, लोखंडी नांगर इत्यादि अवजारांच्या सहाय्यानें येथें शेती केली जाते. शिवाय जपानी–भात–शेतीची पद्धतहि अवलंबिली जाते. पूर्वीच्या शेतीच्या पद्धतीचें समूळ उच्चाटन करून नव्या पद्धती रूढ करणें हें अर्थातच वाटते तितके सोपें नाहीं.

पाटबंधाऱ्याच्या पाण्यावर शेती करणे ही शेतीच्या पद्धतीतील एक सुधारणा होय. तरीहि नांदेड जिल्ह्यांतील शेती मुख्यतः पावसाच्या पाण्यावरच अवलंबून असते. मान्सूनच्या लहरीपणावर अवलंबून राहावे लागत असल्यामुळे अनेक वेळा उत्पादनक्षमता फारच कमी होते. अनेक वेळा तोटेहि येतात अन् म्हणूनच पाटबंधाऱ्याची आवश्यकता आहे. शेतीच्या पिकाचा एकंदर अर्थव्यवस्थेवरच फार महत्वाचा परिणाम होत असतो. खाली दिलेल्या तक्त्यावरून एक महत्वाची गोष्ट लक्षांत येते कीं, ८० टक्क्यापेक्षां जास्त शेती ही विहिरीच्या पाण्यावर केली जाते. खरे पाहतां ही पद्धत फार जुनी आहे. शिवाय यांत कष्टहि जास्त पडतात. कांही ठिकाणी मात्र तलावाच्या पाण्याचा उपयोग शेतीसाठीं केला जातो. १९५९-६० मध्यें सुमारे ८९.१५ टक्के जमीन विहिरीच्या पाण्यावरच लागवडीखालीं आणली जात असे. उरलेली शेती कांही ठिकाणी तलावाच्या पाण्यावर व बहुशः मान्सूनच्या लहरीवरच चालते.

पाटबंधारे

पाटबंधाऱ्याचीं विविध साधनें

प्रकार	१९५५–५६		१९५९–६०	
	भूभाग	टक्केवारी	भूभाग	टक्केवारी
१) पाट (कॅनॉल) खाजगी व सरकारी		—	—	—
२) तलाव	२१३५	१४.२	२०५५	१०.८५
३) विशिष्ट विहिरी	४१२	२.८	—	—

४) इतर	२४	.२		
५) विहिरी	१२०५	८२.८	१६८९४	८९.१५
६) एकूण पाटबंधाऱ्या खालील जमीन	१५०८०	१००.०	१८९३९	१००.००

यावरून असें दिसून येते कीं, पाटबंधाऱ्याबाबत नांदेड जिल्हा बराच मागासलेला आहे, तरीहि ज्यावेळीं मन्याड योजना व केदारनाथ तलाव योजना पूर्ण होतील त्यावेळीं ही स्थिती निश्चितच सुधारेल. सध्यां मन्याड योजनेचें काम चालू असून कंधार तालुक्यांतील वरवंट खेड्यामध्यें सुमारे २५,००० एकर जमीन पाण्याखालीं येऊं शकेल. आणि केदारनाथ तलाव योजनेमुळें हदगांव तालुक्यांतील पिंगळी येथें ३,५५० एकर जमिनीला पाणी मिळेल या दोन्ही योजनांचा संयुक्त परिणाम म्हणूनच कीं काय पूर्वीपेक्षां जवळजवळ दुप्पट जमिनीला पाणी मिळूं शकेल आणि त्यामुळें येथील शेतकरी चांगल्या प्रकारें शेती करूं शकतील.

पुढील तक्त्यावरून तालुकेवार पाण्याखालीं असलेल्या जिल्ह्यांतील जमिनीची माहिती मिळूं शकेल.

तक्ता क्रमांक २ (ए)

पाटबंधाऱ्याखालीं असलेले प्रदेश

तालुका		एकूण पिकांखालील प्रदेश	पाटबंधाऱ्याखालील प्रदेश	टक्केवारी
१		२	३	४
नांदेड	१९५५–५६	२,१२,३५९	४,४७९	२.१०
	१९५९–६०	२,१५,४६९	५,२७३	२.४४
बिलोली	१९५५–५६	३,०१,५४६	१,७०८	०.५६
	१९५९–६०	२,८८,२३८	७,०७०	२.४५
देगलूर	१९५५–५६	१,१९,७८३	२,५२८	२.११
	१९५९–६०	१,६८,०८८	९७०	०.५७
मुखेड	१९५५–५६	१,७५,१९०	७२२	०.४१
	१९५९–६०	१,६६,१३४	१.१३०	०.६८
कंधार	१९५५–५६	२,७७,४९७	३,४२६	१.२३
	१९५९–६०	२,८२,३४७	५,५२१	१.९५
हदगांव	१९५५–५६	२,५२,००५	७६२	०.३०
	१९५९–६०	२,६३,५२६	१,४३२	०.५४
भोकर	१९५५–५६	१,७६,५२१	१,२६.८	०.७२
	१९५९–६०	१,८३,७९८	१,१७८	०.६४
किनवट	१९५५–५६	२,३७,७३४	१९१	०.०८
	१९५९–६०	२,१८,०६८	९७६	०.४४
एकूण	१९५५–५६	१७,५२,६३५	१५,०८४	०.८६
	१९५९–६०	१७,८५,६५८	२३,५५०	१.३२

एकूण पाणीपुरवठ्यापैकीं ८० टक्क्यांहून अधिक पाणीपुरवठा केवळ विहिरीपासून होतो असें निदर्शनास आलें आहे. अर्थातच मोठ्या प्रमाणावर पिकांचे उत्पादन करण्यासाठीं विहिरींचा उपयोग होणे शक्य नसते.

पाण्याखाली मिळणारा भाग व पिकें

पाण्याखालीं असलेल्या एकूण जमिनीच्या ९८ टक्के जमिनीचा वापर धान्य पिकें काढण्यासाठींच होतो. पाण्याखालीं असलेल्या एकूण विभागापैकीं ४७ टक्के विभाग तर अन्नधान्यांनीच व्यापला आहे. यामध्यें तांदूळानें सर्वांत जास्त जमीन व्यापली आहे. बागायती जमिनीपैकीं तांदूळ २३ टक्के जमीन व्यापतो तर गहूं फक्त ५ टक्के जमिनीमध्यें पिकविला जातो. ज्वारी आणि बाजरी ही त्या मानानें कमी आहेत. याचें कारण कदाचित असेहि असूं शकेल कीं, पावसापासून मिळणारे पाणी हें दोन्ही पिकांना पुरेसे होत असावें असतें. ऊस तर पाटाच्या पाण्याखेरीज टिकणेच शक्य नाहीं व म्हणूनच पाटबंधाऱ्याच्या पाण्यापैकीं २२ टक्के पाणी केवळ ऊंसासच मिळतें. ज्वारी व बाजरी यांचेकडे दुर्लक्ष होण्याचें जें कारण तेंच कदाचित कापसाचे बाबतींत पण दुर्लक्ष होण्याचें कारण असूं शकेल, कापसासाठीं तर सन १९५५–५६ ते सन १९५९–६० पर्यंत पाटबंधाऱ्याचे पाण्याचा बिलकूल उपयोग करण्यांत आला नाहीं. वर दिलेल्या सर्व बाबींचा तक्ता खालीलप्रमाणें.

वेगवेगळ्या धान्यासाठीं असलेला पाण्याखालीं भिजणारा विभाग

(एकरांमध्यें)

पिकांचें नांव	१९५५–५६	१९५६–५७	१९५७–५८	१९५८–५९	१९५९–६०
तांदूळ	३६३३ (२४.०८)	२७१२ (१६.२८)	३१९२ (१६.५७)	६७९१ (२९.८५)	६७७७ (२८.७८)
ज्वारी	४०	—	—	—	—
गहूं	९०८	११८१	१४०१	१४१८	१८४७
बाजरी	—	—	—	—	—
इतर द्विदल पिकें	२७४२ (१८.१७)	३१५७ (१९.०१)	३२९३ (१७.१३)	३७९८ (१६.६९)	३३१८ (१४.०९)
डाळी	—	—	—	—	—
ऊंस	३१३० (२०.७५)	४१५२ (२४.६८)	४२५६ (२२.१०)	४८२० (२१.१९)	५१२८ (२१.७७)
एकूण खाद्य पिकें	१४९६२ (९९.१९)	१६५३३ (९८.३०)	१८८४९ (९७.८९)	२२३९२ (८९.४५)	२३४७० (९९.४६)
कपास	—	—	—	—	—
इतर पिकें	१२२ (०.८१)	२८६ (१.७०)	४०६ (२.११)	३५३ (१.५५)	८० (०.३४)
एकूण पाण्याखालीं भिजणारा विभाग	१५०८४	१६८१९	१९२५५	२२७४५	२३५५०

शेतीच्या अर्थव्यवस्थेचें एक महत्वाचे गमक म्हणजे जमिनीची मालकी होय. जमिनीच्या विभाजनाविषयीं अथवा एकीकरणाविषयीं कोणत्याहि समस्या सोडवितांना प्रत्येकी किती एकर जमीन मालकीची आहे हें पाहाणें आवश्यक असते. याबाबतींत १९५४ सालीं जमीन मालकीविषयीं पूर्वीच्या हैद्राबाद सरकारने जी खानेसुमारी केली ती खालीलप्रमाणें :—

जुन्या नांदेड जिल्ह्यांतील दरडोई जमीनमालकी

क्षेत्रफळ (एकरमध्यें)	एकंदर मालकी	एकंदर मालकीची टक्केवारी
० ते ५	३०२२९	२६.६
५ ते १०	२५५७५	२२.५
१० ते २०	३०५२४	२६.८
२० ते ३०	१३४३९	११.८
३० ते ५०	९३४३	८.२
५० ते १००	३८६४	३.४
१०० ते २००	५२८	.४
२०० ते ८००	४७	.०४
८०० व त्यापेक्षां जास्त	१	.०१
एकूण	११३५५०	१००.००

वरील आंकडेवारीवरून एका महत्वाच्या गोष्टीवर प्रकाश पडतो व ती म्हणजे सुमारे ८०० एकर अथवा त्यापेक्षा अधिक जमीन मालकींचे असणारे फारच थोडे म्हणजे फक्त .०१ लोक आहेत. परंतु त्याच्या अगदी उलट परिस्थिती छोट्या छोट्या जमीन मालकांची आहे. ५ किंवा ५ एकरापेक्षा कमी अधिक जमीन ज्यांच्या मालकीची आहे अशांची संख्या ३०,२२९ आहे.

मात्र ५० ते १०० एकर जमीन असलेले जमीनदार ३८६४ आहेत.

जमिनीचे लहान लहान तुकडे असल्यामुळेंच यांत्रिकीकरण अथवा आधुनिक साधन सामुग्रीचा उपयोग करून शेती करणें प्रायः अशक्य ठरतें, तरीहि सहकार वा सामुदायिक शेतीच्या कल्पनेचा जसजसा विकास होऊं लागेल तसतशी ही स्थिती सुधारेल व नांदेड जिल्हा शेतकी व्यवसायांतहि मानाचें स्थान नजिकच्या काळांत मिळवूं शकेल असा विश्वास वाटतो. सहकारी बँका, सहकारी संस्थांना जी अमूल्य मदत करीत आहेत त्याचा उपयोग हळूंहळूं सहकारी शेतीला मिळूं लागेल व नांदेड, धर्माबाद व देगलूर इत्यादि बाजारपेठा कापूस, तांदूळ, गहूं या पोत्यांनीं व गांठींनीं भरून जातील. लोकांना नवा रोजगार उपलब्ध होऊन अन्नधान्याबाबत नांदेड जिल्हा हळूं हळूं स्वावलंबी होईल यांत संशय नाहीं.

वनसंपदेचें महत्व निराळे सांगावयास हवे असें नाहीं. त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा विचार करण्यापूर्वी एक महत्वाची गोष्ट लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. ती हीं कीं, जंगलाच्या साह-

च्र्यामुळें भूभागाला एक प्रकारची रमणीयता येत असते. नांदेड जिल्ह्याचें सौंदर्य वाढविण्यास जंगलेंच कारणीभूत झालीं आहेत. गोदावरी, मन्याड, आसना इत्यादि नद्या ज्याप्रमाणें जवळपासचा भाग सुपीक करतात त्याचप्रमाणें जंगलामुळें फार महत्वपूर्ण कामगिरी बजाविली जाते. जंगलाच्या साहचर्यामुळें जमिनीचा कस कमी होण्यास प्रतिबंध होतो. तसेच पावसाचें प्रमाण एकसारखे राहण्यास जंगलामुळें मदत होते. राष्ट्रीय उत्पन्नाचा वनसंपदा हा एक फार महत्वाचा भाग होय. नांदेडला जगलाचा भाग म्हणणें मात्र धाडसाचे ठरेल. कारण एकंदर जमिनीच्या ७.५ टक्के भागच जंगलांनीं व्यापलेला आहे. परंतु यामध्येंहि विविधता आहे. भोकर, हदगांव व किनवट या तालुक्यांना घनदाट जंगलांची देणगी मिळालेली आहे. इतर अनेक प्रकारचीं जंगलें विविध ठिकाणीं पसरलेलीं आहेत.

वनसंपदा

पुणें विभागाच्या वनमंडलाधिकारी कार्यालयानें प्रसिद्ध केलेली आंकडेवारी खालीलप्रमाणें—

नांदेड जिल्ह्यांतील जंगलें

क्र.	वर्ष	राखीव	प्रतिबंधित	अवर्गीकृत	एकूण
१.	१९५०–५१	१,६७,९८०	६११	५९,३१२	२,२७,९०३
२.	१९५५–५६	१,६७,७१५	१३,३१२	१,२२,५६२	३,०३,५८९
३.	१९६०–६१	१,६७,७१५	१३,३१२	१,२२,५६२	३,०३,५८९

तालुकेवार वर्गीकरणाची आंकडेवारी पाहिली कीं, एक महत्वाची गोष्ट दिसून येते कीं, एकूण भौगोलिक भागांशीं जंगलाचें असलेलें प्रमाण विविधतापूर्ण आहे. बिलोली तालुक्यांतील ही टक्केवारी ०.२८ आहे तर किनवट तालुक्यांत २५.११ आहे. यावरून हेंच सिद्ध होते कीं, कांहीं तालुक्यांत घनदाट अरण्याचे पट्टे आहेत तर कांहीं तालुके विरळ अरण्यमय प्रदेशांचे आहेत. खालील बोलके आंकडे हेंच सांगतात.

अरण्यमय प्रदेश (एकर) १९५९–६०

तालुका	भौगोलिक भूभाग	अरण्यमय प्रदेश	भौगोलिक भूभागांशीं प्रमाण	एकंदर अरण्यमय प्रदेशांशीं गुणोत्तर
नांदेड	२,४६,९८८	२,९८०	१.१८	१.६
बिलोली	३,६५,९९८	१,०३०	०.२८	०.५
देगलूर	१,६६,८३८	—	—	—
मुखेड	२,३०,८१५	२,१५०	०.९३	१.००
कंधार	४,००,६९५	२,५५९	०.६४	१.५
हदगांव	३,७७,०९०	२९,४९९	७.८२	१४.८
भोकर	२,६७,३३१	३२,७४४	१२.२५	१६.८
किनवट	४,९७,२५७	१,२४,८४१	२५.११	६३.८
एकूण	२५,५३,०१२	१,९५,८०३	—	—

वरील आंकडेवारीवरून हेहि लक्षांत येतें कीं, मुख्यतः किनवट तालुक्यामध्यें घनदाट अरण्यें आहेत. किनवट, हदगांव व भोकर मिळून एकूण ९५ टक्के अरण्यें आहेत.

अरण्यापासून मिळणारें उत्पन्न

अरण्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाची खालील तक्त्यावरून कल्पना येऊं शकेल.

उत्पादित पदार्थांचें मूल्यमापन (आंकडे हजार रु. चे)

उत्पादित पदार्थ	१९५७–५८	१९५८–५९	१९५९-६०	१९६०–६१
(१) इमारतींचें लाकूड व जळणासाठीं वापरण्यांत येणारे इंधन	३६०.९ (६९.५)	४८२.९ (७५.८)	७९८.९ (८०.६)	६३१.१ (७४.२)
(२) बांबू	३.८ (०.७)	६.८ (१.१)	१.७ (०.२)	१.८ (०.२)
(३) गवत व कुरणे	६८.६ (१३.२)	३७.१ (५.८)	— —	— —
(४) इतर	८५.७ (१६.६)	११०.५ (१३.३)	१९०.५ (१९.२)	२१८.३ (२५.६)
एकूण	५१९.०० (१००.००)	६३७.३ (१००.०)	९९१.१ (१००.००)	८५१.२ (१००.००)

इमारतीचे लाकूड व जळणासाठीं इंधन म्हणून वापरण्यांत येणारें लाकूड यांनी जवळ जवळ उत्पादनाचा तीन चतुर्थांश हिस्सा व्यापला आहे. २० टक्के इतर उत्पादनांत मोडतात तर उरलेलें उत्पादन मुख्यतः बांबू–गवत आणि कुरणें इत्यादि होय. या गेल्या ४ वर्षांमध्यें प्रतिवर्षी सरासरी ७,४९,००० सरासरी रुपये किंमतीचा माल उत्पादन केला गेला.

मासेमारी

नांदेड जिल्ह्यामध्यें नद्यांच्या कांही भागांत मासेमारीचा धंदा फार मोठ्या प्रमाणावर चालतो. " उथळ पाण्यांतील मासेमारी करणारा विभाग " असें याचें वर्णन करतां येईल. सुमारे बारा बारमासी व १३० हंगामी मासेमारीस उपयुक्त असे तलाव आहेत. गोदावरी, आसना, पैनगंगा, व मांजरा नदीचा कांही भाग येथें मासे विपुल प्रमाणावर सांपडतात. विविध प्रकारचे मासे येथें सांपडतात. मासेमारीसाठीं महाजाल वगैरे अनेक प्रकारचीं जाळीं वापरलीं जातात. १९५१त येथें " असिस्टंट बायोकेमिस्ट्री " चें कार्यालय स्थापन केलें गेलें. " ऑन " प्रकारच्या मासेमारीला कितपत वाव आहे हें पाहण्यासाठीं या कार्यालयाची संस्थापना केली गेली. या कार्यालयातर्फे मुख्यतः माशांची पैदास व निगा इत्यादि बाबत अभ्यास करण्यांत आला. अनेक वैज्ञानिक व रासायनिक संस्कारांचा अभ्यास व संशोधन केल्यानंतर तांत्रिक व कांही प्रमाणांत आर्थिक मदत सहकारी पद्धतीवर काम करणाऱ्या मंडळांना द्यावी असें ठरविलें गेलें.

यामुळें एक प्रकारचा सुसूत्रपणा या व्यवसायाला येऊं लागला आहे. याबाबत लोक सुधारणेकडे झुकूं लागले आहेत. तरीहि अजून हा व्यवसाय फार मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक स्वरूपावर चालू आहे. सहकाराचे महत्व लोकांना जसजसे पटूं लागेल तसतसा विकास उत्तरोत्तर वाढत जाईल हें निःसंशय.

प शु ध न

अजून आपण बैलगाडीच्या युगांतच आहोंत. अजूनपावेतो तरी भारतामध्यें शेतीच्या कामासाठीं अत्यधिक प्रमाणावर बैलांचाच उपयोग करून घेण्यांत येतो. शेतीसाठीं होणाऱ्या पाणी पुरवठ्याचीहि हीच गोष्ट. बहुशः सर्वत्र बैलांकरवी ओढल्या जाणाऱ्या मोटांमुळेंच पाणी पुरवठा होत असतो. बैलांकडूनच प्राधान्याने विहिरींचें पाणी उपसून काढलें जातें. पाणी उपसण्याकरितां कांही उद्यावत अशी यंत्रसामुग्री आहे परंतु तुलनात्मक दृष्ट्या ती फारच तोकडी आहे. शेतीपासून झालेलें उत्पन्न, धान्यें, इत्यादि बैलगाडीवरच घालून शेतांतून व खेड्यापाड्यांतून बाजारांत आणावीं लागतात. कांही वेळा रेड्याकरवीहि हीं कामें केलीं जातात. गाई म्हशी सोडून अन्य पशु संपत्तीहि देशांत उपलब्ध असून तिचाहि फारच उपयोग आपणास होत आहे. दुग्ध पुरवठा आणि अन्य दुग्ध पदार्थांच्या उत्पादनासाठीं गाई म्हशींचें स्थान फार उच्च आहे. आणि ह्या सर्व कारणामुळें नांदेड जिल्ह्याच्या पशुसंपत्तीची माहिती करून घेणें ही एक जरूरीची बाब आहे.

दर पांच वर्षांनंतर देशांत पशु संपत्तीची गणना करण्यांत येते. १९५१, १९५६ आणि १९६१ सालीं घेतलेल्या गणनेची माहिती खालील तक्त्यांत दिलेली आहे.

पशुसंपत्ति

विभाग	१९५१ गणना	१९५६ गणना	१९६१ गणना
एकूण गाई व बैल	५,१०,८१६ (६६.०६)	६,२३,५१० (६७.०५)	६,४७,०९० (६४.०९)
एकूण म्हशी व रेडे	१,१०,४२१ (१४.०४)	१,३८,०७६ (१४.०९)	१,५१,९११ (१५.०२)
एकूण बकरी	४७,४७३ (६.०२)	३८,७३९ (४.०२)	४०,२५३ (४.००)
एकूण मेंढ्या	८५,१८५ (११.०१)	१,०६,९२९ (११.०६)	१,३८,३३० (१३.०९)
एकूण घोडे	४,८०९ (०.०६)	६,०७८ (०.०६)	३,९६३ (०.०३)
एकूण खेचरे व गाढवे	२३ (०.०८)	५५ (०.०६)	४२ (०.०६)
एकूण उंट	५,४७७	५,०६४	६,१२५
	२०४ (फार क्षुल्लक)	५६३ (०.०१)	७२७ (०.०१)
एकूण डुकरे	२,०२३	४,९५०	८,६४८
एकूण पशुधन	७,६६,४३१ (१००.०)	९,२३,९६४ (१००.०)	९,९७,०८९ (१००.०)

वरील तक्त्यावरून असें दिसतें कीं, नांदेड जिल्ह्यांतील पशुधन हळूं हळूं वाढत आहे. तें १९५१ सालीं ७.६६ लक्ष होतें तें १९६१ मध्यें ९.९७ लक्ष झालें.

गायी

एकूण पशु संपत्तीपैकीं ६६ टक्के गायी व बैल असल्याचें दिसून येतें. गायी बैलांची संख्या तुलनात्मक दृष्टीनें पाहतां १९५१ सालीं जरी कमी आढळते तरी सर्व संपत्तीत मिळून २६.०५ टक्क्यांची वाढ खात्रीनें झालेली आहे. बैलजोड्यावरूनच भूधारणेसंबंधीचे अंदाज बहुतेक ठिकाणीं केले जातात. सर्वसाधारणपणें ज्या व्यक्तीकडे "एक बैलजोडी" असते तिच्या मालकीची २० एकर जमीन असल्याचें ढोबळपणें मानण्यांत येतें. एक बैलजोडी सर्वसाधारणपणें १८ ते २० एकर जमिनीची नांगरट करूं शकते असें अनुभवावरून आढळून आलें आहे. सन १९६१च्या गणनेनुसार गायी व बैल यांची संख्या तुलनात्मक दृष्ट्या पाहतां ५९.४१ टक्के आहे. टक्केवारीनें म्हशी व रेड्याच्या आंकड्याशीं तुलना करतां यांत फार तफावत नाहीं असें दिसतें. त्याचप्रमाणें १९६१ च्या गणनेवरून असें दिसतें कीं, गोधन उत्पत्तीसाठीं आवश्यक असणाऱ्या उत्तम वळूंची संख्या या जिल्ह्यांत फारच कमी आहे. तीन वर्षांहून अधिक वयाच्या एकूण २,२०,७५० गायी आहेत व एकूण ७९० वळू आहेत. म्हणजेच साधारणतः २७९ गायीसाठीं एक वळू असें प्रमाण आहे.

जर या वळूमध्यें १०,६२२ बैल, जे शेतीकामास वापरले जात आहेत ते गोधन निर्मितीस योग्य असे झाल्यास दर २० गायीमागें एक वळू हें प्रमाण पडेल, पण यामुळें जनावरांचें प्रमाण थोडे निकृष्ट होईल. हा होणारा परिणाम व नुकसान कृत्रिम पद्धतीनें होणाऱ्या जीवोत्पादनाचे पद्धतीनें भरून काढलें आहे. सरकार कृत्रिम गर्भधारणा केंद्राची संख्या वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यांत येत आहे.

म्हशी

एकूण पशुधनाच्या १४.८ टक्के म्हशी आहेत. म्हशीचे दुधांत प्रथीन द्रव्यें फार विपुल प्रमाणांत असल्यानें त्यास वाढती मागणी आहे. म्हणून उत्तम प्रमाणांत दूध दुभते देणाऱ्या म्हशीची निगा फार उत्तम तऱ्हेनें राखण्यांत येते. दुधाचा पुरवठा विपुल आहे पण गावांत उपाहारगृहें नाहींत असें गांव औषधालाहि मिळणार नाहीं. १९६१ च्या गणनेनुसार म्हशी व रेड्यांचें प्रमाण ८३:१७ असे आहे. दुग्धव्यवसाय हा म्हशींच्या संख्येवरच मुख्यतः अवलंबून आहे व त्या कारणास्तव हल्ली बरेच लोक दुग्ध व्यवसाय करूं लागले आहेत व त्यांची हळुहळू वाढ होत आहे.

बकऱ्याः—बकरींची संख्या पशु संपत्तीच्या १४ टक्के आहे व गेल्या दहा वर्षांत ती वृद्धिंगत झाली आहे. बकरीचे दूध औषधी आहे व त्यामुळें बुद्धीची कुशाग्रता वाढते, त्याचप्रमाणे खत म्हणूनहि बकरीच्या लेंड्या ह्या फार उपयोगी पडतात. त्याचप्रमाणें मांसाहारी लोकांनाहि बकरीचें मांस उपयोगी पडते.

मेंढ्याः—१९५१ च्या गणनेनुसार एकूण पशुसंख्येच्या ६.०२ टक्के मेंढ्या होत्या तर तेंच प्रमाण १९६१ सालीं ४ टक्के आहे. गेल्या १० वर्षांत मेंढ्याच्या संख्येंत १५ टक्के घट झाली आहे. मेंढ्यापासून लोकर व खत मिळतें. पण हें खत बकऱ्याचे खतापेक्षां कमी प्रतीचें असतें.

घोडेः—एकूण पशुसंपत्तीच्या ०.०५ टक्के घोडे आहेत व त्यामध्येंहि हळूं हळूं घट होत आहे. या जिल्ह्यांत घोडे फारच कमी आहेत.

खेचरें गाढव आणि उंटः—एकूण पशुधनाच्या ०.०७ टक्के ही जनावरें आहेत व एकूण १३ टक्क्यांची वाढ ह्या संख्येंत झाली आहे.

१९५२ सालीं उंटांची संख्या २०४ होती व १९६१ मध्यें ७२९ आहे. मुखेड तालुक्यांतील कांहीं भागांत वाहतुकीकरितां उंटांचा सर्रास वापर केला जातो.

डुकरेंः—एकूण पशुधनाच्या १८ टक्के डुकरें आहेत. १९५१ सालीं ही संख्या केवळ ८६४८ होती.

नांदेड जिल्ह्यांतील प्रमुख पशुसंवर्धन केन्द्रें

" देवणी " ह्या प्रकारचे नांव बिदर जिल्ह्यांतील (म्हैसूर राज्य) देवणी या नांवाच्या गांवावरून पडलें. पूर्वींचे काळी या गांवी जनावरांचा मोठा व्यापार होत असे. देवणी जातीचे बैल दिसण्यांत उंच, धष्टपुष्ट व रुबाबदार दिसतात. कापसाची जमीन विशेषेकरून ह्या जातीचे बैलाकडून नांगरली जाते. या जातीच्या गायीचे दूध विपुल असते व त्यांत पोषक द्रव्यें विपुल प्रमाणांत असतात.

ढोबळ मानाने या प्रकारची गाय ३०० दिवसांत ४००० पौंड दूध देते. जिल्ह्यांतील दक्षिणेकडील भागांत ह्या गायींचे व बैलांचे प्रमाण फार आहे व या जातीचे गाय व बैल पशु संवर्धन खात्यानें फारच उत्कृष्ट म्हणून वारंवार वाखाणणी केलेले आहेत.

कंधार तालुक्यांतील गायी–बैल " कंधारी जनावरे " या नांवानें ओळखलीं जातात व नांदेड जिल्ह्यांत फार ठिकाणीं हीं जनावरें पाळण्यांत येतात.

कुक्कुट पालन

आजकाल बरेच लोक कोंबडी पालनाचा धंदा करूं लागले आहेत. कारण तो स्वस्त व फायदेशीर असतो. समाज विकास गट व गटांचे अधिकारी यांनीं परिश्रम करून या धंद्याला खेड्यापाड्यांतूनहि महत्वाचें स्थान प्राप्त करून दिलें आहे. खरीप पिकानंतर साधारणतः चार ते पांच महीनेपर्यंत शेतकरी बहुधा कसल्याहि उद्योगांत नसतो. त्या कारणास्तव शेतीस जोडधंदा म्हणून कोंबडीपालनाचा उद्योग नजिकच्या काळांत एक महत्वाचा धंदा होऊन जाईल यांत तिळमात्र शंका नाही. या धंद्यामध्यें एक जबरदस्त धोका म्हणजे क्वचित प्रसंगीं कांहीं रोगानीं विशेषतः राणीखेत या रोगानें सर्वच्या सर्व खुराडे एका दिवसांत मरून जाते व यामुळेंच की काय ह्या धंद्यामध्यें उत्साहानें भाग घेण्यासाठीं लोक धाडस करीत नाहींत. खालील दिलेल्या तक्त्यावरून आपणास यासंबंधीं विशेष बोध होईल.

कुक्कुट पालन

विभाग	१९५१ ची गणना	१९५६ ची गणना	१९६१ ची गणना
कोंबडे व कोंबड्या	३७,५८१ (९८.०६)	८८,९३८ (९८,०९)	५९,०५९ (९९.१)
बदके	५४० (१.४)	७५२ (०.८)	९५८ (०.६)
इतर	—	२९८ (०.३)	४१९ (०.३)
एकूण संख्या	३८,१२१ (१००.०)	८९,९८८ (१००.०)	१,६०,४३६ (१००.०)

या विभागांत प्रामुख्यानें कोंबड्या व कोंबडे यांचा समावेश होतो. हे पक्षी ९८·०५ टक्के इतके आहेत. उरलेलीं बदकें आहेत. गेल्या १० वर्षांत कोंबडी पालन या कक्षेंत ३१८ टक्के वाढ झाली आहे.

शेतकी अवजारें—या बाबतींत अजून अपेक्षित अशी वाढ झालेली नाहीं, व अजून ह्यामध्यें पुष्कळ सुधारणा, बदल होणें आवश्यक आहे. खालील तक्त्यावरून ह्या बाबतींत आपली असलेली सद्यःस्थिति दिसून येईल. हल्लीचे यंत्र युगांत सुद्धां लोखंडाची अवजारेहि ५ टक्क्याहून कमी प्रमाणांत शेतकीसाठीं वापरलीं जातात. आपल्या शेतकी प्रधान देशांत हें प्रमाण आमूलाग्र बदलणें अनिवार्य आहे.

शेतकी अवजारें

प्रकार	१९५१ गणना	१९५६ गणना	१९६१ गणना
१) लांकडी नांगर	६३,१९६	८७,३२२	८३,४७५
२) लोखंडी नांगर	१,३५२	२,५७०	४,४५०
३) खटारा	३०,९१६	४१,५८३	४६,३०५
४) ऊसाचे चरक			
अ) विजेचे सहाय्यानें	४	२८	१०१
ब) बैलांकरवी चालविलेले	२५०	३२६	४४५
५) ऑईल इंजिन्स	३०	२००	६३६
६) विजेचे पंप असलेली	२	६	३०
७) ट्रॅक्टर्स	—	४८	५
८) ५ शेर व अधिकाच्या घाण्या	२८२	११३	७२
९) ५ शेराहून कमीच्या घाण्या	४६	१४४	११०

चरक व ट्रॅक्टर्स

१९५१ सालीं विजेच्या साहाय्यानें चालविले जाणारे ४ चरक होते तर आतां ते १०१ झाले आहेत व बैलांकडून ओढल्या जाणाऱ्या २५० चरकांचे जागी आतां ४४५ चरक झालेत. इंजिन व पंपाच्या साहाय्यानें चालणाऱ्या चरकांची वाढ फारच मोठ्या प्रमाणांत होत आहे ही एक समाधानाची गोष्ट आहे. केवळ १० वर्षांतच ३० पासून ६३६ इतकी वाढ झालेली आहे, परंतु तरीहि ढोबळ मानानें पाहतां ही वाढ सर्वत्र झपाट्याने होणे आवश्यक आहे. ट्रॅक्टर्सची संख्या मात्र १९५६ सालापेक्षां कमी झालेली आहे. प्रांत पुनर्रचनेमध्यें सरकारी मालकीचे १५ ट्रॅक्टर असलेला भाग शेजारील राज्यांत गेला आणि कांही खाजगी संस्थांचे ट्रॅक्टर्सहि योग्य ती मागणी जिल्ह्यांतून येत नसल्या कारणाने त्या संस्थांनीं अन्यत्र नेले. त्याचप्रमाणें घाण्यांची संख्याहि थोडीफार कमी झाली आहे. शेतकीप्रधान अशा अर्थव्यवस्थेंत शेतकीस अद्यावत अशीं अवजारें फारच महत्वाची बाब असल्यानें व शेती हाच एक मुख्य धंदा असल्यानें ही स्थिती नजिकच्या काळांत खात्रीने पालटेल असें वाटतें.

उद्योगधंदे

नांदेड जिल्हा उद्योगधंद्याच्या दृष्टीनें मागासलेला असला तरी लोकसंख्या व शेती या दृष्टीनें समृद्ध आहे. सध्यां येथें उद्योगधंदे कमी असले तरी उद्योगधंद्यांना येथें बराच वाव आहे. या जिल्हयांतील जास्त पीक कापसाचे आहे. या कापसाच्या पिकामुळेंच नांदेड जिल्हयांत कापडाच्या गिरण्यांना प्राधान्य प्राप्त झालेले आहे. सध्यां येथें एक जिनींग व प्रेसिंग गिरणी आहे. या जिल्हयांतील दुसरे महत्वाचें पीक म्हणजे भुईमुगाचे होय. या पिकामुळें तेल घाणीच्या धंद्यास उत्तेजन मिळते. सध्यां किनवट तालुक्यामध्यें भरपूर जंगले आहेत. तेथें मुख्यतः सागवान लाकूड व खनिज संपत्तीपैकीं चुनखडी मिळते.

अनेक अडचणी

आर्थिक दृष्टीने नांदेड जिल्हा परिपूर्ण नाहीं. सर्व जिल्हयांत फक्त एकच लोहमार्ग आहे. येथील रस्ते महाराष्ट्र राज्याच्या मानानें फारच कमी आहेत. महाराष्ट्रांत १०० चौरस मैलामागे १७.६ मैल रस्ते आहेत, तर नांदेड जिल्हयांत तेच प्रमाण ५ मैल असे आहे. सध्यां केवळ नांदेड, देगलूर किनवट एवढ्याच ठिकाणीं वीज आहे. वीज सर्वांत कमी खर्चाची शक्ति आहे व ती मोठ्या प्रमाणांत नसल्यामुळें जिल्ह्यांतील उद्योगधंद्याच्या वाढीला अडथळा निर्माण झाला आहे. नुकत्याच घेतलेल्या औद्योगिक पाहणीत अनेक अडचणी दिसून आल्या आहेत. भारत सरकारच्या लघुउद्योग व्यापारी मंडळाने कांहीं अडचणी प्रमुखपणें दाखविल्या आहेत. त्या म्हणजे शास्त्रशुद्ध गुंतवणुकीबाबत अज्ञान, मूलोद्योग व व्यापारी बाजारपेठा उपलब्ध नसणे इ. आहेत. अनेक उद्योगधंद्यांत प्रथमतः लवकर नफा मिळत नसल्यामुळें छोट्या धंद्यांत भांडवल गुंतविणे हितावह असूनहि याबाबत अनास्था दाखविली जाते, ही एक महत्वाची अडचण होय. तसेच औद्योगिक बाबींमधील तंत्रज्ञांची कमतरता ही देखील मोठी अडचण होय याकरितां नांदेड जिल्हयाच्या जलद आर्थिक विकासासाठीं खालील गोष्टी आवश्यक आहेत. (१) विद्युत् शक्तीचा विकास (२) औद्योगिक वसाहती (३) वाहतुकींच्या साधनांची उपलब्धता (४) विविध राष्ट्रीय योजनांमध्यें लघुउद्योगासाठीं देण्यांत येणारी आर्थिक मदत व त्यांची प्रसिद्धि.

अस्तित्वांत असलेले उद्योगधंदे

कापड गिरणी

नांदेड जिल्हयामध्यें महत्वाची कापड गिरणी उस्मानशाही कापड गिरणी ही होय. ही एकच गिरणी नांदेड जिल्हयांत नांदेड येथे आहे. ही सन १९२३ मध्यें पूर्वीच्या हैद्राबाद सरकारच्या प्रोत्साहनामुळें सुरू झाली. १९६० सालामध्यें रोजी काम करणाऱ्या कामगारांची संख्या ५५२९ होती. सबंध जिल्ह्यामध्यें शेंकडा ६९ नोकर रोजंदारीवर काम करणारे आहेत. या गिरणींत ३८,७९८ चरखे असून ९०२ माग आहेत. या मिलमध्यें लागणाऱ्या कच्च्या मालाचा सुमारे २५ टक्के माल जिल्ह्यांत मिळतो व उरलेला कापूस वगैरे आसपासच्या जिल्ह्यांतून विकत घेतला जातो. लांब पन्ह्याचे कापड व मांजरपाट

हे कापड येथें तयार होते. तयार झालेल्या कापडाच्या ४० टक्के कापड प्रामुख्यानें परदेशी पाठविले जाते व उरलेले देशांत विक्रीकरतां पाठविले जाते. खालील तक्त्यामध्यें कापसाचें सूत व कापड हे १९५० पासून १९६० पर्यंत किती तयार झाले त्यांचे आंकडे दिले आहेत.

कापसाचे सूत व कापड उत्पादन

सन	कापसाचें सूत (लक्ष पौंडामध्यें)	कापसाचें कापड (लक्ष यार्डामध्यें)
१९५०–५१	६.४५	१९०.८९
१९५१–५२	५.८०	२२४.७१
१९५२–५३	५.५१	२८५.३८
१९५३–५४	८.४७	३०२.६५
१९५४–५५	८.००	२८७.१९
१९५५–५६	६.७९	२९४.९२
१९५६–५७	५.९२	३००.८०
१९५७–५८	९.०१	२८९.०१
१९५८–५९	१०.५	२८९.८३
१९५९–६०	९.७८	२९२.१९

जिनिंग गिरण्या

जिनिंग गिरण्या हा नांदेड जिल्ह्यांतील दुसरा महत्वाचा मोठा धंदा आहे. सरकी विरहित कापूस व त्यांच्या गांठी बांधणें असे काम नोव्हेंबर ते मार्चपर्यंत या गिरण्यांत चालते. कच्चा माल विपुल प्रमाणांत उपलब्ध असल्याकारणानें हा धंदा विशेष करून नांदेड, धर्माबाद देगलूर, किनवट, मुखेड, भोकर, उमरी, करकेली, मुदखेड, हिमायत-नगर आणि लोहा या ठिकाणीं प्रामुख्यानें दिसून येतो. शेती खालोखाल असा हा महत्वाचा धंदा असून सरासरीनें या धंद्यामध्यें २०९६ लोक १९६० सालीं रोजगारावर काम करीत होते. १९५१ सालीं ३५ गिरण्या होत्या तर आतां त्या २१ झाल्या आहेत.

दुसऱ्या गिरण्या

श्रमजीवि वर्गापैकीं एकूण ९५ टक्के लोक जिनिंग व तत्सम क्षेत्रांत असून उरलेले ५ टक्के लोक इतर उद्योगांत आहेत. तेलघाण्यांचा धंदा हा सुद्धां एक महत्वाचा धंदा असून त्यांत शेंग-दाण्याचें तेल काढणें हा एक प्रमुख उद्योग आहे. नांदेड, देगलुर, कंधार आणि धर्माबाद या ठिकाणीं सात गिरण्या असून पूर्वी त्याच ठिकाणीं केवळ चार गिरण्या होत्या. त्याचप्रमाणें कामगारांना रोजगाराकरितां पुढील उद्योग आहेत. (१) पीठाच्या गिरण्या २० कामगार, एक धातूचा कारखाना २० कामगार, स्टेट ट्रान्स्पोर्ट गाड्या दुरुस्त करणारे ५१ कामगार, भात सडण्याची गिरणी २५कामगार व इतर कारखाने.

मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंदे

साखर कारखाने—एकंदर ५४०० एकर जमीन उसाखाली असून ती कलंबर आणि कंधार तालुक्यांत आहे. हाच आंकडा व हेंच प्रमाण मन्याड धरण पूर्ण झाल्यावर २५०० एकराने वाढेल असा अंदाज असून सहकारी तत्वावर एक साखर कारखानाहि कलंबर तालुक्यांत सुरू होईल अशी अपेक्षा आहे.

सरकी—बऱ्याच प्रमाणांत उपलब्ध असून हल्ली आपण गुजराथ मधूनही सरकीची आवक करतों. सरकीचा उपयोग जनावराचें खाद्य म्हणून होत असून सरकीच्या तेलाचा उपयोग फार आहे.

कापूस कातण्याच्या गिरण्या—एकूण जिल्ह्यांत होणाऱ्या कापूस उत्पादनांपैकीं स्थानिक कापड गिरण्या १५ टक्के कापसाचा उपयोग करतात आणि इतर कापूस अन्यत्र पाठविला जातो. जिल्ह्यांतील हातमाग धंद्यास ५३ लक्ष पौंड कापसाची गरज असता त्या ठिकाणीं फक्त १० लक्ष पौंड कापूस उपलब्ध आहे. कापूस पुष्कळ प्रमाणांत उपलब्ध असल्यामुळें नांदेड या ठिकाणीं अजून एक गिरणी सुरूं करण्यास वाव आहे.

लघु उद्योगधंदे

लघुउद्योगधंदे विशेषतः जनतेच्या रोजच्या गरजा भागविण्याकरितां फार आवश्यक असून मालाचा त्वरेने उठाव होण्यास मदत होते. मोठ्या प्रमाणांत असणाऱ्या धंद्यास लागणारे भांडवल, वीज आणि यंत्रसामुग्री सहज उपलब्ध असल्यानें लघुउद्योग सुरूं करणें अनिवार्य आहे. देशांत आर्थिक समता येण्याकरितां उद्योगधंदे हे मोठ्या प्रमाणांत सुरूं करणें आवश्यक आहे. जिल्ह्यांतील महत्वाचे लघु-उद्योग म्हणजे जीनिंग गिरण्या, तेलघाण्या, लोहारकाम हे आहेत. नांदेड जिल्ह्यामध्यें लोखंडाचे खिळे बनविण्याचे दोन कारखाने होते परंतु कच्च्या मालाच्या अभावी ते दोन्हीहि बंद करावे लागले. त्यापैकीं एक पुन्हा सुरूं होण्याची शक्यता आहे. वरील लघुउद्योगाशिवाय गूळ तयार करण्याचा एक धंदा असून एकूण १८५ ठिकाणी गूळ तयार केला जातो.

नवीन लघुधंद्यास वाव

मुद्रण—मुद्रण व्यवसायास योग्य अशी बरीच साधने उपलब्ध करणें शक्य आहे.

पोलाद कारखाना—एकंदर ३०० ते ५०० टन पोलाद हे दरवर्षी नांदेडहून अहमदाबाद येथें जात असते. याचा उपयोग नांदेड जिल्ह्यांत केल्यास शेतकीची अवजारे, फाळ, गिरणीस लागणारे ओतीव लोखंडाचे भाग इ. येथेंच तयार होतील.

लोखंडी सामानः—जिल्ह्यांत कमीत कमी दोन ठिकाणी लोखंडाचे कारखाने सुरूं करणे शक्य आहे.

फॉस्फेटिक स्वरूपाची खते तयार करण्यासाठीं हाडांचा उपयोग केला जातो. नांदेड जिल्हा मुख्यतः शेतीप्रधान असल्यामुळें या धंद्यास विशेष महत्व आहे. मृत जनावरांचा पुरवठाहि मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळें या धंद्याचे महत्व आर्थिक दृष्ट्या वाढलेले आहे.

नांदेड जिल्ह्यांतील किनवटजवळ असलेल्या अरण्यमय प्रदेशामुळे लाकूड तोडीचा व्यवसाय फार मोठ्या प्रमाणावर चालतो.

किनवट तालुक्यामध्यें चुनखडी सांपडते. अर्थातच चुनखडीच्या धंद्यालाहि भरपूर वाव आहे. विशेषतः बांधणीच्या कामासाठीं हॅड्रॉलिक प्रकारच्या चुनखडीचा उपयोग चांगल्या प्रकारे होऊं शकेल.

कुटिरोद्योगः—मुख्यतः खालील कुटिरोद्योग नांदेड जिल्ह्यांत चालतात. विणकाम, कातडी कमावणें, सुतारकाम, बीडाचे काम, लोहार काम, विटा तयार करणें इत्यादि-

खालील तक्त्यांत कुटिरोद्योग व त्याचे क्षेत्र दर्शविण्यांत आले आहे.

उद्योगधंदे	प्रदेश
१) तेल गाळणे	नांदेड, कंधार, देगलूर, धर्माबाद, लोहा, मुक्माबाद, बेटमोगरा, मुखेड.
२) लाकूड रांधणे	नांदेड, किनवट, सहस्त्रकुंड, नाथरोड.
३) गूळ व गुळीसाखर	हादगांव, येवती, कुंडलवाणी, वणेगांव, फोलब्ल, जाम, उमरी.
४) हातमाग	नांदेड, कोडीलवाडी, जहूर, धर्माबाद, वणेगांव, सुखेड, लोहा, कंधार, मुकमाबाद, मानसपुरी, करडखेड, शहापूर, मुखेड.
५) रंगाचे काम	हिमायतनगर, नांदेड, मुखेड.
६) साबण तयार करणे	नांदेड, कंधार, देगलूर.
७) कातडी कमाविणें	नांदेड, किनवट, धर्माबाद, लोहा, फुलवट जहूस, हिनायतनगर, मुखेड, मुक्माबाद.
८) पॉटरी	कोडलवाडी, फुलबेट, एकलारा, बेटमोगरा, मुखेड.
९) विटा आणि कौले	कोडलवाडी, येवती, फुलबेट, एकलारा, बेटमोगरा, शहापूर, करडखेड.
१०) बांबू	वणेगांव, कोडलवाडी, धर्माबाद, मुखेड, हदगांव.
११) धातुकाम	नांदेड, कोडलवाडी, धर्माबाद, कंधार, लोहा, मुखेड, मुक्माबाद, देगलूर.
१२) लोहारकाम	नांदेड, लोहा, हदगाव, सुखेड, कोडलवाडी.

वरील उद्योगधंद्यामध्यें विद्युत शक्तीचा उपयोग केला जात नाहीं. शिवाय प्रत्येक कारखान्यांत १० पेक्षां जास्त मजूर काम करीत नाहींत. खालील तक्त्यावरून प्रत्येक उद्योगधंद्यामध्यें किती विभाग काम करतात व प्रत्येकी किती मजूर हा व्यवसाय करतात हे कळून येईल.

उद्योगधंदा	विभाग	मजूर
विणकाम	९१९	—
रंगकारखाना	१०	२८
लोहारकाम	१३९	२८१
धातूकाम	१९७	—
सुतारकाम	३०९	५४३
बांबूकाम	११६	३३८
विटा व कौले	१७७	—
पोटरी	१३७	—
कातडी कमावणें	४७३	११३०
तेलघाण्या	६१	१९१
साबण	५	२४
भात सडणे	४१	१२१

हे उद्योगधंदे निरनिराळ्या ठिकाणीं विखुरलेले आहेत. त्यामध्यें कोणत्याहि प्रकारचा एकसूत्रीपणा नाहीं. हळूं हळूं या उद्योगधंद्यामध्यें एकसूत्रीपणा आणण्यासाठीं सहकारी संस्थामार्फत त्यांना आर्थिक व तांत्रिक मदत करणें आवश्यक आहे.

उपरिनिर्दिष्ट विवेचनावरून आर्थिक विकासाचा पुढील टप्पा नांदेड जिल्ह्यातर्फें विशिष्ट सोयी उपलब्ध झाल्यानंतर लवकरच गाठला जाईल असा विश्वास वाटतो.

सार्वजनिक आरोग्य आणि वैद्यकीय सुखसोयी

नांदेड या जिल्ह्याच्या प्रमुख ठिकाणी जिल्ह्यांतील सर्वात मोठे असे सिव्हिल हॉस्पिटल आहे. या हॉस्पिटलमध्यें पॅथालॉजी विभाग, एक प्रयोग शाळा, प्रथमोपचार, क्षयरोगाचे निदान व उपचार करण्यासाठीं रूग्णालय, चिकित्सालय ह्या सर्व सोयी आहेत. वैद्यकीय व शस्त्रक्रियेसाठीं लागणाऱ्या सर्व साधनांनीं तें परिपूर्ण आहे. गंभीर स्वरुपाच्या रोगावर उपचार करणारे हे मध्यवर्ति केन्द्र असले तरी तालुक्याच्या सर्व प्रमुख ठिकाणी व इतर कांहीं गांवीं जागजागी लहान मोठ्या प्रमाणावर दवाखाने आहेत. नांदेड येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्यें ॲलोपॅथिक चिकित्सा पद्धतीचा अवलंब करण्यांत येतो. या हॉस्पिटल व इतर दवाखान्याद्वारे जनतेला वैद्यकीय मदत केली जाते. ह्याशिवाय परवाने असलेल्या डॉक्टरांद्वारे कांहीं ठिकाणीं प्राथमिक आरोग्य केन्द्रेंहि उघडण्यांत आलेलीं आहेत.

कांहीं लोकांचा आयुर्वेदीय चिकित्सा पद्धतीकडे विशेष कल असल्याचें दिसून आल्यामुळें नांदेड येथें एक आयुर्वेदीक हॉस्पिटलहिं सुरुं करण्यांत आले.

जिल्ह्यामध्यें हॉस्पिटल, मोठे दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्रें यांच्या व्यतिरिक्त ॲलोपॅथिक, आयुर्वेदिक व युनानी अशा चिकित्सा पद्धतीने उपचार करणारे खाजगी डॉक्टरही जिल्ह्यांत आहेत.

खाली दिलेल्या तक्त्यावरून वैद्यकीय सुखसोयींची आंकडेवारी लक्षांत येईल. आंकडेवारीवरून ह्या क्षेत्रांत निश्चित प्रगति झालेली आहे असे आढळून येते.

तपशील	ॲलोपॅथिक	आयुर्वेदिक	ॲलो.	आयु.	ॲलो.	आयु.
	१९५१		१९५६		१९६१	
१	२	३	४	५	६	७
१) हॉस्पिटले	१	—	१	—	१	१
२) प्रसूति गृहे	—	—	—	—	१	—
३) दवाखाने	६	—	११	—	१३	—
४) आरोग्य केंद्रें	—	—	—	—	६	—
५) प्राथमिक आरोग्य केंद्रें	—	—	—	—	—	—
६) डॉक्टर	११	—	१६	—	१७	१
७) खाटा	—	—	—	—	—	५
८) नर्सेस् (मिडवाइफ धरून)	५	—	५	—	१२	२
९) खाटा :—						
अ) पुरुष	४३	—	५९	—	६३	२४
ब) स्त्री	३९	—	५९	—	६१	३६
क) मुले	—	—	—	—	—	—
ड) एकूण	८२	—	११८	—	१२४	६०

तपशील	ॲलोपॅथिक	आयुर्वेदिक	ॲलो.	आयु.	ॲलो.	आयु.
	१९५१		१९५६		१९६१	
१	२	३	४	५	६	७
१०) उपचारित अंतर्ऋग्ण :—						
अ) पुरुष	—	—	४७७६	—	२३५१४	१०६७१
ब) स्त्री	—	—	३०७०	—	१८८६२	६११०
क) मुले	—	—	६३३	—	४६६१ (वर अंतर्भूत)	
ड) एकूण	—	—	८४७९	—	४७०३७	१६७८१
११) उपचारित बाह्य ऋग्ण :–						
अ) पुरुष	—	—	२९२७६३	—	२७००३९	७४९५५
ब) स्त्री	—	—	१३३१९६	—	१५२८४९	४४४३०
क) मुले	—	—	१६०३८१	—	२१४०६३	—
ड) एकूण	—	—	५८६३४०	—	६३६९५१	११९३८५

गेल्या दहा वर्षांत नांदेड जिल्ह्यांत नांदेड या ठिकाणीं केवळ एकच ॲलोपॅथिक सिव्हिल हॉस्पिटल होते. आतां त्यांत आयुर्वेदिक हॉस्पिटलचीहि भर पडली आहे. दवाखान्यामध्यें वाढ होऊन त्यांची संख्या ६ वरून १३ वर गेली आहे व प्रत्येक तालुक्याच्या गांवीं दवाखाना आहे. तसेच नांदेड तालुक्यांतील मुदखेड, बिलोली तालुक्यांतील धर्माबाद, हदगांव तालुक्यांतील हिमायतनगर, मुखेड तालुक्यांतील मुक्रमाबाद, भोकर तालुक्यांतील उमरी व किनवट तालुक्यांतील मांडवी या सर्व ठिकाणीं दवाखाने उघडण्यांत आले आहेत. सर्व दवाखान्यामध्यें पदवीधर व अनुभवी डॉक्टर काम करतात.

आरोग्य केन्द्रें

नांदेड जिल्ह्यांत एकूण सहा आरोग्य केन्द्रें आहेत. उमरी येथील आरोग्य केन्द्र सोडले तर बाकीची सर्व ग्रामीण विभागांत विखुरलेलीं आहेत. हीं आरोग्य केन्द्रें परवाने असलेल्या डॉक्टरांकडून चालविलीं जात असत. प्रत्येक केन्द्राला डॉक्टर उपलब्ध आहे. नांदेड तालुक्यांतील लिंबगांव, देगलूर तालुक्यांतील भिरखेल, मुखेड तालुक्यांतील बाराहली, हदगांव तालुक्यांतील कोली, भोकर तालुक्यांतील उमरी, किनवट तालुक्यांतील उस्लापूर या सर्व गांवी आरोग्य केन्द्रें आहेत. १०.८ लाख लोकवस्तीच्या या जिल्ह्यांत १,३९९ महसूल देणारी खेडी व ११ गांवे आहेत. या लोकसंख्येसाठीं त्यांना वैद्यकीय मदत पुरविण्यासाठीं २ हॉस्पिटल्स, १३ दवाखाने आणि ६ आरोग्य केन्द्रें आहेत. १६ पैकी ४ दवाखानें व ६ पैकीं ५ आरोग्य केन्द्रें ग्रामीण विभागांत वसली आहेत.

१९५१ पर्यंत जिल्ह्यांत एकहि सरकारी प्रसूतिगृह नव्हते. सध्यां देगलूर येथें एक उघडण्यांत आलें आहे. प्रसूतीची व्यवस्था बहुंशी खाजगी प्रसूतिगृहांतूनच होत असते. १९५१ पर्यंत सिव्हिल हॉस्पिटल व दवाखान्यामध्यें केवळ ११ डॉक्टर्स व ५ नर्सेस काम करीत असत. आतां ही संख्या वाढली असून १७ डॉक्टर्स आणि १२ नर्सेस काम करीत असून ह्यांच्याशिवाय ५ वैद्य, १ ऑनररी डॉक्टर व २ नर्सेस आयुर्वेदिक इस्पितळांत आहेत.

सिव्हिल हॉस्पिटल व इतर दवाखान्यामध्यें मिळून १९५१ सालीं अवघ्या ८२ खाटा होत्या. ३१ मार्च १९६१ ला मात्र त्यांची संख्या १२४ वर गेली. शिवाय आयुर्वेदिक इस्पितळांत ६० खाटांची व्यवस्था होती. ह्याप्रमाणें एकूण १८४ खाटांपैकीं ८७ पुरुषांसाठीं व ९७ स्त्रियांसाठीं ठेवण्यांत आलेल्या आहेत. १९५६ सालीं ११ दवाखाने व एक हॉस्पिटल मिळून ८४७९ अंतर्रुग्णांवर व ५,८६,३४० बाह्यरुग्णांवर उपचार करण्यांत आले. १९६०-६१ च्या दरम्यान १ हॉस्पिटल व १३ दवाखाने मिळून ४७,०३७ अंतर्रुग्ण व ६,३७,९५१, बाह्यरुग्णांवर उपचार करण्यांत आला. तुलनात्मक दृष्टीने पाहिल्यास अंतर्रुग्णांची वाढ बाह्यरुग्णांच्या वाढीपेक्षां बरीच मोठी असल्याचे आढळून येते.

आजाऱ्याची सोय

पांच वर्षांत खाटांची संख्या ही ११८ वरून १२४ वर गेली, व अंतर्रुग्णांची संख्या याच काळांत ६ पटीने वाढली. उपचारार्थ रोज येणाऱ्या बाह्य रुग्णांची संख्या १९५५-५६ मध्यें १६०७ होती १९६०-६१च्या दरम्यान आयुर्वेदिक हॉस्पिटलमधील बाह्य रुग्णांची रोजची संख्या ३२७ होती. सिव्हिल हॉस्पिटल मधल्या १२४ खाटांनी ६०-६१ सालीं ४७,००० अंतर्रुग्णांची सोय केली. म्हणजेच प्रत्येक खाटेने ३१९ लोकांची सोय केली.

आयुर्वेदिक हॉस्पिटलमुळेंहि जनतेला बराच लाभ झाला. ह्या हॉस्पिटलमधील ६० खाटांनीं १६,७०० लोकांची सोय केली. म्हणजेच प्रत्येक खाटेमुळें २८०अंतर्रुग्णाची सोय झाली. १९६०-६१ मध्यें आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्यें १,१९,२८५ बाह्यरुग्णांवर उपचार करण्यांत आले. रोग्याच्या आंकडेवारीवरून असे निदर्शनास येते कीं, सार्वजनिक वैद्यकीय सोयींचा फायदा जिल्ह्यांतील स्त्रीवर्ग कमी प्रमाणांत घेतो. पुरुष, स्त्री व मुले ह्यांचे अंतर्रुग्ण म्हणून हॉस्पिटल व दवाखान्यांत दाखल होण्याचे प्रमाण १९५५-५६ मध्यें अनुक्रमें ५६:३७:७ असे होते. १९६०-६१ मध्ये हेच प्रमाण ४९:४०:११ असे झाले. आयुर्वेदिक हॉस्पिटलमधील हेच प्रमाण १९६०-६१ मध्ये ६४:३८ असे होते. ह्यांत मुलांचे वर्गीकरण नाहीं. त्याचप्रमाणे सिव्हिल हॉस्पिटल व दवाखाने यांतील बाह्य रुग्णांचे पुरुष, स्त्री, मुले ह्यांचे प्रमाण १९५५-५६ सालीं अनुक्रमे ५०:२३:२७ असे होते. तर १९६०-६१ मध्ये ४२:२४:३४ असे झाले. आयुर्वेदिक हॉस्पिटलमधील हेच प्रमाण १९६०-६१ मध्ये ६३:३७ असे होते. ह्यांत मुलांचे वर्गीकरण केलेले नाहीं.

बी. सी. जी. मोहीमः—क्षयरोग प्रतिबंधाच्या उद्देशाने नांदेड येथें बी. सी. जी. राष्ट्रीय योजना अमलांत आणण्यांत आली व अनेक ठिकाणी या मोहिमेद्वारे लोकांना लस टोचण्यांत आली.

कुटुंब नियोजन

भारतामध्यें अन्नधान्याच्या वाढीपेक्षां लोकसंख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढत असल्यामुळे कुटुंबनियोजन आवश्यक होऊन बसले आहे. अतिवेगाने वढणाऱ्या आणि सर्वसामान्यांच्या संसाराची उत्कृष्ट घडी बसण्यासाठीं सरकारने ही कुटुंब नियोजनाची योजना हातीं घेतली. ह्या योजनेद्वारें कुटुंब नियोजनाचें महत्व जनतेला समजावून सांगण्यांत येते व शिबिरे भरवून संतती प्रतिबंधक शस्त्रक्रिया करून घेणारांना खर्चासाठीं पैसाहि देण्यांत येतो. १९६०-६१ च्या आकडेवारीनुसार नांदेड जिल्ह्यांत सहा कुटुंब नियोजन केंद्रें आहेत. नांदेड, देगलूर, हदगांव, किनवट, कंधार व मुखेड या सहा केंद्रांनी ८ शिबीरे भरविली आणि २६५ व्हॅसेक्टामी आणि ५ ट्युबेक्टामी शस्त्रक्रिया १९६०-६१ च्या दरम्यान केल्या. या काळांत वरील शस्त्रक्रियांसाठीं अनुक्रमे ४,७४० रु. व ८० रु. भरपाई म्हणून

वांटण्यांत आले. शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या ज्या इसमाचे उत्पन्न २५० रु. पेक्षां कमी होते त्यांनाच ही भरपाई देण्यांत आली.

नियोजन कार्याचें स्वरूप—१) कुटुंब नियोजनाचें शिक्षण देण्यासाठीं लोकांना भेटणे, २) कुटुंब नियोजन पद्धतींचा वापर करण्यासाठीं लोकांना सल्ला देणे, ३) जत्रा व सभांमधून सर्व-साधारण व्यक्तीच्या अडीअडचणी ऐकून घेऊन कुटुंब नियोजन पद्धतीच्या फायद्याची त्यांना खात्री पटवून देणे, ४) गरजूंमध्ये प्रतिबंधक साधनांचे वांटप करणे, ५) व्हॅसेक्टामी व टयुबेक्टामी शस्त्रक्रिया ज्यांच्यावर करावयाची आहे त्यांचीं नांवे नोंदविणें. ६) स्त्री आणि पुरुष पार्टटाईम डॉक्टर्सकडून शस्त्रक्रिया करवून घेणे.

कुष्ठरोग

कुष्ठरोग हा ईश्वरी प्रकोप व महाभयंकर रोग आहे अशी चुकीची समजूत आहे. जिल्हा आरोग्य खात्यातर्फे रोगपीडित हुडकून काढण्यासाठी व समाज शिक्षण व उपचार ह्या कार्यासाठीं चार केन्द्रांची स्थापना करण्यांत आली आहे. दवाखाने, प्राथमिक आरोग्य केन्द्रें, वैद्यकीय अधिकारी आणि जिल्हा आरोग्याधिकारी हीं केन्द्रें चालवितात. कुष्ठरोगासाठी एक कुष्ठरोग तज्ज्ञ डॉक्टरहि आहे. मुखेड तालुक्यांतील मुक्रमाबाद येथील व किनवट येथील एक एक पूरक कुष्ठरोग केंद्र मुख्य केंद्राशी जोडण्यांत आलेले आहे. या कुष्ठरोग केंद्राचे कार्य खालीलप्रमाणें आहे. (१) पाहणीतून नवीन लागण शोधून काढण्याचा कार्यक्रम आंखणे. (२) अशा रोग्यांवर उपचार करणे. (३) प्रसिद्धि आणि आरोग्याचे शिक्षण. (४) रोग्यांच्या व त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांच्या कल्याणाचे कार्यक्रम हातीं घेणे. मार्च १९६१ पर्यंत उपचार केलेल्या कुष्ठरोग्यांची संख्या २,१६५ होती व तेवढ्याच रोग्यांवर उपचार केले जात होते.

मलेरिया निर्मूलन

भारतामध्यें बहुसंख्य लोक मलेरियाच्या आजाराने आजारी पडतात. मलेरियाचा हा उपद्रव कमी करण्याच्या उद्देशाने आरोग्य खात्यातर्फे मलेरिया निर्मूलनाची मोहीम सुरू करण्यांत आली. नांदेड जिल्ह्यांत ही मोहीम १९४८ सालीं सुरू झाली. त्यावेळीं फक्त मलेरियावर नियंत्रण घालण्याचा कार्यक्रम होता. समूळ उच्चाटनाचा विचारहि करण्यांत आला नव्हता आणि त्यावेळी खेड्यापाड्यांतून झाडाझुडपांतून, डबकीं तळ्यांच्या काठावरून डी. डी. टी. फवारणे हाच कार्यक्रम अंमलांत आणण्यांत आला होता.

परंतु आतां मात्र यासंबंधीची संपूर्ण माहिती करून घेऊन संशोधनांतील मलेरियाच्या उच्चाटनाची मोहिम निश्चित करून त्यासंबंधीं निश्चित योजना आंखण्यांत आल्या आहेत.

प्लॅन पब्लिसिटी

डासांचा नायनाट करणे, त्यांची उत्पत्ती थांबविणे ही ह्या बाबतींतील पहिली पायरी. त्यानंतर यासाठीं दलदलीच्या जागा, गोठे, डबकी इत्यादि ठिकाणी डी. डी. टी. फवारणे हें काम हातीं घेतलें गेलें. ह्यामुळें सतत तीन वर्षांच्या उपाय योजनेने मलेरियाचे डास नष्ट होतात व डासांच्या उत्पत्तीला आळा बसतो. ह्यानंतरची पायरी म्हणजे मलेरियाच्या ठराविक हंगामांत रोगी हुडकून काढणें, त्याच्या रक्ताची तपासणी करणें व त्यावर औषधोपचार करणें ही होय. नांदेड जिल्ह्यांतील मलेरिया निर्मूलनखात्यानें ह्यासंबंधांत काय केलें तें खालील तक्त्यावरून दिसून येईल.

महिना व वर्ष	रक्त तपासणीचा आंकडा	मलेरियाचा दोष आढळलेले रोगी
जानेवारी १९६१	१०८०	०
फेब्रुवारी १९६१	१३७४	०
मार्च १९६१	१९०५	०
एकूण तपासलेले रोगी	४२८९	०

ह्यावरून असें दिसून येईल कीं, मलेरियाच्या समूळ नायनाटासाठीं आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यांत येत असून नजिकच्या भविष्यांत मलेरियाची पाळेंमुळें खणून काढण्यांत आरोग्य-खात्याला यश येईल अशी खात्री आहे.

आरोग्य व्यवस्था

नांदेड जिल्ह्यांत जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्याचें कार्य सार्वजनिक आरोग्य खात्यातर्फे दोन प्रकारांनीं केलें जातें. एक म्हणजे सामुदायिक आरोग्य चांगलें व सुदृढ राहावे म्हणून प्रतिबंधक उपाययोजना आणि दुसरे म्हणजे जिल्ह्यांत ठिकठिकाणी दवाखाने आणि इस्पतळें उघडून रोग पीडितांच्या उपचाराची व्यवस्था करणें. सार्वजनिक आरोग्यखात्याच्या मार्गदर्शनाखालीं ग्रामीण विभागापर्यंत जनतेच्या आरोग्याची काळजी घेतली जाते. या कार्यांत स्थानिक संस्था व ग्रामपंचायतीहि मदत करतात. जिल्हा सार्वजनिक आरोग्याधिकाऱ्यांचे कार्यालय नांदेड येथें आहे.

उपचारव्यवस्था—जिल्ह्याचे प्रमुख इस्पितळ नांदेड येथें असून सिव्हिल सर्जन त्याचे काम पहात असतात. त्याचप्रमाणे एक प्रमुख आयुर्वेदिक इस्पितळ नांदेडला आहे. प्रत्येक तालुक्याला इस्पितळें आहेत.

नांदेड जिल्ह्यांत आरोग्य उपचार व्यवस्था तीन वैद्यकीय प्रणालीद्वारें केली जाते.

ॲलोपॅथिक—या पद्धतीचा नांदेडचा प्रमुख दवाखाना धरून १३ दवाखाने संपूर्ण जिल्ह्यांतील खालील गांवी आहेत.

(१) नांदेड (२) बारड (३) धर्माबाद (४) उमरी (५) मांडवी (६) मुकरमाबाद (७) देगलूर (८) हदगांव (९) किनवट (१०) भोकर (११) मुखेड (१२) बिलोली (१३) कंधार.

आयुर्वेदिक—आयुर्वेदिक पद्धतीचे ६ दवाखाने नांदेड जिल्ह्यांत आहेत. नांदेडला ५० खाटांचें एक अद्यावत आयुर्वेदिक इस्पितळ आहे. लवकरच तेथें आणखी २५ खाटांची व्यवस्था होणार आहे. सध्यां नांदेड, लोहा (कंधार तालुका), जांब (मुखेड तालुका), हदगांव तालुका, कौंडलवाडी (बिलोली तालुका) व कामार (हदगांव तालुका) या ठिकाणी आयुर्वेद दवाखाने आहेत.

युनानी पद्धतीचे सुद्धां ६ दवाखाने नांदेड जिल्ह्यांतील बेटमोगर, नायगांव, अर्धापूर, उस्मान-नगर, किणी व मुदखेड या गांवी आहेत.

या व्यतिरिक्त नांदेड जिल्ह्यासाठीं ५ प्राथमिक आरोग्य केंद्रें मंजूर झालेलीं असून त्यापैकी तीन सध्यां कोळी (हदगांव तालुका), मरखेड (देगळूर तालुका) व लिमगांव (नांदेड तालुका) या ठिकाणी कार्य करीत आहेत. लवकरच उमरी व इस्लापूर या दोन ठिकाणी नवीन आरोग्य केंद्रें उघडण्यांत येणार आहेत.

याच्या जोडीला नांदेड जिल्ह्यांत सध्यां दोन कुटुंब नियोजन केंद्रें देगलूर आणि उमरी या दोन गांवांत कार्य करीत आहेत. प्रत्येक खेड्यांतून दवाखाने उघडणें शक्य नसल्यामुळें नांदेड जिल्ह्यांतील १४ खेड्यांत दाई केंद्रें उघडण्यांत आलीं आहेत. या केंद्रांवर ६ महिन्याचें प्रशिक्षण पूर्ण केलेल्या दायांची नेमणूक केली जाते. खेड्यांतून प्रसूतीच्या वेळीं या दाया वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्याचें महत्वाचें कार्य करतात.

ह्या व्यतिरिक्त नांदेड हॉस्पिटलमध्येंहि कुष्ठरोगाचे व क्षयरोगाचे विभाग असून येथें तज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखालीं या रोग्यांवर उपचार केले जातात. त्याचप्रमाणें मुखेड तालुक्यांतील मुकरमाबाद, कंधार, हदगांव व किनवट या तालुक्याच्या गांवी कुष्ठरोग्यांवर औषधोपचार केला जातो. जिल्ह्यांतील बहुतेक मोठ्या दवाखान्यांत स्त्रियांसाठीं खास व्यवस्था असून या दवाखान्यांना प्रसूतीचेहि विभाग जोडलेले आहेत.

प्रतिबंधक उपाय योजना

जिल्हा आरोग्याधिकारी हे प्रतिबंधक उपाय योजनेचे प्रमुख असून शहरी व ग्रामीण भागांतील सर्वसामान्य आरोग्याबाबतची परिस्थिती, यात्रा, उत्सवप्रसंगी आरोग्याची व्यवस्था, साथींचे रोगांवर प्रादुर्भाव झाल्यास त्याचा प्रतिबंध करणें आदि महत्वाची कार्यें त्यांच्याकडे असतात. नांदेड जिल्ह्यांत सार्वजनिक आरोग्याचें रक्षण, पाहणी, शिक्षण व उपचार पद्धतीने केले जाते. ह्यासाठीं प्रत्येक तालुक्यासाठीं हेल्थ इन्स्पेक्टर नेमलेले आहेत. सध्यां नांदेड जिल्ह्यांत इन्स्पेक्टर्स, सब इन्स्पेक्टर्स व व्हॅक्सिनेटर्स मिळून १७ लोक आहेत. ग्रामीण पातळीपर्यंत त्यांचें कार्य सतत चालू असते. व्हॅक्सिनेटर्स हे देवी प्रतिबंधक लस व साथीच्या काळांत लस टोचण्याचें (प्रतिबंधक लस) काम करतात.

जिल्ह्यांतील आठ सॅनिटरी पथकें

सॅनिटरी पथकें हीं साथीच्या काळांत घरें, मलमूत्र, विहिरी, रोग्यांचे कपडे वगैरे जंतुविरहित करण्यांत येतात. सर्वसाधारण कामांत विहिरी जंतुविरहित करण्याची औषधें टाकणें, रस्ते साफ करणें, मलमूत्र आणि काडी कपड्याचे कंपोस्ट खत बनविणें आणि ग्रामीण जनतेला आरोग्यविषयक संवयी लावणें इत्यादि कार्य ही सॅनिटरी पथकें करतात. ग्रामीण भागांत स्वच्छता राखण्यासाठीं उपाययोजना करणें, घरें, रस्ते, पाणोठे यांची स्वच्छता व जनतेस प्रात्यक्षिकांद्वारे शिक्षण देणें इत्यादि कामांची जबाबदारी जिल्ह्यांतील ८ इन्स्पेक्टर्सवर असते. त्याचप्रमाणें जन्ममृत्युची नोंदणी, तपासणी, खानावळी, व हॉटेल्स यांची स्वच्छतेच्या दृष्टीनें तपासणी व साथीच्या काळांत प्रतिबंधक उपाय योजना करण्याचे कार्यहि त्यांना करावे लागते. याशिवाय जिल्हा आरोग्याधिकारी शाळेतील मुलांच्या आरोग्याचीहि तपासणी करतात, तसेच कारखाने गिरण्या, सिनेमागृहे, पाणीपुरवठा आदींची स्वास्थ्यदृष्ट्या पाहणी करून सल्ला देतात.

१९५८ साली मलेरिया निर्मूलन योजना नांदेड जिल्ह्याला लागू करण्यांत आली. १९५८ ते १९६० ह्या काळांत जिह्यांतील प्रत्येक घरांतून ६ वेळीं डी. डी. टी. फवारण्यांत आली आहे. या

कामासाठीं अधिक नोकर वर्ग मिळाला असून मलेरिया निर्मूलन अधिकाऱ्यांची कचेरी नांदेडला आहे. मलेरिया निर्मूलन कायद्याचें महत्व व त्याच्या यशाची खात्री ग्रामीण भागांतहि पटूं लागल्यामुळें

मलेरिया निर्मूलन

ग्रामीण भागांतील जनताहि स्वयंस्फूर्तीने डी. डी. टी फवारण्यास सहाय्य करीत आहे. या कार्यक्रमासाठीं दर १५ दिवसाला निर्मूलन कार्याचा सेवक प्रत्येक घरीं जाऊन कुणी तापाने आजारी आहे कां याची चौकशी करतो व कुठलाहि ताप असला तरी त्याची नोंद घेतली जाऊन रोग्याचे रक्त परीक्षणासाठीं मलेरिया निर्मूलन कार्याच्या संशोधन शाळेत आणले जातें. यासाठी नांदेड येथें एक प्रयोगशाळा व अनेक टेक्निशियन्सची नेमणूक करण्यांत आली आहे. मलेरियापासून आजारी असणाऱ्या रोग्याला ह्या संघटनेतर्फे फुकट औषध देण्यांत येते.

मलेरिया निर्मूलनाच्या या कार्यक्रमामुळें १९५८–५९ सालीं मलेरियाने पछाडलेल्या रोग्यांची संख्या ७ टक्के होती ती आतां ४ टक्क्यावर आली आहे.

वाहतूक व दळणवळण

१९०० सालीं सुरू करण्यांत आलेल्या निझाम स्टेट रेल्वेमुळें कापूस उत्पादन करणारे नांदेड, परभणी व औरंगाबाद हे तीन जिल्हे रेल्वे वाहतुकीला खुले झाले. या रेल्वे लाईनमुळें हैद्राबाद रेल्वेनें मनमाडशीं जोडलें गेलें असून हैद्राबाद ते मनमाड लांबी ३९१ मैल आहे. यानंतर १९३१ सालीं मुदखेड ते आदिलाबाद असा १०१ मैल लांबीचा रेल्वे मार्ग चालू करण्यांत आला. १९५० पर्यंत रेल्वे निझाम स्टेट रेल्वेच्या अंतर्गत होती. परंतु १९५० मध्यें भारतीय रेल्वेच्या पुनर्रचनेनंतर एकसूत्रीपणा साधण्यांत आला असून नांदेड जिल्ह्यांतील हे दोन रेल्वेमार्ग मध्य रेल्वेकडे आले आहेत.


रेल्वेमार्ग

नांदेड जिल्ह्यांतील रेल्वेमार्गांची लांबी १३१ मैल आहे. हा रेल्वेमार्ग "मीटरगेज" आहे. क्षेत्रफळ आणि लोकसंख्येच्या प्रमाणांत रेल्वेमार्गांचें नांदेड जिल्ह्यांतील प्रमाण हें भारतांतील इतर कोणत्याहि भागापेक्षां जास्त आहे. भारतांतील इतर भागांत रेल्वे मार्गांचें प्रमाण एक लाख लोकवस्तीला १० मैल आहे, तेंच प्रमाण नांदेड जिल्ह्यांत १४.५ मैल आहे व दर शंभर चौरस मैलास हें प्रमाण ३.३ मैल असें पडतें. हैद्राबाद ते मनमाड लोहमार्गास नांदेड गोदावरी व्हॅली लाईन असें नांव पडलें आहे. या लोहमार्गामुळें नांदेड जिल्ह्याच्या व्यापारांत फार मोठी भर पडली. वाहतुकीच्या सुकरतेमुळें कच्च्या मालानें समृद्ध असलेला भाग व पक्का माल निर्माण करणारे भाग एकमेकास जोडण्यांत आले व फलस्वरूप जिल्ह्याच्या आर्थिक व व्यापारविषयक प्रगतींत भर पडली. नांदेड व आसपासच्या प्रदेशांत कापूस निर्मिति फार मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळें नांदेड, मुखेड, उमरी, करखेली आणि धर्माबाद ह्या गांवांत जिनिंग आणि प्रेसिंग फॅक्टरीज उघडण्यास फार मोठी मदत झाली.

सध्यां नांदेड जिल्ह्यांतील लिंबगांव, नांदेड, मुगट, मुदखेड, शिवणगांव, उमरी, करखेली आणि धर्माबाद हीं आठ गांवें गोदावरी लोहमार्गावर आहेत. तेथें रेल्वे स्टेशन आहे व मुदखेड आदिलाबाद लाईनवर नांदेड जिल्ह्यांतील मुदखेड, बिंबारी, भोकर, थेरबन, हदगांव रोड, जलगांव (दफन), सहस्त्रकुंड, धानोरा, बोथ रोड आणि किनवट अशीं ११ रेल्वे स्टेशनें आहेत. हा रेल्वे मार्ग १०१ मैल लांबीचा आहे. ह्या लोहमार्गामुळें किनवट तालुक्यांतील जंगल मालाची ने आण करणें सुकर झालें आहे.

राष्ट्राच्या प्रगतींत भरपूर व उत्तम दळणवळणाच्या मार्गांचा हिस्सा फारच मोठ्या प्रमाणांत आहे. शरीरांत ज्याप्रमाणें रक्तवाहिन्या ह्या आवश्यक असतात त्याचप्रमाणें हे खुष्कीचे मार्ग हे देशाच्या भरभराटीच्या दृष्टीनें महत्वाचे असतात. अर्थातच ह्या मार्गांच्या अभावामुळें राष्ट्राच्या प्रगतींत अडथळा होतो.

वाहतूक व दळणवळण



आपल्या देशांत सडकांच्या विकासाच्या दृष्टीनेंच "नागपूर योजना" आंखण्यांत आली. यामध्यें दळणवळण मार्गाचा विकास प्रामुख्याने पाहिला गेला. यांत दळणवळणाचे मार्ग चार प्रकारांत विभागले गेले आहेत. ते असेः–(१) राष्ट्रीय हमरस्ते (२) राज्यनिहाय हमरस्ते (३) जिल्हयांतील रस्ते आणि (४) ग्राम रस्ते. हे रस्त्यांचे जाळे पसरतांना मुख्यतः दोन गोष्टी प्रामुख्याने डोळ्यापुढे ठेवल्या गेल्या. एक म्हणजे ५०० किंवा त्यापेक्षां जास्त लोकसंख्या असलेले भाग परस्पराशीं जोडले जावेत आणि दुसरे म्हणजे हे मार्ग दुसऱ्या खेडयाच्या तीन मैलाच्या परिसरांत असावे. या योजनेमुळें त्या त्या भागांतील गरजा भागविणे, आणि शेतकी व औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीने निरनिराळे कमी–अधिक लोकसंख्या असलेले भाग वसवणे सोईचें झाले.

नागपूर योजना

रस्त्याच्या बाबतींत नांदेड जिल्हा फारच मागासलेला आहे. कारण येथें दळणवळणाचे मार्ग फारच कमी आहेत. खालील आंकडेवारीवरून नांदेड जिल्ह्यांतील रस्त्यांची स्पष्ट कल्पना येईल.

नांदेड जिल्ह्यांत सध्यां खालील रस्ते उत्तम स्थितींत आहेत. एकूण १५८ मैल लांबीचे रस्ते नांदेड जिल्ह्याच्या दळणवळणाच्या रक्तवाहिन्या आहेत. जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळाशी रस्त्याच्या मैलांची तुलना करतां ती फार कमी आहे. नागपूर योजनेच्या उद्दिष्टाजवळ येण्यास नांदेडला अद्याप बरीच मजल मारावयाची आहे.

त्यापैकी सर्वांत महत्वाचा म्हणजे हैदराबाद-अकोला रस्ता. हा ७२ मैलाचा असून त्यानंतरचे महत्वाचे रस्ते म्हणजे जाहिराबाद ते नांदेड हा रस्ता सुमारे ३४ मैल, डिचपल्ली ते नरसी रस्ता सुमारे १९ मैल, हदगांव जोड रस्ता सुमारे १९ मैल, कंधार जोड रस्ता सुमारे ७.९० मैल व नांदेड शहरांतील एकूण १५० मैल लांबीच्या सडका. यांपैकीं जवळ जवळ ५० मैल नांदेड ते देगलूर हा डांबरी रस्ता आहे. ९० मैल मार्ग हा राजमार्ग किंवा "स्टेट हाय वे" मध्ये मोडतो. याव्यतिरिक्त दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनुसार २५३ मैल लांबीच्या १४ रस्त्यांचें बांधकाम जवळ जवळ पूर्ण होत आले आहे. त्यांत खालील रस्त्यांचा समावेश होतो :–

हैद्राबाद–अकोला रस्ता

१६ मैल नांदेड--भोकर रस्ता, २१ मैल हदगांव–तामसा रस्ता, ९ मैल उमरी–भोकर रस्ता, १३–५० मैल देगलूर–उदगीर रस्ता, १६ मैल हदगांव–बॉर्डर रस्ता, २ मैल उमरी–नायगांव रस्ता, २० मैल राहेर-धर्माबाद रस्ता, १२ मैल किनवट-माहूर रस्ता, ३२ मैल नांदेड-पूर्णा रस्ता, १० मैल अर्धापूर-तामसा रस्ता, २० मैल हदगांव-येळेगांव रस्ता, १४ मैल भोकर-मैसा रस्ता, व भोकर इस्लापूर किनवट रस्ता ५०–५१ मैल असे एकूण जिल्हयांत मिळून २५३.७५ मैल लांबीच्या रस्त्यांचे काम चालले. १९५०–५१ या सालांत या नांदेड जिल्हयांत १५८.२२ मैल लांबीचे रस्ते होते. ते १९६०–६१ चे वेळेला २४८.५५ मैल लांबीचे झाले. यावरून असे आढळून येते कीं, १९६०–६१ या सालामध्यें दर शंभर चौरस मैलाला ६ २ मैल रस्ते आहेत आणि एक लाख लोकसंख्येला २३ मैल असें प्रमाण आढळते.

नरसी मुखेड रस्ता

मध्यवर्ति हमरस्ते, राज्यनिहाय हमरस्ता, प्रमुख जिल्हा मार्ग आणि जिल्हा मार्ग व ग्राम मार्ग असें वर्गीकरण रस्त्यांचे आढळते. ग्राम मार्ग हे लोकल बोर्डाच्या व्यवस्थेखाली असून बाकीचे सर्व "स्थापत्य व वाहतुक विभाग" (बिल्डींग्ज ॲन्ड कम्युनिकेशन्स डिपार्टमेंट) यांच्या व्यवस्थेखालीं आहेत. मध्यवर्ति हमरस्ते या जिल्हयात आढळत नाहीत. राज्यनिहाय हमरस्त्यांच्या बाबतींत नांदेड--देगलूर हाच एक मार्ग होय. गेल्या दशकांत या प्रकारच्या रस्त्यांत अधिक वाढ

झालेली नाही. अशा प्रकारचे रस्ते १११.१८ मैल लांबीचे आहेत. तथापि १९५१ मध्यें एकूण रस्त्यांच्या ७०.२ टक्के इतके हे आढळतात आणि १९६१ मध्यें ते ४४.७ टक्के इतके आहेत. इतर रस्त्यांत वाढ झाल्यामुळें टक्केवारींत फरक पडला आहे.

प्रमुख जिल्हा मार्गः—१९५१ या सालांत यांची लांबी २७.१७ मैल होती. तीच १९६१ मध्ये ९७.३७ मैल झाली. १९५१ मध्यें त्यांचे एकूण रस्त्यांशी १७.२ टक्के असे प्रमाण होते तेंच आतां ३९.२ टक्के असे झाले आहे.

जिल्हा मार्गः—हे १९५१ मध्यें फक्त ७.९० मैल होते तर १९६१ मध्यें २३.४४ मैल झाले. या झालेल्या प्रगतींत निव्वळ " मन्याड प्रॉजेक्ट " साठींच १५.५४ मैल लांबीचे रस्ते बांधले गेले आहेत. १९५१ मध्यें ह्या रस्त्यांचे एकूण रस्त्यांशीं ५ टक्के असें प्रमाण होते तर १९६१ मध्यें ते ७.२ टक्के इतके झाले.

ग्राम मार्गः—ह्यांची व्यवस्था " लोकल बोर्डाकडून " केली जाते. दशकाचे सुरुवातीला हे मार्ग ११.९७ मैल लांबीचे होते. दशकानंतर ते १६.५६ मैल लांब झाले. १९५१ मध्ये त्यांचे प्रमाण ७.६ टक्के असे होते व १९६१ मध्ये ८.९ टक्क्यांइतके वाढले.

या रस्त्यांचे त्यांच्या बांधणीनुरूप परत वर्गीकरण करण्यांत आले. बहुतेक सर्व रस्ते "वॉटर बौंड मॅकॅडम् टाईप" आढळतात. त्यांचे प्रमाण १९५१ मध्ये ९७.१ शेंकडा असें आढळतें. अर्थात् उरलेले दुसऱ्या प्रकारांत आढळतात. म्हणजेच " लोअर टाईपस् " या प्रकारांत.

त्याचप्रमाणें १९६१ मध्यें " वॉटर बौंड मॅकॅडम् टाईप "चें प्रमाण ७७.८ टक्के असल्याचे दिसून येते. त्यांची लांबी २४८.५५ मैल आढळते. " ब्लॅक टॉप्पड टाईप " या प्रकारच्या रस्त्यांचे २०.१ टक्के असे प्रमाण आढळते तर " लोअर टाईपचे " २.१ टक्के असें आढळतें.

ह्याव्यतिरिक्त तृतीय पंचवार्षिक योजनेनुसार नांदेड जिल्ह्यांत १७४ मैल लांबीचे रस्ते बांधणीचे कार्य हातीं घेण्यांत येणार आहे. वेळोवेळी दुष्काळी कामें देण्यासाठीं राज्य सरकारतर्फे रस्ते बांधणीचे काम हातीं घेण्यांत येत असते. नांदेड जिल्ह्यांत अशा रीतीने जवळ जवळ ४५ मैल लांबीचे रस्ते बांधण्यांत आले आहेत.

स्टेट ट्रान्सपोर्ट सर्व्हिसेस

नांदेड जिल्ह्यांतील किनवट आणि भोकर हे तालुके सोडले तर बाकींचे संपूर्ण तालुके एस. टी. ने जोडलेले आहेत. नांदेड जिल्ह्याला औरंगाबाद, परभणी, उस्मानाबाद, म्हैसूर राज्यांतील बीदर आणि आंध्र प्रदेशांतील निझामसागर ह्या भागांना दळणवळणाच्या मार्गांना जोडण्याचे काम या जिल्ह्यांत एस. टी. गाड्यांनी केले आहे. ह्या जिल्ह्यांतील विविध गांवातून सुरू होणारे अथवा ह्या जिल्ह्यांतील निरनिराळ्या गांवांना जोडणारे असे १४ प्रमुख मार्ग आहेत व ह्या सर्व मिळून ५२५० मैल अंतराच्या मार्गावर बस वाहतुक चालत असते. ह्यासाठीं ४० बसेचचा एक ताफा नांदेड डेपोत ठेवण्यांत आला आहे. नांदेड शहरापासून एस. टी. मार्गांनी जोडण्यांत आलेली महत्वाची १४ गांवे पुढीलप्रमाणें आहेत.

१) नांदेड ते कन्हेरगांव	हिंगोलीवरून	७५ मैल
२) नांदेड ते पंढरपूर	सोलापूर उस्मानाबादवरून	२२७ मैल
३) नांदेड ते मोमीनाबाद		८७ मैल
४) नांदेड ते तामसा	हदगांववरून	५५ मैल
५) नांदेड ते गंगाखेड		५० मैल

६) नांदेड ते मुखेड		५१ मैल
७) नांदेड ते बिलोली		४७ मैल
८) नांदेड ते निझामसागर	बिलोलीवरून	९२ मैल
९) कंधार ते नांदेड		३२ मैल
१०) नांदेड ते बारूळ (मन्याड धरण) सोनखेड		३४ मैल
११) नांदेड ते पांढरवाडी व भोकर		२५ मैल
१२) नांदेड ते बिदर, अहमदपूर, उदगीर मालेगांव मार्ग		१२१ मैल
१३) नांदेड ते औरंगाबाद जिंतूर, जालना मार्ग		१८४ मैल

नांदेड जिल्ह्यांतील मुख्य डेपो नांदेड येथेंच असून त्याला जोडूनच एक वर्कशॉप आहे. तेथे बस दुरुस्तीचे काम होते, याशिवाय नांदेड शहरांत बस सर्व्हिस चालते. या बसच्या वेळा शाळा, कॉलेजेस व ऑफिसांच्या वेळेशी सुसंगत अशा ठेवण्यांत आल्यामुळें नागरिकांची बरीच सोय झाली आहे.

हवाओी मार्ग आणि जलमार्गः— हे मार्ग नांदेड जिल्ह्यांत आढळून येत नाहींत. मुखेड तालुक्यांत पावसाळ्यांत कांहीं नाले, तळी ह्यांचा वाहतुकीसाठीं उपयोग करून घेण्यांत येतो. हवाई मार्ग नसला तरी नांदेड येथें विमान उतरण्याची सोय आहे.

दळणवळणः— आजच्या या धकाधकीच्या जीवनामध्यें दळणवळणाच्या सोयींची उपयुक्तता आणि महात्म्य किती मोठे आहे हे सांगावयास नको. सद्यःस्थितीला या जिल्ह्यांत दळणवळणाची तीनच साधनें उपयोगांत आणली जातात, व ती म्हणजे १) पोस्ट (२) तार गृह आणि (३) दूर ध्वनियंत्र

पोस्ट खातेंः— १९५०–५१ मध्यें नांदेड जिल्ह्यांत केवळ १०८ पोस्ट ऑफिसे असल्याचे आढळून येते. त्यापैकी शहर विभागांत २४ असून ग्रामीण विभागांत ८४ होती. १९६०–६१ मध्यें त्यांची संख्या २०१ पर्यंत वाढली. त्यापैकी २० ही शहरी विभागांत व १८१ ग्रामिण विभागांत झाली आहेत. १९.८ चौरस मैलाला अथवा ५,३७३ च्या लोकसंख्येला एक असें पोस्ट ऑफिसचें प्रमाण पडतें.

या जिल्ह्यांत १९९९ इतकी महसूल गांवे आणि ११ मोठीं गांवें आहेत. यावरून ११ मोठ्या गांवांसाठीं २० पोस्ट कचेऱ्या आढळून येतात आणि ७७ खेड्यामागें १० पोस्ट कचेऱ्या आढळतात. खरे पाहतां १९५१ मध्यें पोस्ट कचेऱ्या नसलेली खेडी ११५८ होतीं तींच १९६१ मध्यें १०२२ आहेत.

तार–गृहें— १९५०–५१मध्यें हीं तार–गृहे संपूर्ण जिल्ह्यांत दोन होतीं ती१९६०–६१ मध्यें आठ झाली असून हीं सर्व शहरी विभागांतच आहेत.

पत्र पेटिका— गेल्या दशकांत ह्या पत्र–पेटिकांची संख्या १७१ होती तर ती आतां २५७ पर्यंत वाढत गेली आहे.

पोस्टमेन— यांची संख्या पण गेल्या दशकांत २८ पासून ४२ पर्यंत वाढली आहे.

दूरध्वनि गृह व दूरध्वनि यंत्रे— १९६०–६१ मध्यें दूर–ध्वनिगृहे चारच आढळतात. दशकापूर्वी हींच गृहे फक्त दोनच आढळतात. १९६०–६१ मध्यें एकूण २५९ दूर–ध्वनि यंत्रे होती.

आकाशवाणी परवाने— खुद्द नांदेडमध्यें परवाने दिले गेले तेच १९५५–५६ मध्यें ४३९ पर्यंत वाढले आणि १९६०–६१ सालीं त्यांची संख्या ७५१ पर्यंत गेलेली आहे. बहुतांशी जास्तीत जास्त लोकांची प्रवृत्ति आकाशवाणी उपयोगांत आणण्याकडे वाढत आहे.

सहकारांतून विकासाकडे

आमच्या आजच्या राष्ट्रीय विकासाच्या प्रत्येक क्षेत्रांत सहकाराचें अनन्य साधारण महत्त्व आहे, हें वेगळे सांगण्याची आवश्यकता नाहीं. भारताच्या इतर भागाप्रमाणेंच नांदेड जिल्ह्यांत स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सहकारी चळवळीच्या वाटचालीस नव्या जोमानें सुरुवात झाली आहे. ह्या काळांत सहकारी चळवळ सामाजिक जीवनांत अगदीं खोलवर मुरत असल्याचें दृश्य आपणास दिसून येईल. सहकारी चळवळीच्या प्रारंभींच्या काळांत कर्ज वाटपाच्या कार्याला विशेष प्राधान्य देण्यांत येत असे. परंतु आतां कर्जवांटपाबरोबरच सभासद संख्येंत वाढ, शेतकी मदतीच्या रकमेंत वाढ, औद्योगिक संस्था, घरबांधणी संस्था, खरेदी विक्री संघ, वेगवेगळे माल उत्पादन संघ इत्यादि क्षेत्रांत प्रगति होत आहे.

शेतकी सहकारी संस्था

१९५७–५८ सालीं नांदेड जिल्ह्यांत शेतकी सहकारी संस्था ४५२ होत्या व त्यांचे ९७००० सभासद असून त्यांचेजवळ ३२७८७ रुपयांचें भांडवल होतें. त्यामानानें नांदेड जिल्ह्यांत इतर सहकारी संस्था फारशा अस्तित्वांत नव्हत्या. इतर सहकारी संस्थांमध्यें उत्पादक संघ, औद्योगिक संस्था व घरबांधणी संस्था यांची वाढ फार चांगल्या प्रमाणांत होण्यास वाव होता. १९६० सालीं नांदेड जिल्ह्यांत ९७५ शेतकी सहकारी संस्था, ६४ बिगर शेतकी संस्था, २ जमीन तारण बँका व एक जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँक असा व्याप वाढविला असून संपूर्ण जिल्ह्याचे आर्थिक विकासांत सहकारी चळवळीने फार मोठी मदत करून राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ करण्याच्या कार्यांत आपला वाटा उचलला आहे.

खालील तक्त्यांत नांदेड जिल्ह्यांतील सहकारी क्षेत्रांतील संस्था, सभासद व आर्थिक परिस्थिति दाखविली आहे. (१९५७–५८)

सोसायटीचा प्रकार	नांदेड जिल्ह्यांतील संख्या	जुन्या मुंबई राज्याशीं प्रमाण
शेतकी	९७५	१.९४
बिगर शेतकी	६९	०.२९
तारण बँक	१	३.८४
मध्यवर्ती सहकारी बँक	१	१.५८

प्राथमिक शेती कर्जवांटप सोसायट्या भारतांतील सहकारी चळवळीचा पायाच होत. शेती सुधारणा व शेतकी उत्पादन या बाबतींत सहकारी चळवळीने केलेले सहाय्य म्हणजे पतपेढ्या होत. ग्रामीण पत विस्ताराशिवाय शेती हा किफायतशीर धंदा होणार नाहीं आणि शेतकऱ्याचें जीवनमान वाढणार नाहीं हे उघड आहे. म्हणूनच पतपेढ्याच्या कार्याला ग्रामीण अर्थरचनेंत फार महत्व आहे. या दृष्टीनें पाहतां नांदेड जिल्ह्यांतील प्राथमिक शेतकी कर्जवांटप पतपेढ्यांच्या सभासदांची सरासरी संख्या ४९ आहे व त्यांचे भांडवल ७०४७ रु. आहे (सरासरी) हें प्रमाण पूर्वी २९ सभासद व ५९३३ रु. भांडवल असे होते. याबाबतींत जास्त सविस्तररीत्या आपणांस विचार करावयाचा झाल्यास हदगांव तालुक्यांत भांडवल सर्वात जास्त म्हणजे सुमारे १३०५० आणि देगलूर तालुक्यांत सर्वांत कमी म्हणजे ३८९० रु. होते.

प्राथमिक शेती कर्ज वाटप सोसायट्या

गेल्या वर्षापूर्वी नांदेड जिल्ह्यांत १४ सेवा संघ उघडण्यांत आल्याची नोंद आहे. नांदेड जिल्ह्यांत सहकारी संस्थांनीं संपूर्ण लोकवस्तीच्या ३० टक्के लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या फायदा करून दिला आहे.

जिल्ह्यासाठीं नांदेड येथें एक भूतारण बँक आहे. या बँकेतर्फे गरजू शेतकऱ्यांना शेतीच्या विकासासाठीं दीर्घ मुदतीचे कर्ज देण्यांत येते. १९५८–५९ सालीं या बँकेचें भांडवल ५.९८ लक्ष रु. होते. गेल्यावर्षी सभासद संख्या १८०३ वरून २८६६ पर्यंत गेली. ही संपूर्ण रक्कम कर्ज वांटपांत देण्यांत आली. ह्या बँकेचे क्षेत्र जिल्हाभर झाल्यावर आधुनिक बँकिंग तत्वावर ह्या बँकेचे कामकाज सुरूं झाले.

भूतारण बँक

पहिल्या आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या आतांपर्यंतच्या काळांत मध्यवर्ति बँक आपल्या शाखा उघडण्याच्या कार्यांत मग्न होती आणि हे आवश्यकहि होते. कारण जोपर्यंत प्रत्येक तालुक्यांतून व महत्वाच्या व्यापारी गांवातून बँकेच्या शाखा उघडल्या जात नाहीत तोंपर्यंत ग्रामीण भागांतील पैसा डिपॉझिटच्या रूपानें बँकेत येत नाहीं व एवढी मोठी रक्कम न आल्यास त्या प्रमाणांत बँकेचे कार्यक्षेत्र आपोआपच संकुचित होते. आतांपर्यंत नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ७ शाखा उघडण्यांत यशस्वी झाली आहे. सध्यां नांदेड जिल्ह्यांतील खालील ठिकाणी बँकेच्या शाखा उघडल्या असून त्या चालू आहेत.

मध्यवर्ती बँक

गांवाचें नांव	तालुका	शाखा उघडल्याची तारीख
देगलूर	देगलूर	३१-१२-१९५४
किनवट	किनवट	५–७–१९५८
उमरी	भोकर	२९-१०-१९५८
कंधार	कंधार	७–३–१९५९
हदगांव	हदगांव	१७–५–१९५९
बिलोली	बिलोली	९–८–१९५९
मुखेड	मुखेड	८–१–१९६०

सध्यां नांदेड शहरांत खालील पांच बँका आहेत :– १) स्टेट बँक ऑफ इंडिया २) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद ३) सेंट्रल बँक ऑफ इंडिया ४) बँक ऑफ महाराष्ट्र ५) पंजाब नॅशनल बँक.

बँक ऑफ हैद्राबाद

यापैकीं फक्त स्टेट बँक ऑफ हैद्राबादचे एक पे ऑफिस किनवटला आहे. बाकी कोणत्याहि बँकेचे तालुक्याला किंवा इतर महत्वाच्या व्यापारी गांवात ब्रँच ऑफिस नाही. ही एक बाब जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या जिल्हा प्रचाराच्या बाबतींत फार फायदेशीर ठरली आहे. जिल्ह्यांतून, तालुक्यांतून किंवा व्यापारी गांवातून सहकारी बँकेला बिलकुल स्पर्धा नाहीं. गेल्या वर्षी बँकेची सभासदसंख्या वैयक्तिक आणि संस्था मिळून ८०० होती, तीच संख्या ३०–६–६० रोजीं १०५९ झाली आहे. यापैकीं १९२ व्यक्ती व ८६७ सहकारी सोसायट्या आहेत.

औद्योगिक सहकारी संघ

खालील संख्येवरून नांदेड जिल्ह्याच्या या बाबतींत होणाऱ्या प्रगतीची कल्पना येऊं शकेल. नांदेड जिल्ह्यांत ३०–६–५७ रोजीं ह्या क्षेत्रांत काम करणाऱ्या १९ संस्था होत्या. ही संख्या ३०–६–५८ पर्यंत ३२ पर्यंत वाढली व ११–३–५९ ला ६१ झाली. आज निरनिराळ्या क्षेत्रांतील मिळून जवळ जवळ १०० संस्था नांदेडमध्यें आहेत. लवकरच खालील तालुक्यांत त्यांच्या नांवापुढें दिलेल्या गिरण्या व प्रक्रिया सोसायट्या स्थापन होणार आहेत.

तासमा (तालुका हदगांव) येथे सहकारी पद्धतीवर जिनिंग आणि प्रेसिंग फॅक्टरी सुरू करण्यांत येणार आहे.

देगलूर येथे तांदळावर प्रक्रिया करण्याची गिरणी सुरूं करण्यांत येणार आहे.

कोडलवाडी (तालुका बिलोली) येथें तेलाची आणि तांदळाच्या प्रक्रियेची गिरणी सुरूं करण्यांत येणार आहे.

नांदेड, हदगांव व उमरी येथें सहकारी जिनिंग व प्रेसिंग गिरणी चालू करण्यांत येणार आहे.

नांदेड तालुक्यांतील कलंबर येथें सहकारी साखर कारखाना सुरूं करण्यात येणार आहे.

मुखेड येथें सहकारी तत्वावर एक तेल गिरणी सुरूं करण्यांत येणार आहे.

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

जुन्या हैद्राबाद राज्यांत १९२३ सालच्या सहकारी कायद्याने प्रत्येक जिल्ह्यांत एक बँक स्थापण्यांत आली. यादृष्टीनें पाहतां नांदेडची मध्यवर्ती सहकारी बँक ३८ वर्षांपासून कार्य करीत आहे. गेल्या ३७ वर्षांतील या बँकेचे कार्यक्षेत्र पाहिले तर मराठवाडा हा सहकारच्या बाबतींत मागासलेला आहे असे म्हणणे धारिष्ट्याचे होणार आहे. पूर्वीच्या हैद्राबाद राज्यांत सहकारी बँका सहकारी खात्याकडून चालविल्या जात असत व जिल्ह्याचे कलेक्टर हे बँकेचे अध्यक्ष असत व खाते अधिकाऱ्यांचे देखरेखीखाली सर्व व्यवहार चालत असें. नांदेडच्या मध्यवर्ती बँकेव्यतिरिक्त देगलूर या तालुक्याच्या प्रमुख गांवी एक को-ऑपरेटिव्ह बँक होती. ती नांदेड बँकेच्या अंतर्गत नव्हती.

परंतु सरकारच्या प्रत्येक जिल्ह्यास एक बँक या धोरणानुसार देगलूरची बँक नांदेड जिल्हा सहकारी बँकेत १९५४ सालीं समाविष्ट करण्यांत आली.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

१९५८ सालीं सरकारच्या नवीन धोरणानुसार ग्रामीण नेत्यांचे आणि नागरी नेत्यांचे एक बोर्ड स्थापन करण्यांत आले व शेतकऱ्यांची पिळवणूक थांबून त्यांना योग्य दरांत माल मिळावा, म्हणून सरकारनें जिल्ह्यांतील साखरेच्या आणि लोखंडाच्या व्यापाराची प्रमुख एजन्सी म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला अधिकार दिले. परंतु खरेदी विक्री संघाची स्थापना होऊन त्याच्या कार्याला सुरुवात होतांच बँकेनें या विक्रीचे कार्य खरेदी विक्री बोर्डाकडे सुपूर्द करून दिले आहे.

वी ज पु र व ठा

भारताच्या आर्थिक व सामाजिक विकासाला ज्या विविध गोष्टी कारणीभूत होत आहेत त्यांपैकीं विद्युत शक्ती ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. विकासाच्या पहिल्या कांहीं टप्प्यांत विद्युत् केंद्राची वाढ जितक्या मोठ्या प्रमाणावर होईल तितका विकास झपाट्याने होत असतो. नांदेड जिल्हा तरी याला अपवाद कसा असणार ? मराठवाड्यांतील आपले महत्वाचे स्थान टिकविण्यासाठीं, आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठीं नांदेड जिल्हा आर्थिक दृष्ट्या प्रगत होत आहे. त्यामुळेंच विद्युत् शक्तीच्या बाबत समृद्धीकडे नांदेड जिल्ह्याची जी वाटचाल चालू आहे, ती आपले लक्ष वेधून घेते.

नांदेड जिल्ह्यांत सध्यां खालील तीन ठिकाणीं विद्युतशक्ती उपलब्ध आहे:—

(१) नांदेड (२) देगलूर व (३) किनवट. त्याचप्रमाणें कंधार, बिलोली, कोडलवाडी, उमरी व हादगांव इत्यादि ठिकाणी विद्युतकेंद्रें उभारण्याचें कार्य चालू आहे. तसे पाहिले तर धर्माबाद येथे विद्युतनिर्मिती डिझेल जनरेटिंग सेटच्या आधारे चालू असे. परंतु आतां हा सेट निरुपयोगी झाला आहे. सध्यां फक्त नांदेडलाच डिझेल जनरेटिंग सेट आहे.

विद्युतनिर्मिती व वापर

सन १९५१, ५८, ५९ व ६० या वर्षांमध्यें विद्युतनिर्मिती व तिचा वापर खालील-प्रमाणें करण्यांत आला. आंकडे लाख किलोवॅटचे आहेत.

तपशील	१९५१	१९५८	१९५९	१९६०
१) विद्युतनिर्मिती	—	—	—	१३.७४
२) खरेदी	९.६६	१५.२७	१६.२५	४.०८
३) घरगुती वापर	२.९१	२.१४	२.४४	२.९३
४) व्यापारी आणि उद्योगधंद्यासाठीं वापर	.३४	३.३८	३.६०	४.३२
५) औद्योगिक वापर	२.८९	४.४८	४.४१	४.६४
६) सार्वजनिक वापर	.२७	.४२	.६१	.७६
७) इतर उपयोग	२.४५	३.३९	३.४३	३.४७
८) एकूण वापर	८.८६	१३.८१	१४.४९	१६.१२

वरील तक्त्यावरून असे लक्षांत येईल कीं, १९५१, ५८ व ५९ मध्यें बहुतांशी विद्युत्-शक्ति उस्मानशाही मिल्सकडून खरेदी करण्यांत आली. मात्र १९६० पासून १३.७४ लाख किलोवॅट विद्युत्त शक्ति महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळ, नांदेड यांनीं निर्माण केली.

हळूं हळूं विद्युत् शक्तीचा वापर मोठ्या प्रमाणावर होऊं लागला आहे. १९५१ मध्यें ८.८६ लाख किलोवॅट विद्युत् वापर झाला. तर १९६० मध्ये १६.१२ लाख किलोवॅट विद्युत्-शक्तीचा उपयोग करण्यांत आला हे लक्षांत घेण्यासारखे आहे. गेल्या दशकांतील ही वाढती टक्के-वारी नांदेड जिल्ह्यातील औद्योगिक विकासाचाच निर्देशांक होय. मात्र घरगुती उपयोगासाठीं विद्युत्-शक्तीचा जो वापर केला जातो त्यांत फारसा फरक झालेला आढळत नाहीं. कारण २.२१ लाख किलोवॅट पासून १० वर्षांमध्यें केवळ २.९३ लाख किलोवॅटपर्यंतच वाढली.

हे मात्र खरे कीं, विद्युत्शक्तीचा पुरवठा नांदेडमध्ये फारच कमी प्रमाणावर होतो. विद्युत्निर्मितीची नवी केंद्रें उघडली गेली नाहीत अथवा अस्तित्वांत असलेल्या केंद्रांची शक्तीहि वाढलेली नाहीं. त्यामुळें चणचण भासते.

भावी विद्युत् पुरवठा उपकेंद्रें:—यापुढे नांदेड जिल्ह्याची जोडणी अकोला जिल्ह्यांतील पारस येथील विद्युत् पुरवठा केंद्राशी केली जावयाची आहे. पुढें हेच उपकेंद्र खापरखेडा थर्मल स्टेशन नागपूर याला जोडले जावयाचे आहे.

नजिकच्या भविष्य:काळांत विद्युत्शक्तीचा संचार नांदेड जिल्ह्याच्या काना-कोपऱ्यांत होऊं लागेल असा विश्वास वाटतो.

शा स की य व्य व स्था

नांदेड जिल्ह्याचे आठ तालुके आहेत व जिल्ह्याचे मुख्य ठिकाण नांदेड शहर असून ते गोदावरीच्या कांठावर वसलेले आहे. इतर जिल्ह्याप्रमाणेंच कलेक्टर हा जिल्हा शासनाचा मुख्य व विविध खात्यांच्या कार्यांत एकसूत्रीपण आणणारा अधिकारी. नांदेड जिल्ह्याची शासनाच्या सोईसाठीं दोन विभागांत विभागणी करण्यांत आली आहे. ते म्हणजे नांदेड व देगलूर. देगलूर विभागाचे प्रमुख अधिकारी, डेप्युटी कलेक्टर हे आहेत. डेप्युटी कलेक्टरला कायदा व सुव्यवस्था ह्याबाबतींत मदत करण्याकरितां कांहीं अधिकारी देण्यांत आलेले असून तहसीलदार व कलेक्टर ह्यामधील ते दुवा असतात.

नांदेड विभागांत ४ तालुके व देगलूर विभागांत ४ तालुके अशी समान विभागणी करण्यांत आली आहे. नांदेड विभागांत चार तालुके १) नांदेड, (२) हदगांव (३) भोकर व (४) किनवट. देगलूर विभागांत देगलूर, बिलोली, कंधार आणि मुखेड हे तालुके आहेत. ह्यापैकी भोकर आणि मुखेड हे महाल असून नायब हे तहसिलदार येथील प्रमुख अधिकारी आहेत. शासनाच्या सौकर्यासाठीं त्यांना तहसिलदारचे अधिकार देण्यांत आले आहेत.

ह्यानंतरची पायरी म्हणजे तालुका. प्रत्येक तालुका तीन ते चार सर्कलमध्यें विभागला गेला आहे. ह्याला हल्का असेंहि म्हणतात. येथील अधिकारी रेव्हिन्यू इन्स्पेक्टर्स असतात. शासनाच्या व्यवस्थेतील सर्वांत खालचा टप्पा म्हणजे रेव्हेन्यू गांव हा होय. या गांवच्या सीमा सेटलमेंट खात्यातर्फे निश्चित केलेल्या असतात. ह्या गांवातील शासकीय प्रतिनिधि म्हणजे पाटील हा होय. पटवारी हा हिशोब सांभाळतो. सर्वसाधारणपणें ज्या गांवचा महसूल ५०० रुपयापेक्षां जास्त आहे त्या ठिकाणीं दोन पाटील असतात.

स्थानिक स्वराज्य संस्था

लोकशाही राज्य पद्धतींत स्थानिक स्वराज्य संस्था हा एक आवश्यक भाग आहे. कारण लोकशाहींत या संस्थांच्याद्वारेच समाजांतील सर्व थरापर्यंत राजकीय शिक्षण पोहोचविण्याचें कार्य केलें जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांत ग्रामपंचायती, नगरपालिका व जिल्हा लोकल बोर्डाचा समावेश होत असे पण आतां ता. १ मे १९६१ पासून जिल्हा लोकलबोर्ड स्थगित करण्यांत आले असून त्याऐवजी जिल्हा पातळीवर जिल्हा परिषदेची स्थापना करण्यांत आली आहे.

१९५१ मध्यें माजी हैद्राबाद सरकारने ग्रामपंचायतीचा एक कायदा पास केला होता. या कायद्यान्वयें १००० ते ५००० लोकसंख्या असलेल्या गावांत ग्रामपंचायती स्थापन करण्यांत

येणार होत्या. सध्यां नांदेड जिल्ह्यांत १५८ ग्रामपंचायती आहेत. ग्रामपंचायत ही खेडेपातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्था असून तिच्या पदाधिकाऱ्यांची निवड गांवांतील प्रौढ नागरिक मतदान करून करतात. नांदेड जिल्ह्यांतील ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची तीन भागांत विभागणी करतां येईल. नांदेड जिल्ह्यांतील १५८ ग्रामपंचायतीपैकीं दोन पंचायतींचे उत्पन्न ६००० रु. आहे. ४ पंचायतींचे उत्पन्न ३००० रु. पासून ६००० रु. पर्यंत आहे आणि बाकीच्या पंचायतींचे उत्पन्न ३००० रु. च्या आंत आहे. ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाच्या प्रमुख बाबी म्हणजे कर, फी व अनुदान हे होय. याशिवाय जिल्हा लोकल बोर्डाकडून मिळणारी मदतसुद्धां उत्पन्नांतच येते.

पंचायत

नांदेड जिल्ह्यांत सध्यां दहा व नांदेड शहरांत एक नगरपालिका आहे. या सर्व पूर्वींच्या हैद्राबाद राज्यापासून चालत आलेल्या संस्था आहेत. पूर्वींच्या हैद्राबाद राज्यांतील या संस्थांत व इतर भागांतील संस्थांत फार मोठा फरक आहे. तो म्हणजे इतर भागांतील नगरपालिका व पुरपालिकांना शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा इत्यादि बाबतींत जो वांटा उचलावा लागत असे, तो येथील संस्थांना उचलावा लागत नव्हता. कारण ह्या सर्व बाबी म्हणजे राज्य सरकार स्वतःची जबाबदारी समजत असे. नगरपालिका आणि पुरपालिकांच्या उत्पन्नाच्या महत्त्वाच्या बाबी म्हणजे घरपट्टी, नगरपालिकेची मिळकत व इस्टेट, सरकारी अनुदान इत्यादि.

नगरपालिका

नांदेड जिल्ह्यांतील राज्यकारभार विषयक सर्व अर्थ व्यवहार जिल्हा सरकारी ट्रेझरींतून व स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या नांदेड शाखेमार्फत होत असतो. त्याचप्रमाणें प्रत्येक तालुक्यांतून सरकारी अर्थव्यवहार करणें जास्तीत जास्त सोईस्कर व्हावे म्हणून तालुक्याच्या ठिकाणीं सब् ट्रेझरीज आहेत. सरकारला जिल्ह्यांतून मिळणारे उत्पन्न जमा करणे तसेच सर्व सरकारी खर्च भागविणें हे ह्या ट्रेझरीचे काम असते. जिल्ह्यांत एकूण आठ सब् ट्रेझरीज् असून त्यांतील दोन सब् ट्रेझरींत (नांदेड व किनवट) बँकिंग व्यवहार चालतो. बाकीच्या नॉन बँकिंग आहेत. ह्या सर्व सब् ट्रेझरीज् जिल्हा ट्रेझरीच्या नियंत्रणाखाली आहेत.

शासकीय अर्थव्यवहार

जिल्ह्यांतील जनतेची जमीन महसुलाची गाऱ्हाणी, तक्रारी इत्यादिसंबंधीं त्वरित न्याय निवाडा व्हावा म्हणून तालुका पातळीवर न्यायदानाची व्यवस्था करण्यांत आली आहे. या बाबतींत तहसीलदार हे अधिकारी आहेत. न्यायदानाच्या व्यवस्थेंत दोन विभाग केलेले आहेत. जिल्हाधिकारी हे महसूल न्यायालयाचे जिल्ह्याचे प्रमुख न्यायाधीश आहेत. त्याशिवाय दिवाणी व फौजदारी न्यायालयें वेगळी असून तालुका पातळीवर मुन्सफ मॅजिस्ट्रेट किंवा ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट या नांवाने ओळखले जाणारे अधिकारी नेमलेले असतात. जिल्हा न्यायाधीश हे ह्या न्यायालयाचे प्रमुख असतात. त्यांना सेशन्स जज्ज असें संबोधले जाते. ह्या न्यायालयाचे नियंत्रण महाराष्ट्र हायकोर्टाकडे आहे.

न्यायदान व्यवस्था

समाज जीवनांत शांतता व सुव्यवस्था राखणे आणि कायद्याचे पालन करणें हे लोकशाहींतील पोलिसांचे कर्तव्य आहे. घटनेनें दिलेल्या व्यक्तिस्वातंत्र्याची जपणूक कार्यक्षम पोलीस खातेंच योग्य रीतीने करू शकते. नांदेड येथें जिल्हा पोलीस प्रमुखांची कचेरी असून जिल्ह्यांतील पोलीस कार्यावर नियंत्रण ठेवण्याचें आणि त्यास मार्गदर्शन करण्याचें काम त्यांचेमार्फतच केलें जातें. ह्यासाठीं नांदेड जिल्ह्यांत अधिकारी आणि पोलीस मिळून १८४५ लोकांचे दल ग्रामीण भागापर्यंत जाऊन सेवा कार्य करीत आहे. शासनाच्या सोईसाठीं जिल्हा पोलीस यंत्रणेची नांदेड सब् डिव्हिजन आणि देगलूर सब् डिव्हिजन असे दोन विभाग केले असून त्यावर दुय्यम पोलीस प्रमुखाची नेमणूक झालेली आहे.

पोलीस यंत्रणा आणि पोलीस स्टेशन्स

नांदेड जिल्ह्यांत खालील २७ पोलीस स्टेशन्स आहेत.

१) नांदेड, २) हदगांव, ३) हिमायतनगर, ४) तामसा, ५) मनाठा, ६) अर्धापूर, ७) भोकर, ८) मुखेड, ९) किनवट, १०) माहोर, ११) सिंदखेड, १२) इस्लापूर, १३) लिंबगांव, १४) नांदेड (आऊट), १५) देगलूर, १६) मरखेड, १७) मुक्माबाद. १८) बिलोली १९) कुतुर, २०) धर्माबाद, २१) उमरी, २२) कंधार, २३) मुदखेड, २४) मालाकोळी, २५) उस्माननगर, २६) नायगांव, २७) सोनखेड.

याशिवाय ग्रामीण भागांत जनतेच्या संरक्षणाकडे लक्ष देण्यासाठीं जिल्ह्यांत खेड्यांचे गट करून त्यांत मध्यवर्ती ठिकाणीं ८ आऊट पोलीस स्टेशन्स ठेवण्यांत आलीं आहेत. त्यांत प्रमुख अधिकारी हेड कॉन्स्टेबल्स असून मदतनीस पोलीस असतात. ती आऊट पोस्टस् पुढील गांवांतून ठेवण्यांत आलेली आहेत.

१) निबधा, २) किणी, ३) आप्पाराव पेठ, ४) करडखेड, ५) येवती, ६) कोंडलवाडी, ७) पेठवडन, ८) लोहा.

जिल्ह्याच्या विकासाच्या योजना

नांदेडच्या जिल्हा विकास मंडळाची स्थापना फेब्रुवारी १९५७ मध्यें झाली व तें १ मे १९६२ पासून बरखास्त झालें. त्यापूर्वी स्थानिक विकासाची कामें जिल्हा बोर्डामार्फत होत असत. जिल्ह्यांतील विविध क्षेत्रांतील आणि भागांतील जनतेचे प्रतिनिधी आणि सरकारी अधिकारी सभासद असलेले जिल्हा पातळीवर एक विकास मंडळ व तालुका पातळीवर तालुका विकास मंडळें स्थापन करण्यांत आली होती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशाच्या नवनिर्मितीच्या योजना तयार होऊं लागल्या. शेतीचा व्यवसाय करून बहुसंख्येने ग्रामीण भागांत राहणाऱ्या लोकांचे जीवितमान सुधारावे या हेतूने देशाच्या कानाकोपऱ्यांतून विकासाची कामें चालू आहेत. जनतेच्या प्रचंड सुप्त शक्तीला योग्य वळण देऊन त्याकडून विधायक राष्ट्रोन्नतीचें कार्य करून घेण्याची अवघड जबाबदारी आतां जिल्ह्यांतील जिल्हा परिषद, समाज विकास गट, आणि इतर सामाजिक संस्थांवर आहे.

जिल्हा विकास मंडळ स्थापन झाल्यापासून तें बरखास्त होईपर्यंत स्थानिक विकासाची १११ कामें हातीं घेण्यांत आलीं होतीं. त्यापैकीं खालील ६१ कामें जवळ जवळ पूर्ण झालीं आहेत.

शाळा	३७
विहिरी	१४
गटारें	६
रस्ते	२
बालक मंदिरे	१
करमणूक केंद्रें	१
	६१

याशिवाय मन्याड धरणाचें काम चालू होऊन २१ लक्ष ४० हजार रुपये आतांपर्यंत खर्च करण्यांत आले आहेत.

हदगांव, देगलूर, बिलोली, मुखेड ह्या तालुक्यांतून बी बियाणांचे फार्म स्थापन करण्यांत आले आहेत.

हदगांव तालुक्यांतील केदारनाथ ह्या महत्वाच्या बंधाऱ्याचें काम चालू होऊन ४ लक्ष ६१ रु. आतांपर्यंत खर्च करण्यांत आले आहेत.

नायगांव आणि कंधार येथें गुरांच्या दवाखान्याचें बांधकाम हातीं घेण्यांत आलें आहे.

देगलूर तालुका की–व्हिलेज योजना ४० गांवांत चालू झाली व कृत्रिम पशुगर्भ धारणेचें केंद्र स्थापन करण्यांत आलें.

मुखेड तालुक्यांत जंगल वाढविण्याचें कार्य हातीं घेण्यांत आलें आहे.

सहकारी चळवळीचे कार्य जोमांत चालू असून कर्ज रुपानें मदत म्हणून एकुण २ कोटी ५० लक्ष रुपयांचे वाटप करण्यांत आले.

१६ रस्त्यांचे कामावर आतांपर्यंत ३० लक्ष ८१ हजार रुपये खर्च झाला आहे.

इमारतींची बांधकामें व विहिरी

नांदेड येथील खालील इमारतींची कामें जवळजवळ पूर्ण करण्यांत आली आहेत. औद्योगिक तांत्रिक शाळेची इमारत, प्राथमिक मूलोद्योग शिक्षण केंद्राचे वसतिगृह, २ रहदारी बंगले, विद्युतशक्ती गृह व पोलिस क्वार्टर्स नायगांव आणि नांदेड येथें समाज कल्याण खात्यातर्फें मागासलेल्या जमातींसाठीं बांधण्यांत आलेलीं ५० घरें. तसेंच बुधवार पेठ (ता. किनवट) येथें ६० घरें गौंड जमातीसाठीं बांधण्यांत आलीं. या खेरीज नांदेड येथें शिवाजीनगर हाऊसिंग सोसायटीतर्फे घरें बांधण्यांत आली व फुले हाउसिंग सोसायटीतर्फें घरें बांधणीचें काम चालू आहे.

तलाठी आणि ग्रामपंचायत सेक्रेटरी शिक्षण केंद्रें स्थापण्यांत आली असून १०० इसमांचें शिक्षण पूर्ण झालें आहे व दुसऱ्या तुकडींत १०० इसम शिक्षण घेत आहेत.

अल्पबचत योजनेचा १९ लाखांचा इष्टांक पूर्ण करण्यांत आला.

विहीर योजनेमार्फत ९३,०२५ रु. नवीन विहिरींसाठीं व रु. ११९७५० जुन्या विहिरींसाठीं वाटण्यांत आले.

नांदेड जिल्ह्यांत खालीलप्रमाणें विकास गट चालू आहेत.

गटाचे नांव	गट संख्या	गट सुरू झाल्याची तारीख
(१) नांदेड प्रथम श्रेणी	३–४	२·१०-१९५७
(२) हदगांव प्रथम श्रेणी	दीड	२-१०-१९५७
(३) देगलूर प्रथम श्रेणी	१	१–४–१९५८
(४) भोकर प्रथम श्रेणी	१	१–४–१९५६
(५) नांदेड द्वितीय श्रेणी विकास गट	१	१–४–१९५६

वरील गटांना खर्चाच्या प्रगतीनुसार श्रेणी देण्यांत आल्या आहेत.

ह्यांतील तीन विकास गट किनवट, देगलूर आणि नांदेड यांना ‘ अ ’ श्रेणी मिळाली असून भोकर आणि हदगांव विकास गटांना ‘ ब ’ श्रेणी मिळाली आहे.

विकास गटांतर्फें चालू असलेलीं कामें

प्रत्येक विकास गटामार्फत बी-बियाणें, खतें, किटक नाशक द्रव्यें, इत्यादीचें वांटप करण्यांत येते.

देगलूर, बिलोली, भोकर, किनवट येथील ८००० एकर जमिनींत भात शेतीची योजना लागूं करण्यांत आली आहे. तसेंच खरीप व रबीच्या पिकाची योजना सर्व विकास गटांना लागू करण्यांत आली आहे.

संपूर्ण जिल्हाभर मिळून १०,००० खतांचे खड्डे खोदण्यांत आले आहेत.

जलसिंचनाच्या योजनाखालीं नवीन ६३३ विहिरींसाठीं कर्ज देण्यांत आले असून ह्यांव्यतिरिक्त १५० जुन्या विहिरींच्या दुरुस्तीसाठीं कर्जें मंजूर करण्यांत आलीं आहेत. ४०३ ऑईल इंजिने तगाईच्या रूपांत वाटण्यांत आली आहेत. त्यायोगे ५००० एकर जमीन जलसिंचनाखाली येईल.

कुक्कुट संवर्धन केंन्द्रें एकूण २६ ठिकाणी चालूं असून १६ ठिकाणीं सुधारलेले बैल देण्यांत आले आहेत. प्रत्येक विकास गटांत स्टॉकमेन मार्फत जनावरांना औषधोपचार आणि इतर इलाज करण्यांत येतात. त्यांचेमार्फत भाकड जनावरे खच्ची करण्याचें कार्य चालू आहे.

आरोग्यः—सर्व विकास गटांतून १२५८ खोब खड्डे खोदण्यांत आलेले आहेत. ४० गांवातून गटारींची कामें पूर्ण करण्यांत आलेली आहेत. पाणी पिण्याच्या विहिरींचे बांधकाम चालू असून निम्म्या विहिरी पूर्ण झाल्या आहेत. बाकीच्या विहिरींची कामें चालूंच आहेत. याशिवाय ४० जुन्या विहीरीचें दुरुस्तीचें काम सुरू करण्यांत आले आहे.

पिण्याच्या पाण्याची सोयः—याखेरीज ज़िल्हा विकास मंडळ, जिल्हा लोकल बोर्ड व विहिरी खोदकाम खातें यांचेमार्फत १०८ पिण्याच्या पाण्याच्या विहिरींचीं कामें चालूं करण्यांत आली असून त्यापैकीं ४४ विहिरीचें कामें पूर्ण झाली आहेत. ह्याशिवाय ९ पिण्याच्या पाण्याच्या विहीरी ज्या भागांत पिण्याच्या पाण्यांची फार गैरसोय होती तेथें बांधण्यांत आल्या आहेत.

शिक्षणः—एकूण ९९ शाळांचीं कामे चालूं असून त्यापैकीं अर्ध्यापेक्षां जास्त शाळांच्या इमारती पूर्ण करण्यांत आल्या आहेत.

समाज कल्याण

नांदेड जिल्ह्यांत समाज शिक्षणाच्या सोईसाठीं ११ समाज मंदिरें बांधण्यांत आली आहेत. त्याचा फायदा ग्रामीण जनतेस होत आहे. ६३ भजनी मंडळे स्थापण्यांत आली असून वाचनालयाची सोय ४७ गांवातून करण्यांत आली आहे. प्रौढ साक्षरता वर्ग जिल्ह्यांत सर्वत्र पसरलेले असून आतांपर्यंत ७००० प्रौढांना साक्षर करण्यांत आले. युवक मंडळे व शेतकरी संघाचें नांदेड जिल्ह्यांत जाळे पसरण्यांत आलें आहे. सध्यां १०० युवक मंडळे व सुमारे २५० शेतकरी संघ जिल्ह्यांतील खेड्याखेड्यांतून सामाजिक उन्नतीकरितां सामुदायिक रीत्या प्रयत्न करीत आहेत. या कार्याला पूरक अशी ग्राम सहाय्यक शिबिरें वेगवेगळ्या ठिकाणीं भरविली जातात, व त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांना शेती, पशुसंवर्धन, जलसिंचन, आरोग्य या विषयावर माहिती करून देण्यांत येते.

दळणवळणः—आधुनिक काळाच्या गरजा लक्षांत घेतां प्रत्येक गांव रस्त्यानें तालुक्याला जोडले गेले पाहिजे व प्रत्येक तालुका जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणाला सडकेने जोडला जाणें अतिशय आवश्यक आहे. ह्या दृष्टीने संपूर्ण जिल्ह्यांत ११ रस्त्यांची कामें सुरूं करण्यांत आली. त्यापैकीं महत्त्वाचा असा नांदेड ते मुखेड मार्ग एस. टी. सर्व्हिससाठीं नुकताच खुला करण्यांत आला. त्यामुळें इकडच्या भागांतील लोकांची एक मोठी गरज पूर्ण झाली आहे.

ग्रामीण उद्योगधंदेः—विकास गटांत खाली नमूद केलेली शिक्षण केन्द्रे चालू आहेत.

(१) सुतार व लोहार काम, (२) कातडी काम, (३) शिवण काम, (४) अंबर चरखा, (५) कातडी कमाविण्याचें शिक्षण केन्द्र, (६) हातमाग केन्द्र.

वरील केन्द्रांत प्रत्येक गटांतून १५–१५ विद्यार्थी व महिला शिक्षण घेत आहेत. शिवण कामाचे वर्गात व अंबर चरखा वर्गात फक्त महिलांना प्रवेश दिला जातो.

सहकारः—सहकारी कार्यात गटातील सर्व गांवे समाविष्ट करण्यांत आली आहेत. व सहकारी तत्वांवर खालील संस्था कार्य करून जनतेची सोय करीत आहेत.

१) औद्योगिक सहकारी संस्था	३४
२) शेती सहकारी संस्था	२२१
३) सेवा सहकारी संस्था	६३
४) मार्केटिंग सहकारी संस्था	४१
५) विविधोद्देशी संस्था	८३
६) दुग्ध सहकारी संस्था	१
७) फर्निचर उत्पादक संस्था	१

अशा रीतीनें विविध प्रकारच्या ४४४ सहकारी संस्था आज नांदेड जिल्ह्याचे काना–कोपऱ्यापर्यंत पसरलेल्या असून आपापल्या परीनें देशोन्नतीच्या कार्याला हातभार लावीत आहेत.

जिल्हा परिषद

दिनांक १ मे, १९६२ पासून महाराष्ट्रांत लोकशाही विकेंद्रीकरण कायदा अमलांत आला असून त्यानुसार जिल्हा परिषदांच्या निवडणूका झाल्या आहेत. ही घटना महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनांत मोठे परिवर्तन घडवून आणणारी आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागांतील आजचें जीवन आणि १५ वर्षांपूर्वीचें जीवन यांत बराच मोठा फरक पडला आहे. सर्व-सामान्य शेतकरी आतां विकास कार्याविषयीं जागरूक होत असल्यामुळें परिणामतः राजकीय दृष्ट्याहि तो जागृत होत चालला आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांची आणि कामकऱ्यांची अस्मिता जागृत झाली आहे. आणि म्हणूनच या जागृत नवीन पिढीच्या आकांक्षा पूर्ण करणारा लोकशाही विकेंद्रीकरणाचा हा धाडसी प्रयोग करण्यांत येत आहे.

लोकशाही विकेंद्रीकरणाची नवी योजना, हें योग्य दिशेनें धैर्यानें टाकलेलें पाऊल असून जिल्हा हा या योजनेचा मूलभूत घटक होय. बलवंतराय मेहता समितीनें सुचविल्याप्रमाणें तालुका हें मूलभूत विकास क्षेत्र न स्वीकारण्यास कांहीं कारणें आहेत. पहिलें कारण असें कीं लोकल बोर्डस्, स्कूल बोर्डस्, विकास मंडळें इत्यादि स्थानिक स्वरूपाच्या संस्था आजवर जिल्हापातळीवरच काम करीत आल्या आहेत, तेव्हां या नवीन योजनेचा सांगाडा उभारण्यासाठीं, या परंपरेचा भक्कम आधार घेणें हितावह आणि सोयीचें ठरणार आहे. जनतेला संस्थांचा विचार जिल्हा पातळीवरून करण्याची संवय जडली आहे. तिचाच उपयोग करणें इष्ट होईल. दुसरें असें कीं, 'जिल्हा' हाच घटक मानला तर स्थानिक नेतृत्वाच्या वाढीस पुरेसा वाव मिळेल. तिसरे म्हणजे योजनाबद्ध कार्यक्रम अंमलांत आणण्याच्या मार्गांत, लहान घटकामुळें अनेक अडचणी उपस्थित होण्याची शक्यता असते. शिवाय साधनसामुग्री, निरनिराळ्या कार्यांतील एकसूत्रीपणा, कर्मचारी आणि कामगार इत्यादि बाबतींत जिल्हा हेंच अत्यंत सोईस्कर क्षेत्र आहे.

बलवंतराय समितीच्या अहवालांत अप्रत्यक्ष निवडणुकीची कल्पना मांडण्यांत आली असली तरी आपल्या राज्यांत जिल्हा परिषदा प्रत्यक्ष मतदानानें निवडल्या गेल्या आहेत. कारण अप्रत्यक्ष निवडणुकांबाबत लोकांना पुरेसा उत्साह वाटत नाहीं. त्यामुळें एकदा ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या कीं लोकांचा मग जिल्हा परिषदांशीं तसा प्रत्यक्ष संबंध उरणार नाहीं. तेव्हां ज्या पातळीवरील संघटनेच्या हातीं खरीं सत्ता असेल, त्या संघटनेच्या निवडणुका प्रत्यक्ष मतदानानेंच व्हावयास पाहिजेत.

मात्र विकास गटाचा अध्यक्ष, जिल्हा सरकारी संघटनेचा प्रमुख व इतर अशाच प्रकारच्या संघटनांचे प्रमुख जिल्हा परिषदांचे सभासद राहणार असले तरी त्यांच्या निवडीकरितां प्रत्यक्ष निवडणुका लढविण्याची गरज नाहीं. त्यांची निवड अप्रत्यक्षपणें होईल.

जिल्हाधिकाऱ्यांचें कार्यक्षेत्र परिषद कार्यापासून अलग ठेवण्यांत आलेले आहे. जिल्हाधिकाऱ्यांचा परिषदेशीं संबंध येतो तो केवळ परिषदेचे नोकर निवडण्यासाठीं असलेल्या समितीचे सदस्य या नात्यानें. पण यामुळें जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाचे महत्व संपुष्टांत येईल असें मानण्याचें कारण नाहीं. कारण जिल्हाधिकाऱ्याला अन्य अनेक प्रकारचीं कामें जबाबदारीनें पार पाडावयाचीं असून त्या दृष्टीनें त्याला भरीव अधिकारहि देण्यांत आलेले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकाराचें व कार्यक्षेत्राचें स्वरूप स्थूलमानानें पुढील राहील.

राज्यसरकारच्या आदेशानुसार जिल्हाधिकाऱ्याला जिल्हा परिषदेच्या कामकाजासंबंधी कोणतीहि माहिती अगर आकडेवारी मागविण्याचा अधिकार आहे.

जिल्हा परिषद अगर पंचायत समिती यांच्या ठरावाच्या अंमल बजावणीनें अगर अन्य कोणत्याहि आदेशामुळें शांतता भंग होईल, अगर जनतेस त्यामुळें त्रास होईल असें जिल्हाधिकाऱ्याचें मत असले तर आपल्या लेखी आदेशानें अशी अंमलबजावणी स्थगित करण्याचा त्याला अधिकार आहे. मात्र या आदेशाची प्रत संबंधित परिषद व कमिशनर यांच्याकडे पाठविली पाहिजे. कमिशनरना सदर आदेशांत जरूर तो फेरफार करण्याचा अधिकार आहे.

निकडीच्या प्रसंगी सार्वजनिक आरोग्य व सुरक्षितता याबाबतींत कांहीं विशेष असाधारण काम पार पाडणें असल्यास ती बाब परिषदेच्या कक्षेंतील असली तरी जिल्हाधिकाऱ्याला त्या संबंधी जरूर ती व्यवस्था करण्याचा अधिकार आहे व यासाठीं होणारा खर्च अगर द्यावयाचा मेहनताना परिषदेनें देण्याची सूचना करण्याचा जिल्हाधिकाऱ्याला अधिकार आहे.

जिल्हापरिषदेच्या कार्याकरितां घ्यावयाच्या नोकरांची निवड करण्यासाठीं या कायद्यान्वयें अस्तित्वांत येणाऱ्या समितीवर जिल्हाधिकारी हे पदसिद्ध सभासद आहेत.

जिल्ह्यांतील कायदा व सुव्यवस्था पालनाची जबाबदारी सर्वस्वी जिल्हाधिकाऱ्याची आहे.

लोकशाही विकेंद्रीकरण कायदा अंमलांत आल्यापासून म्हणजेच १ मे १९६२ पासून आपल्या राज्यांतील प्रत्येक जिल्ह्यांत जिल्हा परिषदेची स्थापना करण्यांत आली आहे. या परिषदेवरील प्रतिनिधी जनतेनें निवडून द्यावयाचें असून जास्तीत जास्त ३५,००० लोकसंख्येला एक या प्रमाणांत हे प्रतिनिधी निवडले जातील. या परिषदेंत प्रतिनिधींची संख्या जास्तींत जास्त साठ आणि कमीत कमी चाळीस राहील. त्यांत एक स्त्री प्रतिनिधी (सभासद), अनुसूचित जाति आणि संयुक्त सहकारी संस्थेचे अध्यक्ष हे सहयोगी सभासद म्हणून या परिषदेंत राहतील.

ही परिषद जिल्ह्यांतील विकास कार्याबाबत पूर्ण जबाबदार राहणार आहे. आणि म्हणून परिषदेच्या स्थायी समिती, अर्थ समिती, बांधकाम समिती, कृषि समिती, सहकार समिती, शिक्षण समिती आणि आरोग्य समिती अशा अनेक समित्या असतील. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हे स्थायी समितीचे पदसिद्ध अध्यक्ष राहतील.

जिल्हा परिषदेसाठीं एक मुख्य कार्यकारी अधिकारी आणि दुसरा उपमुख्य अधिकारी यांची नियुक्ती राज्य शासनाकडून करण्यांत आली आहे.

जिल्ह्यांतील प्रत्येक गटासाठीं पंचायत समिती राहणार ती असून लोकांनीं निवडून द्यायची आहे. या समितीवर निवडून आलेले सभासद, एक स्वीकृत सभासद, शेतकी सहकारी संस्थेचे अध्यक्ष,

गटांतील स्त्रिया, अनुसूचित जाति आणि जमाति यांचे प्रतिनिधी समितींत निवडून आलेले नसल्यास प्रत्येकीं एक आणि पंचायतीच्या सभासदांनीं निवडून दिलेले दोन सरपंच इतके सदस्य असतील.

पंचायत समितीसाठीं एका गटविकास अधिकाऱ्याची नेमणूक झाली आहे. गटविकास अधिकारी हा पंचायत समितीचा पदसिद्ध चिटणीस असेल. पंचायत समितीचे सभापति आणि उप-सभापति सभासदांनीं निवडून द्यायचे आहेत.

जिल्हा परिषदेवर कोणत्याहि विकास कार्यांची अंमलबजावणी अगर देखभाल करण्याची जबाबदारी सोपविण्यांत येईल आणि जिल्हा परिषद शासनाची याबाबतींत प्रतिनिधि म्हणून काम पाहील. जिल्हा परिषद शक्यतो सर्व कामें पंचायत समित्याद्वारें पार पाडील. कांहीं ठराविक कामें पंचायत समित्यामार्फतच पार पाडलीं जातील. जिल्हा परिषदेकडे पुढील कामें सोपविण्यांत आलीं आहेत.

शेतकी शाळा स्थापन करणें, त्यांची व्यवस्था ठेवणें, त्या सुस्थितींत राखणें आणि त्यांना अनुदाने देणें (सहाय्यित शेतकी शाळांना अनुदान देण्याची बाब समाविष्ट करून) परंतु त्यांत पुढील गोष्टींचा समावेश होणार नाहीं (१) अभ्यासक्रम ठरवून देणें.
(२) पाठ्य पुस्तकें विहित करणें, (३) शेतकी शाळांची तपासणी, **शेतकी**
आणि; (४) वार्षिक परीक्षा घेणें. पीक स्पर्धा, पीक संरक्षण, पीक
मोहिमा (खरीप आणि रब्बी पिकांच्या मोहिमा आणि भातशेतीची लागवड धरून), मिश्र खतें व स्थानिक खतें, रासायनिक खतें शेतीचीं अवजारें आणि शेतीसाठीं लागणारे लोखंड, पोलाद आणि सीमेंट यांचें वांटप, सुधारलेल्या शेतीपद्धतींचें प्रात्यक्षिक, दुय्यम बीज केंद्राचें आदर्श प्रात्यक्षिक, सुधारलेल्या बियाणांची आयात व वांटप, गुदामें बांधणें आणि त्यांची व्यवस्था ठेवणें, शेतीची प्रगति व सुधारणा, घातक वनस्पतींचा नाश करणें, अन्यस्थानीय झाडें लावून तीं आपल्या प्रदेशांत वाढविणें.

पशुसंवर्धन—पशुवैद्यकीय सहाय्य. (जिल्ह्यांतील गुरांचीं रुग्णालयें वगळून परंतु गुरांचे दवाखाने, पशुवैद्यकीय सहाय्य केंद्रें आणि खेडयांतील पशुवैद्यकीय पेट्या समाविष्ट करून.)

गुरांच्या, घोडयांच्या आणि इतर पशुधनाच्या पैदाशीची सुधारणा. (यांत कृत्रिम रेतन उपकेंद्रें, प्रमुख ग्राम केंद्रें, वळू बैलांचीं प्रमुख केंद्रें, वैरण सुधारण्याच्या जागा, वैरण मुरावयाचे खड्डे, तालुका आणि जिल्हा पशुधन सुधारणा संघ व इतर तत्सम संस्था स्थापणें आणि मेंढ्यांच्या सुधारलेल्या पैदाशीचें वांटप यांचा समावेश होतो. सुधारलेल्या कोंबडया पुरविणें, गुरांचीं प्रदर्शनें व मेळावे भरविणें.

जंगलें—गांवजंगलें व कुरणें (यांत कुरणाच्या व जळाऊ लांकडाच्या गांवजंगलांचा विकास करावयाच्या उपाययोजनांचा समावेश होतो.)

समाज कल्याण—मागासलेल्या वर्गांचा शैक्षणिक विकास–यांत पुढील बाबींसंबंधीच्या उपाययोजनांचा समावेश होतो.

मागासलेल्या वर्गांच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, नादाऱ्या व परीक्षेची फी देणें, आणि

मागासलेल्या वर्गांच्या विद्यार्थ्यांकरितां वसतिगृहें आणि शाळा स्थापन करणें आणि त्यांची व्यवस्था ठेवणें. यांत वसतिगृहांचें बांधकाम आणि त्यांची व्यवस्था करणें यासाठीं सहाय्यित वसतिगृहांस अनुदानें देण्याचा आणि अशा वसतिगृहांस आणि शाळांस इतर सहाय्य देण्याचा समावेश होतो. परंतु ज्यांचें क्षेत्र जिल्ह्यापेक्षां मोठें आहे अशीं वसतिगृहें यांतून वगळण्यांत येतील.

मागासलेल्या वर्गांचा आर्थिक विकास. यांत पुढील बाबींचा समावेश होतो:—

शेतीची साधनसामग्री खरेदी करण्यासाठीं व्यक्तिशः शेतकऱ्यांस कर्जाच्या व अर्थ-सहाय्याच्या स्वरूपांत आर्थिक सहाय्य देणें;

कुटीरोद्योग आणि उद्योगधंदे यासाठीं व्यक्तिशः कारागिरांस कर्जाच्या व अर्थसहाय्याच्या स्वरूपांत आर्थिक सहाय्य देणें;

विमुक्त जातींना चरखे पुरविणें; मागासलेल्या क्षेत्रांत दळणवळणाचा विकास करणें;

सहकारी स्टोअर्सची व्यवस्था ठेवणें आणि कर्मचाऱ्यांच्या व्यवस्थेसाठीं बहुउद्देशीय सहकारी संस्थांस अर्थसहाय्य देणें (ज्यांचें खेळतें भांडवल, प्रत्येकीं पांच लाख रुपयांहून अधिक नाहीं आणि ज्यांचें अधिकारक्षेत्र जिल्ह्यापेक्षां कमी आहे अशा सहकारी संस्थांशी संबंध येत असेल तेथवर);

हस्तव्यवसायाच्या केंद्रांची स्थापना करणें; आणि गुरांच्या पैदाशीच्या आणि कोंबड्यांच्या पैदास केंद्राचा विकास करणें.

अस्पृश्यतेचें निवारण : यांत पुढील गोष्टींचा समावेश होतोः—

हरिजन सप्ताह साजरे करणें; झुणका-भाकर कार्यक्रम; सवर्ण हिंदु आणि हरिजन यांच्यांतील आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देणें; आणि अस्पृश्यता निवारणासाठीं उत्कृष्ट काम करणाऱ्या खेड्यांस बक्षिसें देणें.

मागासलेल्या वर्गाच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम. यांत पुढील गोष्टींचा समावेश होतोः— महिलांच्या आणि बालकांच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम व योजना आंखणें; बालवाड्यांची स्थापना करणें व त्यांची व्यवस्था ठेवणें; मागासलेल्या वर्गाच्या विकासासाठीं प्रचार व प्रसिद्धि करणें; मागासलेल्या वर्गासाठीं करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करणें; सामाजिक मेळावे भरविणें; मागासलेल्या वर्गासाठीं संस्कार केंद्रें, सामूहिक व करमणुकींचीं केंद्रें आणि सामूहिक सभागृहें स्थापन करणें; विमुक्त जातींना कपडे पुरविणें; औषधें खरेदी करण्यासाठीं व्यक्तींना आर्थिक-सहाय्य देणें आणि स्वतः होऊन मदत देऊं केलेल्या संस्थांना, वैद्यकीय मदत देण्यासाठीं, अनुदानें देणें; मागासलेल्या वर्गाच्या इसमांसाठीं घरांची तरतूद करणें; आणि पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची तरतूद करणे;

मागासलेल्या वर्गाचें प्रशिक्षण : यांत पुढील बाबींचा समावेश होतो :—

प्रशिक्षण शिबिरांचें आयोजन करणें; आणि तांत्रिक प्रशिक्षण आणि पारंपारिक व्यवसा-यांच्या सुधारलेल्या पद्धतीचें प्रशिक्षण देणें.

शिक्षण—प्राथमिक शाळांची आणि मूलोद्योग शाळांची स्थापना करणें व त्या सुस्थितीत ठेवणें, त्यांची तपासणी करणें आणि त्यांना भेटी देणें, सहाय्यित शाळांना अनुदानें देणें.

माध्यमिक शाळांची स्थापना करणें, त्या सुस्थितींत ठेवणें, त्यांची तपासणी करणें आणि त्यांना भेटी देणें, परंतु त्यांतून पुढील गोष्टी वगळण्यांत आल्या पाहिजेत.—अभ्यासक्रम ठरविणें; पाठ्य-पुस्तकें ठरविणें; उच्च शाळांचें उच्चतर माध्यमिक शाळांत रूपांतर करण्यासाठीं परवानगी देणें; फीचे दर; मान्यतेच्या सर्वसाधारण शर्ती ठरविणें; प्राथमिक आणि उच्च शाळांच्या शिष्यवृत्त्यांसाठीं परीक्षा घेणें; आणि सहाय्यक-अनुदान-संहितेनुसार, शिक्षण-संचालकांकडे विशेषरीत्या सोंपविण्यांत येतील किंवा राज्य सरकारकरितां राखून ठेवण्यांत येतील असे इतर अधिकार.

खाजगी माध्यमिक शाळांच्या बाबतींत, अनुदाने व कर्जे याबाबत केवळ शिफारस करणें आणि शिक्षण संचालकांची मंजुरी मिळाल्यानंतर त्यांचें वांटप करणें. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या संबंधांत विद्यार्थ्यांस कर्जे आणि शिष्यवृत्त्या देणें. माध्यमिक शाळांच्या इमारती बांधणें आणि त्या सुस्थितींत ठेवणें. शाळांसाठीं साधनसामग्री व क्रीडांगणें यांची तरतूद करणें.

वैद्यकीय—तालुका दवाखान्यांत आणि तालुका दवाखान्यांच्या दर्जांत वाढ करणें. सिव्हिल आणि कॉटेज रुग्णालयें, त्याचप्रमाणें सिव्हिल रुग्णालयाप्रमाणें असलेलीं इतर मोठीं सरकारी रुग्णालयें वगळून इतर रुग्णालयें. वैद्यक व्यवसायींची अर्थ–सहाय्यित केंद्रें. ग्रामीण वैद्यकीय मदत केंद्रें आणि सार्वजनिक वैद्यकीय मदत. पिसाळलेली कुत्रीं चावल्यानंतर, निर्धन इसमांच्या बाबतींत प्रतिबंधक असा इलाज करणाऱ्या संस्थांना आर्थिक–सहाय्य देणें. खाजगी धर्मार्थ रुग्णालयें, औषधालये, प्रसूतिगृहें आणि तत्सम इतर संस्था.

आयुर्वेद–आयुर्वेदिक व युनानी दवाखाने (यांत अशा दवाखान्यांना अनुदानें देण्याचा समावेश होतो.) खेड्यांतील आयुर्वेदिक औषधांच्या पेट्यांतील औषधांचा सांठा पुन्हां भरून काढणें.

सार्वजनिक आरोग्यः—प्राथमिक आरोग्य केंद्रें. फिरती आरोग्य पथकें. वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्याची संयुक्त पथकें. देवीप्रतिबंधक लस टोचणें. शालेय आरोग्य सेवा. ‘ याज ’ रोगाविरुद्ध उपचारासाठीं उपाययोजना. प्रसूति व शिशुकल्याण केंद्रें. खेड्यांत औषधी पेट्या ठेवणें. आरोग्य शिक्षणाच्या सोयी. ग्रामीण साफसफाई. सार्वजनिक आरोग्य रक्षणासाठीं आवश्यक ती उपाययोजना करणें. गलिच्छ वस्त्यांचें पुनर्वसन (या कारणांसाठीं खाजगी व्यक्तीस किंवा संस्थांस कर्जें देण्याच्या कामाचाही यांत समावेश होतो.)

इमारती व दळणवळणः—ग्रामीण रस्ते; इतर जिल्हा रस्ते; प्रमुख जिल्हा रस्ते; आणि वरील रस्त्यांवरील पूल; यांचें बांधकाम करणें व ते सुस्थितींत राखणें व त्यांचीं दुरुस्ती करणें. ग्रामीण उद्यानें आणि बगीचे (राष्ट्रीय उद्यानें आणि बगीचे वगळून.) जिल्हा परिषदेच्या गरजांच्या संबंधांतील प्रशासनविषयक आणि इतर इमारतींचें बांधकाम. रस्त्याव्यतिरिक्त दळणवळणाचीं इतर साधनें. सार्वजनिक नावा. रस्त्याच्या कडेला झाडें लावणें. छोटे लोहमार्ग व ट्रामचे मार्ग. टेलिफोन लाईन्स.

सार्वजनिक आरोग्यविषयक इंजीनियरिंगचीं कामें:—ग्रामीण पाणीपुरवठा ग्रामीण विभागांतील जत्रासाठीं सुरक्षित पाणी पुरवठा. ग्रामीण गटारें. पिण्यासाठीं, स्नानासाठीं किंवा स्वयंपाकासाठीं लागणारें पाणी दूषित होऊं नये म्हणून त्यांचें संरक्षण करण्यासाठीं बांधकाम (प्रत्येक बाबतींत पांच लाख रुपयांहून अधिक भांडवली खर्चाच्या योजना वगळून)

पाटबंधारे—छोटी पाटबंधाऱ्यांचीं कामें [प्रत्येकीं २५० एकर किंवा त्याहून कमी एकर (जमीन) भिजविणारी जलसिंचनाचीं कामें.]

उद्योगधंदे व कुटीरउद्योग—स्थानिक उद्योगधंदे व स्थानिक कला–(कुटीरोद्योग व लहान प्रमाणावरील उद्योगधंदे यांचे बाबतींत दहा हजार रुपयांपर्यंतचीं कर्जें मंजूर करण्याच्या मर्यादे-पर्यंत.), जिल्ह्यापेक्षां मोठ्या असलेल्या क्षेत्रासाठीं असलेल्या संशोधन संस्था आणि संस्था वगळून प्रशिक्षण संस्था आणि शाळा, प्रशिक्षण–उत्पादन केंद्रें आणि उत्पादन केंद्रें, विक्री भांडारें व विक्रीचीं दुकानें. वैयक्तिकरीत्या कारागिरांस सहाय्यक अनुदानें व कर्जें देणें, प्रशिक्षण घेणारांस विद्यावेतनें देणें, कुटीर उद्योग आणि ग्रामोद्योग यांची वाढ व विकास, कुटीर उद्योग किंवा ग्रामोद्योग यांतील उत्पा-

दनासाठीं विक्रीच्या सोयी उपलब्ध करून देणें, औद्योगिक संस्थांस सहाय्यक अनुदानें व कर्जें देणें, हातमाग, वजनें व मापें अधिनियम यांच्या अंमलबजावणीशीं संबंधित असलेलें अंमलबजावणीचें काम.

सहकार—सहकारी संस्थांची नोंदणी (ज्या संस्थांचें खेळतें भांडवल पांच लाख रुपयांहून अधिक नसेल आणि ज्यांचें अधिकारक्षेत्र एका जिल्ह्यापेक्षां कमी आहे, केवळ अशाच संस्थांच्या बाबतींत.)

सहकारी संस्थांवरील, प्रशासनाविषयक देखरेख करणें.

सहकारी संस्थांची वाढ आणि व्याप्ति वाढविणें (सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या बाबतींत.), राज्य सरकारकडून आर्थिक-साहाय्य मिळण्यासाठीं सहकारी संस्थांच्या अर्जांचें प्रवर्तन करणें, शेअर भांडवलांत सहभागी होण्याच्या बाबतींत सहकारी संस्थांच्या (सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारकडून निर्दिष्ट करण्यांत येतील अशा) अर्जांचें, संयुक्त संस्थांकडे प्रवर्तन करणें.

प्रकाशन—फिरत्या प्रकाशन गाड्या, जिल्हा प्रदर्शनें आयोजित करणें, करमणुकीच्या कार्यक्रमाद्वारें प्रसिद्धि, ग्रामीण विभागासाठीं नभोवाणीचे कार्यक्रम.

सामूहिक विकास—सामूहिक विकास कार्यक्रम, स्थानिक विकास कामांचा कार्यक्रम.

समाज शिक्षण—सामूहिक मनोरंजन केंद्रें, प्रौढ साक्षरता केंद्रें, क्रीडा, खेळ, क्रीडांगणें, सामग्री, इत्यादि आणि कल्याणकारी संघटना. किसान मेळे. बाहेरील भागांना भेटी देण्याचा कार्यक्रम आंखणें, माहिती वितरण, अल्पमुदतीचीं शिबिरें, महिला संघटना व कल्याण, शिशु संघटना व कल्याण, फिरत्या चित्रपट गाड्या, ग्रंथालय आणि वाचनालयें. जत्रा, देखावे आणि प्रदर्शन, ग्रामीण घरबांधणी.

संकीर्ण—ग्रामोद्धार, आदर्श गांवें वसविणें (त्यासाठींची अनुदानें आणि कर्जें धरून), खेड्यांचें आर्थिक कल्याण, लोकांचें आरोग्य, सुख किंवा सोय यांची ज्यामुळें वाढ होण्याचा संभव आहे अशी स्थानिक स्वरूपाचीं कामें, बाजार, धर्मशाळा, विश्रामगृहें, मुशाफिरखाने, सराई वगैरे, चावड्या, इतर सार्वजनिक संस्था, गांवठाणांची सुधारणा करणें व ती वाढविणें (त्या कारणासाठीं द्यावयाचीं अनुदानें व कर्जें धरून.) नवीन गांवठाणें वसविणें (त्या कारणांसाठीं द्यावयाचीं अनुदानें व कर्जें धरून) जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचें स्वास्थ्य, जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांसाठीं घरांची तरतूद, सार्वजनिक जागांत आणि उद्यानांत झाडें लावणें व त्यांची जोपासना करणें, वन्य जनावरांचा नाश करण्याबाबत बक्षिसें, जाहीर सत्कार, समारंभ आणि मनोरंजन, स्थानिक यात्रांची व्यवस्था करणें, दफन भूमि व दहन भूमि (प्रेतांची विल्हेवाट लावण्याचें काम धरून), ग्राम पंचायतीचे पंच, सरपंच, आणि बिनसरकारी इसम यांची संमेलनें, स्थानिक भटक्या गरीब लोकांना मदत, गरीबांसाठीं घरांची व्यवस्था करणें.

पंचायत समितीच्या अधिकार क्षेत्रांतील कामें

शेतकी—(१) खरीप व रबी पीक मोहिमा, (२) प्रकृष्ट भातशेतीची लागवड, शेतीची प्रगति व सुधारणा, (४) सुधारलेल्या शेतीपद्धतींचें प्रात्याक्षिक व त्याबाबत प्रचार करणें आणि नमुनेदार शेतकीच्या संस्था स्थापन करणें व त्या सुस्थितींत ठेवणें, (५) शेतीविषयक सुधारलेल्या अवजारांचा प्रचार करणें, (६) फळें व भाजीपाला यांच्या उत्पादनांत वाढ करणें, (७) गुदामें बांधणें व त्यांची व्यवस्था ठेवणें, (८) रासायनिक खतें, शेतीचीं अवजारें व शेतीसाठीं लागणारें लोखंड, पोलाद व सिमेंट यांचें वांटप करणें.

पशु संवर्धन— खेड्यांतील पशुवैद्यकीय पेट्या, पशु वैद्यकीय सहाय्य केंद्रें, तालुका पशुधन सुधारणा संघ व तशाच प्रकारच्या संस्था स्थापन करणें, वैरण सुधारण्याच्या जागा, वैरण मुरवावयाचे खड्डे, कोंबड्यांच्या सुधारलेल्या पैदाशीचें वाटप, मेंढ्यांच्या सुधारलेल्या पैदाशीचें वांटप, गुराढोरांचीं प्रदर्शनें व मेळावे भरविणें.

जंगलें—गांव जंगलें व कुरणें. (चांगल्या प्रतीच्या गवताच्या लागवडीचा समावेश करून), कुरण व जळण यांच्या कारणासाठीं गांव शिवारांच्या विकासासाठीं उपाय योजना.

समाज कल्याण—मागासलेल्या वर्गाचा आर्थिक विकास यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो : शेतीची साधनसामग्री खरेदी करण्यासाठीं कर्जें व अर्थसहाय्य यांच्या रूपानें व्यक्तिशः शेतकऱ्यास आर्थिक सहाय्य देणें, कुटीरोद्योग व व्यवसाय यांसाठीं कर्जें व अर्थसहाय्य यांच्या रूपानें व्यक्तिशः कारागिरांना आर्थिक साहाय्य देणें, विमुक्त जातींना चरखे पुरविणें, हस्तव्यवसाय केंद्रांची स्थापना करणें. **अस्पृश्यता निवारणः**—यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो : हरिजन सप्ताह साजरे करणें, सवर्ण हिंदु व हरिजन यांच्यांतील आंतरजातीय विवाहांस प्रोत्साहन देणें. **मागासलेल्या वर्गाच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रमः**—यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो : महिलांच्या व बालकांच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम व योजना, बालवाड्यांची स्थापना करणें व त्यांची व्यवस्था ठेवणें, मागासलेल्या वर्गाच्या विकासासाठीं प्रचार व अशा कार्यक्रमास प्रसिद्धि देणें, मागासलेल्या वर्गासाठीं करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करणें, सामाजिक मेळावे भरविणें, मागासलेल्या वर्गासाठीं संस्कार केंद्रें, सामूहिक व करमणुकीची केंद्रे आणि सामूहिक सभागृहें, विमुक्त जातींना कपडे पुरविणें, औषधें खरेदी करण्यासाठीं व्यक्तींना आर्थिक साहाय्य देणें आणि ज्यांनीं स्वतःहून मदत देऊं केली आहे अशा संस्थांना वैद्यकीय मदत देण्यासाठीं अनुदानें देणें, मागासलेल्या वर्गाच्या इसमांसाठीं घरांची तरतूद करणें, आणि पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची तरतूद करणें.

शिक्षण—प्राथमिक शाळेंच्या इमारती बांधणें व त्या सुस्थितींत ठेवणें. प्राथमिक शाळांसाठीं साहित्य व खेळाचीं मैदानें यांची तरतूद करणें.

वैद्यकीय—वैद्यक व्यवसायींची अर्थ सहाय्यित केंद्रें; ग्रामीण वैद्यकीय मदत केंद्रें;

आयुर्वेद—खेड्यांतील आयुर्वेदिक औषधांच्या पेट्यांतील औषधांचा सांठा पुन्हा भरून काढणें.

सार्वजनिक आरोग्य—प्रसूति व शिशुकल्याण केंद्रें; खेड्यांत औषधी पेट्या ठेवणें; ग्रामीण साफसफाई; सार्वजनिक आरोग्य रक्षणासाठीं आवश्यक ती उपाययोजना करणें.

इमारती व दळणवळण—ग्रामीण रस्ते बांधणें, ते सुस्थितींत ठेवणें व त्यांच्या दुरुस्त्या; ग्रामीण रस्त्यावर पूल व नाले बांधणें; सार्वजनिक (तरी) नावा; रस्त्यांच्या आजूबाजूस झाडें लावणें;

सार्वजनिक आरोग्यविषयक इंजिनीअरिंगचीं कामें— ग्रामीण पाणीपुरवठ्याच्या विहिरी; गावांत जमिनीच्या पृष्ठभागांवर गटारे बांधणें.

कुटीरोद्योग—वैयक्तिकरीत्या कारागिरांस सहाय्यक अनुदानें व कर्जें देणें; कुटीरोद्योग व ग्रामोद्योग यांची वाढ व विकास;

सहकारः—सहकारी चळवळीची वाढ करणें व तिची व्याप्ति वाढविणें;

प्रकाशन:--ग्रामीण नभोवाणी कार्यक्रम; करमणुकीच्या कार्यक्रमाद्वारें प्रसिद्धि;

सामाजिक विकास:--समाज विकास कार्यक्रम, स्थानिक विकास कामांचा कार्यक्रम,

समाज शिक्षण:--समाज मनोरंजन केंद्रें; प्रौढ साक्षरता केंद्रें; क्रीडा, खेळ, क्रीडांगणें, सामग्री आणि कल्याणकारी संघटना; शेतकऱ्यांचे मेळावे; बाहेरील भागांना भेटी देण्याचा कार्यक्रम आंखणें; माहिती वितरण; अल्पमुदतीचीं शिबिरें; महिला संघटना व कल्याण; शिशु संघटना व कल्याण; फिरत्या चित्रपट गाड्या; ग्रंथालयें व वाचनालयें; जत्रा, देखावे व प्रदर्शनें.

संकीर्ण:--ग्रामीण घर बांधणी; ग्रामोद्धार; आदर्श गांवें वसवणें (त्यासाठींचीं अनुदानें व कर्जें धरून) खेड्यांचें आर्थिक कल्याण; लोकांचें आरोग्य, सुरक्षितता,सुख किंवा सोय यांची ज्यामुळें वाढ होण्याचा संभव आहे अशी स्थानिक स्वरूपाचीं कामें; बाजार; धर्मशाळा, विश्रांतिगृहें, मुसा-फिरखाने, सराई वगैरे; चावड्या; इतर सार्वजनिक संस्था; औद्योगिक बेकारी वगळून इतर स्थानिक बेकारी; गांवठाणाची सुधारणा करणें व ती वाढविणें (त्यासाठीं द्यावयाचीं अनुदानें व कर्जें धरून) नवीन गांवठाण बसविणें (त्यासाठीं द्यावयाची अनुदानें व कर्जें धरून); सार्वजनिक जागा व बागा यामध्यें झाडे लावणें व त्यांची जोपासना करणें; रानटी जनावरांचा नाश करण्यांबाबत बक्षिसें, जाहीर सत्कार व समारंभ आणि मनोरंजन. स्थानिक यात्रांबाबत व्यवस्था करणें; ग्रामपंचायतींचें पंच, सरपंच व बिन-सरकारी इसम यांची संमेलनें; स्थानिक भटक्या गरीब लोकांसाठीं मदत; गरीबांसाठीं घरांची व्यवस्था करणें.

सांस्कृतिक संस्था

संपूर्ण मराठवाड्यांत नांदेड जिल्हा सांस्कृतिक संस्था व त्याबद्दल लोकांना वाटणाऱ्या आस्थेबद्दल प्रसिद्ध आहे. ललित कला आणि सांस्कृतिक क्षेत्रांत काम करणाऱ्या अनेक संस्था आज नांदेडमध्ये कार्य करून लोकांच्या कलात्मक विकासास हातभार लावीत असल्याचे आपणास दिसून येतें. ह्यापैकीं कांहीं प्रातिनिधिक संस्था खालीलप्रमाणें आहेत.

दिनांक २१ डिसेंबर १९३७ रोजीं चंपाषष्ठीच्या सुमुहूर्तावर गायनवादन विद्यालय, नांदेड या संस्थेची स्थापना करण्यांत आली. सुरुवातीला विद्यार्थ्यांची संख्या केवळ ४–५ होती परंतु या संस्थेने अत्यंत चिकाटीनें आपलें कार्य केल्यामुळें नांदेडमधील जनतेंतून संगीताचा एक रसिक वर्ग तयार झाला. विद्यालयाला स्थायी स्वरूप **गायनवादन विद्यालय** येण्याच्या दृष्टीने इ. स. २८ मे १९५३ रोजीं सदर विद्यालयाचे रजिस्ट्रेशन करण्यांत आले. ही संस्था अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाशी संलग्न करण्यांत आली. जनतेच्या सहाय्यानें या विद्यालयाने १९५५ सालीं व्यापक प्रमाणांत एक संगीत संमेलन आयोजित केले. भारतीय कीर्तीच्या कलाकारांनी यांत भाग घेऊन संगीत साधनेने रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. शास्त्रीय माहितीच्या सुलभतेसाठीं " उपासना " हे हस्तलिखित मासिक काढण्यांत येते. ह्याशिवाय पं. पलुस्कर आणि पं. भातखंडे या दोन गायकांच्या स्मरणार्थ दरवर्षी २१ ऑगस्ट रोजीं अव्याहत १२ तासांचा संगीताचा कार्यक्रम घेण्यांत येतो. या संस्थेच्या रजिस्ट्रेशननंतर १९५३ सालीं माजी हैद्राबाद सरकारने ५०० रु. वार्षिक अनुदान सुरूं केलें. पुढें ते ६०० रुपयापर्यंत नेण्यांत आले असून महाराष्ट्र सरकारतर्फे अनुदानरुपी मदत चालू आहे.

ह्याशिवाय १९५५ सालीं जनतेच्या पैशातून व इतर अनेक संस्था व व्यक्तींच्या सहकार्यामुळें कलामंदिर या नांवाचे एक भव्य नाटक गृह नांदेड येथें बांधण्यांत आलें आहे. शहरांतून होणारे सर्व नाटकांचे व इतर कलात्मक व साहित्यिक कार्यक्रम ह्या नाट्यगृहांतच होतात.

ह्याव्यतिरिक्त (गोदातीर हैद्राबाद) इतिहास मंडळ, चित्रशाळा, संस्कृत पाठशाळा, प्रतिभा निकेतन, शारदा भुवन, गाधी विद्यालय, पीपल्स कॉलेज, निती निकेतन ह्या व इतर अनेक शिक्षण संस्था, नाट्य संघ, महिला संघ व शहरांतील ४ वाचनालयें, बालकमंदिरें व इतर अनेक संस्था नांदेड जिल्ह्याच्या सांस्कृतिक प्रगतीचीं वैशिष्टयें आहेत.

महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्याप्रमाणेंच ह्या जिल्ह्यांतील बहुसंख्य जनता दूरवर विखुरलेल्या लहान खेड्यांतून राहात असल्यामुळें बाहेरच्या जगाशीं तिचा संबंध नेहमी येत नाही. अशा जनतेचा

बाहेरच्या जगाशी व दैनंदिन घडामोडीशीं संबंध जोडण्याचें कार्य ग्रामीण रेडिओ योजनेद्वारें केले जात असून जिह्यांत आतापर्यंत ४३ गावांतून सामुदायिक श्रवणाचे रेडिओ सेटस् बसविण्यांत आले आहेत.

सामुदायिक श्रवण

दैनंदिन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडीबरोबरच शेतीच्या आधुनिक पद्धतींची माहिती, ग्रामीण स्वास्थ्य, आरोग्य व अनेक ग्रामीण प्रश्नांची चर्चा करणारे खास कार्यक्रम सामुदायिक श्रवण केन्द्रासाठीं आकाशवाणीच्या विविध केन्द्रांतून प्रसारित होतात व यामुळें जिह्यांत अशा रेडिओंची मागणी सतत वाढत आहे.

ग्रामीण रेडिओ

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि खात्याच्या ग्रामीण रेडिओ विभागातर्फे सामुदायिक श्रवणासाठीं, ग्रामपंचायती, सहकारी संस्था, नगरपालिका, माहिती केंद्रें अथवा यासारख्या जबाबदार संस्थांना रेडिओ सेटस् मिळूं शकतात. सुरुवातीला रेडिओ बसविण्याची वर्गणी १७५ रु. व त्याचा वर्षभराचा दुरुस्ती व बॅटरीचा खर्च रु. ६० भरावा लागतो. तद्नंतर दरवर्षीला ६० रु. वर्गणी भरावी लागते. नांदेड जिह्यांतील रेडिओ बसविण्यासाठीं व त्यांची कार्यक्षमता पाहण्यासाठीं एक स्वतंत्र टेक्निशियनची नेमणूक करण्यांत आली असून त्यांची कचेरी नांदेड येथें आहे.

टपाल व तार व्यवस्था

आधुनिक जीवनांत पोस्ट ऑफिसचें महत्व फार मोठे आहे. त्यामुळें अगदी ग्रामीण भागापर्यंत राहाणाऱ्या लोकांचा बाहेरच्या जगाशीं संबंध राहतो. नांदेडला पोस्टल सुपरिंटेडेन्ट यांची कचेरी असून त्यांच्या नियंत्रणाखालीं नांदेड आणि उस्मानाबाद हे दोन जिल्हे आहेत. शासनाच्या सोईनुसार पोस्ट ऑफिसेसची हेड ऑफिस, सब् ऑफिस, ब्रँच ऑफिस अशी वर्गवारी करण्यांत आली आहे. नांदेड जिल्ह्यांत ऑफिस नांदेडला असून तालुका व इतर महत्वाच्या गांवी २१ सब् ऑफिसेस् आहेत. त्याचप्रमाणें संपूर्ण जिल्ह्यांत १९३ बँच ऑफिसेस् कार्य करीत आहेत.त्यांचेमुळें सबंध जिल्ह्यांत पत्रव्यवहाराची उत्तम व्यवस्था झाली आहे.

आधुनिक जलद पत्रव्यवहाराचे किंवा संपर्काचे दुसरे महत्वाचें साधन म्हणजे टेलिग्राफ. नांदेड जिल्ह्यांत भोकर, धर्माबाद, किनवट, हिमायतनगर, उमरी, मुदखेड जंक्शन व नांदेड या गांवातून टेलिग्राफची व्यवस्था आहे.

ह्या व्यतिरिक्त नांदेड व धर्माबाद येथें दोन टेलिफोन एक्सेंचजेस् कार्य करीत आहेत. धर्माबादच्या प्रसिद्ध व्यापारी पेठेला जागतिक बाजाराचें ज्ञान होऊन त्या भागांतील शेतकऱ्यांना ह्यामुळे खूप फायदा झाला आहे.

प्रे क्ष णी य स्थ ळें

ऐतिहासिक माहितीप्रमाणें खालसा पंथाचे शेवटचे धर्मगुरू गोविंदसिंग हे १७०७ साली नांदेडला आले आणि १४ महिन्यानंतर त्यांनीं इहलोक सोडला. त्यांच्या समाधीवर सध्यांचा गुरुद्वारा बांधण्यांत आला. हा गुरुद्वारा "गुरुद्वारा हुजूरसाहेब" या नांवानें प्रसिद्ध आहे. ज्या भागांत गुरुद्वारा वसलेला आहे, त्या भागाला अबचलनगर असे संबोधण्यांत येते. हा गुरुद्वारा महाराजा रणजितसिंगानें सुमारें ३ लक्ष रुपये खर्च करून बांधला आहे. या व्यतिरिक्त शीख राजे, सरदार व इतर श्रीमंत लोकांनीं ह्या गुरुद्वारासाठीं मोठमोठ्या रकमा दिल्या. सध्यां गुरुद्वारा असलेला भूभाग हा एक पांच एकराचा सलग भाग आहे. याच्या चारहि बाजूंनीं उंच भिंती असून ४ प्रवेशद्वारें आहेत. गुरुद्वारांवरील कळस आणि आंतील नक्षीकाम हें सोन्याचें आहे. गुरुद्वाराच्या आंतील भागांत जवळ जवळ २०० खोल्या असून त्यांत सुमारें २००० यात्रेकरूंची सोय होऊं शकते. त्याचप्रमाणें गुरुद्वारा निधींतून एक स्वस्त सामानाचे दुकान, दवाखाना, मुलींची शाळा, स्फटिकाच्या दगडावरील नक्षीकामाचा कारखाना आणि शिक्षण वर्ग इतक्या संस्था ह्या इमारतींत कार्य करीत आहेत.

गुरुद्वारा

नांदेडचा हा गुरुद्वारा संपूर्ण भारतांतच नव्हे तर संपूर्ण जगांतील शीख लोकांचें आदरस्थान आहे व दरवर्षी शीखधर्मीय व इतरहि लोक हजारोंच्या संख्येनें येऊन गुरुद्वारास भेट देऊन जात असतात.

नांदेडच्या या गुरुद्वारामध्यें ऐतिहासिक आणि मूल्यवान अशा अनेक वस्तु, ग्रंथ, आणि आयुधें ठेवलेलीं आहेत. त्यापैकी खालील आयुधें गुरू गोविंदसिंगाची आहेत. (१) कृपाण (२) तलवार (३) धनुष्यबाण. याशिवाय जनरल बाबासिंगाची तलवार, शेर ए पंजाब, महाराजा रणजितसिंगाची तलवार, नम संस्थानाच्या महाराजा हिरासिंगाची तलवार व संग निधानसिंगाची तलवार इत्यादि शस्त्रागाराचीं वैशिष्ट्यें आहेत.


याशिवाय मूल्यवान हार, हिरे जडित दागिने, कर्णफुले, सोने आणि चांदीचे अगणित दागिनेहि गुरुद्वाराच्या रत्नकोषात आहेत.हे शस्त्र व रत्नागार यात्रेकरूना पाहण्यासाठीं दसरा, दिवाळी होळी आणि वैशाखी या चार दिवशीं खुलें ठेवण्यांत येते.

या प्रमुख गुरुद्वाराच्या व्यतिरिक्त गुरू गोविंदसिंगाच्या जीवनांतील कांहीं चमत्कारावर आधारलेले असे हिराघाट, भाटासाहेब, शिकारघाट, बंदा घाट माल टेकडी साहेब, संगत साहेब असे ७ लहान गुरुद्वारा शहरांच्या वेगवेगळ्या भागांत बांधलेले आहेत.

नांदेड जिल्ह्याचें ईशान्य टोक म्हणजे माहूर. हे ठिकाण दत्ताचे जन्मस्थान म्हणून अत्यंत पवित्र क्षेत्र मानलें जातें. रेणुकादेवीच्या वास्तव्यामुळें यास माहूर किंवा मातापूर वा मातृपूर हें नांव पडले असावे. सह्याद्रि पर्वताच्या अनेक फाट्यापैकीं एकावर माहूर हें स्थान आहे. आंध्र प्रांतीय आदिलाबाद पासून सुमारे ६५ मैलांवर हें ठिकाण आहे. वाटेत नुकतेच आदर्श खेडे म्हणून दुसरा नंबर दिले गेलेले मांडवी हे गांव लागते. पुढे शरभंग ऋषीचा आश्रम असलेले उनकेश्वर नांवाचे एक तीर्थ लागते.

श्री क्षेत्र माहूर

प्रेक्षणीय स्थळें



ऐतिहासिक स्थळ
प्रेक्षणीय स्थळ
देवस्थान
गुरुद्वारा
माहूर
किनवट
हदगांव
सहस्त्रकुंड
नांदेड
नगिनाघाट
अप्सराकुंड
भोकर
कंधार
बिलोली
मुखेड
देगलूर

तेथे गरम पाण्याचे एक कुंड असून त्यांत स्नान केल्यास कुष्ठादि रोग बरे होतात असे मानले जाते. या स्थानी एक मंदिर पण आहे. मंदिरांत क्वचितच दिसणारी शंकराची मूर्ति (पिंडी नव्हे) आहे. हाच रस्ता पुढे माहूरास जातो. या शिवाय येथें येण्यास किनवट या मध्य रेल्वेच्या स्टेशनापासूनहि एक रस्ता आहे. पण वाटेत किर्र झाडी, उंच उंच टेकड्या इत्यादि कारणामुळें व हिंस्त्र पशूंच्या भयामुळें पहिल्या मार्गापेक्षां रहदारी बरीच कमी असते. माहूरच्या तीन बाजूस पेनगंगेचा वेढा आहे. त्यावर पूल वगैरे उपलब्ध नाही व मार्गहि अति बिकट, त्यामुळे इकडून येणारा क्वचितच. मात्र एकेकाळी इकडे येण्यास वऱ्हाडातून रस्ते असावेत असा अंदाज आहे. कारण माहूर हे जसे क्षेत्राचे ठिकाण तसेच तेथे एक दुर्गम असा किल्ला आहे. परकियांच्या हल्ल्यापासून त्याचे रक्षण करण्यासाठीं डोंगर व जंगले सर्व दूर हात पसरून तयार असल्यामुळे हा किल्ला एकेकाळीं मोठा महत्वाचा होता. शिवाय सर्वत्र रस्ते असल्यामुळे व मध्यवर्ती केंद्र असल्यामुळे माहूरला व्यापाराच्या दृष्टीने महत्त्व होते. सध्यां मात्र जून ते नोव्हेंबर हे सहा महिने रस्त्याअभावीं रहदारी अजिबात नसते. कारण दर पावसाळ्यांत कच्चे रस्ते साफ धुऊन जातात व कुणीकडे जावे हे नवख्या माणसास समजेनासे होते. मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेस म्हणजे दत्त जयंतीस येथे सुमारे ४० ते ५० हजार भाविक जमतात. यावेळी रस्ते चांगले केले जातात व बसगाड्या नियमितपणे चालूं लागतात. माहूर व त्याच्या आसपासच्या किनवट तालुक्यांतील जंगलाचा भाग वाघ, चित्ते, मोर, हरिण, सांबर, सायाळ, कोल्हे, ससे, रानडुकरें इत्यादि जनावरांसाठीं फार प्रसिद्ध आहे. विशेषतः माहूरला आढळणाऱ्या वाघाइतके मोठे वाघ भारतांत फारच थोड्या ठिकाणी आढळतात असे म्हटले जाते.

माहूर टेकडी चढण्यास जेथून सुरूवात होते तेथून जवळच लसमापूर नांवाचे एक गांव आहे. लसमापूरहून सुमारे २ मैल गेल्यावर माहूर हे गांव लागते. गांवाचे पूर्व बाजूस एक तलाव असून त्यांत लाल पांढरी कमळे उगवतात. या तळ्याचे नांव पद्मतीर्थ असे असून ते फार प्राचीन असल्याचे सांगितले जाते. यांत भाविक लोक स्नान करतात. या तलावाचे जवळच मोजांती नांवाची एक कुटी आहे. भिक्षा घेऊन आल्यावर दत्तात्रय याच जागी भोजन करीत अशी कथा आहे. येथून पुढें गेल्यावर महानुभाव सांप्रदायाच्या गोसाव्यांनी बांधलेले दत्त मंदिर लागते. या स्थानास देवदेवेश्वरी असें म्हणतात. महानुभाव सांप्रदायाचे प्रवर्तक श्री चक्रधरस्वामी यांनी हें स्थान वसविलें अशी आख्यायिका आहे.

दत्त मंदिरास प्रदक्षिणा घालतांना मागील बाजूस गेले असतांना एक शंकराचे देऊळ लागते. त्याचे देवळेश्वर असे नांव आहे. देवळेश्वराच्या मंदिराच्या आवारांतून बाहेर आल्यावर पोलीस ठाण्याहून जाणारा एक गाडी रस्ता लागतो. या रस्त्यानें सुमारे १ मैल गेल्यावर दोन रस्ते फुटतात. त्यापैकीं एक रेणुकादेवीच्या मंदिराकडे जातो.

रेणुकादेवीचें मंदिर ज्या पहाडावर आहे तो समुद्रसपाटीपासून सुमारे २६०० फूट उंच आहे. त्यास सिंहाद्री अथवा रेणुकेचा पहाड म्हणतात. एकदां महिष्मार नगरीचा राजा दैत्य सहस्त्रार्जून हा जमदग्नीच्या आश्रमांत आला. मुनींने त्याचें उत्तम स्वागत केलें. पण पुढें जमदग्नीला असलेली कामधेनु राजानें देण्यास नकार दिल्यामुळें ऋषीश्वर चिडला व त्यानें जबरदस्तीनें कामधेनूचे हरण करण्याचा प्रयत्न केला. कामधेनूच्या शरीरापासून निर्माण झालेल्या सैन्याने राजाच्या सैन्याची वाताहात केली. तेव्हां क्रोधविवश होऊन राजाने अविचारानें जमदग्नींचा शिरच्छेद केला व जमदग्नीचा पुत्र परशुरामास ही गोष्ट कळताच तो संतापला व त्याने सहस्त्रार्जुनाचा युद्धांत वध केला.

रेणुकादेवीचें मंदिर

पतीच्या निधनानंतर रेणुकेनें सती जाण्याचा निर्णय घेतला. माहूर ही जागा सर्व दृष्टीनें योग्य वाटल्यामुळें परशुरामाची माता येथें सती गेली. याच ठिकाणीं परशुरामाची श्री दत्तात्रयाशीं भेट झाली. परशुरामाच्या माता–पित्याचें ज्या जागीं दहन झाले त्यास मुलदरी म्हणतात. रेणुकेच्या व जमदग्नीच्या उत्तर कार्याचे दत्तात्रयाने पौराहित्य केले. रेणुकेच्या मंदिराजवळ परशुरामाचीहि मूर्ति आहे. जवळच परशुराम तीर्थ म्हणून एक कुंड आहे. किल्ल्याचे उत्तरेस एक सर्वतीर्थ नांवाचे एक कुंड आहे. परशुरामाने आपल्या मातापित्यांच्या क्रियेकरितां पृथ्वीत बाण मारुन सर्व तीर्थें गोळा केली; अशी या कुंडाच्या उत्पत्तीची कथा आहे.

माता रेणुकाचे टेकडीवरुन खालीं उतरल्यावर सुमारे १५० पावलावर उजव्या हाताकडे शिखराकडे जाणारा रस्ता लागतो. हा रस्ता दोन पहाडाच्या मधून जातो. उजव्या बाजूस सिंहाद्री अथवा रेणुकेचा पहाड व उजव्या अंगास किल्ला असलेली काळी टेकडी लागते. किल्ल्याचे बुरुजांत काली देवीचें मंदीर आहे. या किल्ल्याची उत्तरेकडील भिंत २३ फूट रुंद आहे. या रस्त्याने २ मैल गेल्यावर दत्तात्रयाचे निवासस्थान जो सह्य पहाड त्यावर माणूस पोहचतो. हा पहाड व त्याच्या जवळचे पहाड हे सध्या गोसाव्याचे ताब्यांत असून त्यांची नांवे शिखर, कैलास टेकडी, सह्याद्री व अनुसयेचा पहाड अशीं आहेत. माहूरचे दत्तशिखर व महंताची गादी हे दत्त पंथ गोसावी यांचे आद्य पीठ आहे. महंतानी शिखर मंदिराच्या पूजा व्यवस्थेची तसेच माहूरच्या आसपासचे मार्ग व रस्ते नीट करण्याचीं व यात्रेकरूंच्या सोईची अनेक लोकोपयोगी कामें जहागिरीच्या निधींतून औदार्यानें पार पाडली आहेत.

दत्तशिखर

दत्तशिखर येथें दत्तात्रयाचा जन्म किंवा अवतार झाला असे मानण्यांत येते. कारण अभिमनींचा आश्रम व अनुसया मातेचे स्थान या टेकड्याहि येथून जवळच दक्षिणेस आहेत. दत्त उपासक महंत महाराजांची प्राचीन गादी तसेच अमृत कुंड व सर्व तीर्थ ही महत्वाची तीर्थेंहि आहेत. अनुसया मातेच्या शिखराच्या जवळच आणखी एक टेकडी आहे. ते गुणवती या महान पतिव्रतेचें स्थान आहे. औरंगजेब दक्षिणेचा सुभेदार असतांना माहूरच्या किल्ल्याचे बाहेर परमानंद भारतीय या नांवाचा एक थोर सत्पुरुष राहात होता. तो अधिकारी पुरुष होता असे सांगतात.

परमानंदांची समाधि

परमानंद भारती यांनीं जेव्हां देह ठेवला त्यापूर्वी त्यांनीं मारवाडांतून एक गोसावी आणून त्याला त्या स्थानाचा अधिपती बनविले. तेथे परमानंद भारती यांची समाधी असून हाच येथील आदि महंत मानला जातो. परमानंद भारतीनंतर त्यांच्या शिष्या मानभारती याच्या काळांत हें देवस्थान प्रसिद्ध झाले. परमानंद भारती यांचे समाधीसमोरचे बाजूस कमानी पलिकडेच भंडार घर, नैवेद्य घर वगैरे ठिकाणें असून कोठी हा भाग मध्यें देवळाला लागून व महाद्वाराच्या दोन्ही बाजूस आहे. देवळाच्या आवाराबाहेर एक बंगला, धर्मशाळा व देवस्थानचें कार्यालय आहे.

येथून खालीं गेल्यावर एक कुंड लागतो. या कुंडाजवळ एक शिवमंदिर आहे. माहूरच्या पश्चिमेला एक तलाव आहे. त्या तलावाजवळ आधुनिक सत्पुरुष व संत कवि श्री विष्णु कवि यांचा मठ आहे. माहूरचा किल्ला गाडीवाटेपासून थोडासा बाजूस व चढावर आहे. तो प्राचीन तीन प्रमुख किल्ल्यांपैकीं एक आहे असें म्हणतात. या किल्ल्याचे पहिले तीन किल्लेदार तीन राजपूत बंधु हे होते. पुढें हा किल्ला उदारामराचे देशमुख यांचेकडे आला व आजतागायतपर्यंत तो त्यांचेच वंशजाचे ताब्यांत आहे. किल्ल्यांतील कांहीं खोल्या इतक्या चांगल्या आहेत कीं थोडयाशा मेहनतीनंतर किल्ला म्हणजे उतारूंचे उत्तम वसतीस्थान होईल. माहूरच्या पर्वत रांगेत जैन लेण्या आहेत.